Registered No. 4—1872.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ७ अकोला, रविवार ता० २ नोवेंबर सन १८७३ इ० अंक ४४

## जाहिरात.

### वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | |
|---|---|
| | ६ |
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| साल अखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०।४ |
| डाकहाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १।८ |
| अखेर | २ |

### नोटिशीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०।१।६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०।१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०।४ |
| ,, दुसरे खेपेस | ०।२ |

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस—,

वि. वि. अडगावाहून दोन कोसावर एदलापूर ह्मणून एक लहानसें खेडें आहे. तेथें एक गोसावी कुणबी जातीचा रहात असतो. त्याणें नवरात्रांत आपणास मातींत पुरून घेतलें होतें व त्यावर गहूं पेरिले होते. ते वाढण्याकरितां कुणबी लोक त्यावर सकाळीं संध्याकाळीं सुमार २० घागरी पाणी ओतीत असत. बुवाचें डोकें व हात मात्र मोकळे होते. वरकड सर्व अंग बुजलें होतें. आठ दिवसपर्यंत बुवानीं जिवंत समाधी घेतली होती. तितक्या वेळांत त्यांणीं कांहीं भक्षिलें नाहीं. व देहधर्महि केले नाहींत. ही गोष्ट मी कानानें ऐकिली असें नाहीं तर डोळ्यांनीं पाहिली आहे. आठ दिवसानंतर होम करून बुवा कांहीं अन्न खाऊं लागले. ही खबर प्रसिद्ध होण्याकरितां आपणाकडे पाठविली आहे. कळावे ही विनंती.

एक बातमीदार.

---

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस.

वि. वि जळगाव येथील तहशिलदार मि० सय्यद मीर इनायत हुसेन यांनी बदली उमरावतीस झाल्याबद्दल हुकूम आल्यावरून येथील सर्व लोकांस माहित झालें तेव्हां येथील व या तालुक्यांतील लोकांस वाईट वाटलें. हे गृहस्थ फार परोपकारी व लोकप्रिय असत. आतां यांचा व आपला वियोग होणार तेव्हां आपल्यांत यांचें आगमन झाल्या पासून चार वर्षें झालीं त्यांत झालेलें सुख, व हे जाणार याबद्दल वियोगाचें दुःख किती झालें हें प्रदर्शित करण्याकरितां व यांचे हातून सार्वजनिक हिताचीं, गरीब लोकांच्या कळवळ्याचीं कार्मे कशा रीतीनें झालीं व यांनीं कोणास इजा न देतां सरकारी काम बरोबर वेळचे वेळेस बजावून आपली शिफारस दाखविली आणि लोकप्रियता कशी संपादन केली हें सर्वत्रांस समजण्याकरितां शब्द निबंधानें कळवावें ह्मणून वेत करून येथील नेटिव्ह लायब्ररीचे सेक्रेटरी मि० काशिनाथपंत यांस सभा करण्याविषयीं गृहस्थांनीं कळविल्यावरून त्यांनीं शाळागृहांत तारीख ९ माहे सपटेंबर सन १८७३ इ० रोजीं सभेचा समारंभ केला होता. तहशिलदार येण्याचे रस्त्यावर पोलिसाचे लोक उभे होते. त्यांपुढें कालेक्टरकडील शिपाई व चौकीदार एक रांगेनें उभे होते. ज्या बंगल्यांत सभा भरणार तें ठिकाण सुशोभित केलें होतें. नौबदखाना व वाजंत्री. हलके हीं वाद्यें त्या वेळीं आणिलीं होतीं. सर्व तयारी झाल्यावर निमंत्रण करून, त्यांची स्वारी येतां बरोबर बाजा सुरू झाला आणि सरबत्ती सुरू झाल्या. कांहीं वेळ हा थाट झाल्यावर तीं वाद्यें व सरबत्ती बंद झाली. नंतर मि. वामन रघुनाथ हेडमास्तर यांनीं सभा भरविण्याचा उद्देश कळवून कांहीं सुरस भाषण केलें. नंतर मि. गोपाळराव व मि० बळवंतराव मास्तर यांनीं व शाळेंतील चार मुलांनींहि निबंध वाचिले. नंतर त्रिंबकराव जाहागिरदार टुमकी यांनीं हिंदुस्थानींत भाषण केलें. नंतर मि. मोहनीराज गोविंद नायब तहशिलदार यांनींहीं सुरस भाषण केलें. हें सर्व झाल्या नंतर तहशिलदार यांनीं भाषण केलें. तें थोडक्यांत लिहितों.

मजविषयीं जें तुह्मीं बोलला हें फारच ज्यास्ती आहे. मी जें सरकारी काम केलें तें करणें माझें कामच होतें. आणि या सुधारणेविषयीं जी तारीफ तुह्मीं केली ती म्युनसिपालिटीची केली पाहिजे कारण इतर मेंबराप्रमाणें मीही एक मेंबर आहे.

त्यांनीं हें जे भाषण केलें हें त्यांच्या थोरपणास योग्य आहे. नंतर पानसुपारी अत्तर गुलाब फुलें वाटून सभा बरखास्त झाली. हा समारंभ सोमवारी सायंकाळीं होऊन बुधवारीं प्रातःकाळीं. मि० सखाराम दत्तात्रय तहशीलदार आले त्यांस मामलती तहशीलदारानी च्यार्ज दिला व ते रवाना झाले. त्यांस पोहोंचविण्यास तशीच गर्दी झाली होती. प्रथम पेशकार यांचे घरीं पानसुपारी घेऊन आणि सर्वांचें मुजरे घेत आबाल वृध्दासहित कोणास शेकहांड व कोणास सलाम करीत तहशिलदार चालते झाले. पत्रें विस्ताराची माफी असावी. तारीख २२ माहे सप्टेंबर सन १८७३ इसवी.

एक बातमीदार.

---

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस:—

वि. वि. आह्मिकडे पत्र आल्यास लिहिलें नाहीं ह्मणोन रागावले असाल तर क्षमा असावी. ऐशाजी जळगाव येथील लोकांनीं तहशिलदार साहेब यांची बदली झाल्या कारणांनीं जो समारंभ केला त्या हकीकतीनें पत्र पाठविलें त्यास आर्डर मिळाली नाहीं तेव्हां येथील कित्येक लोकांची नाउमेद झाली आहे त्यास पत्र छापून त्यांस उमेद द्यावी असा हेतु आहे. काल रोजीं तारीख ५ आक्टोबर सन १८७३ इसवीस जळगाव तालुक्यांतील पिंपळगाव काळे येथें मावकरी लोकांनीं नाटक केलें तें पाहण्यास गेलो होतो अख्यान सुलोचना होतें. वऱ्हाडांत खेडेगावांत नाटक झालें हें पाहून फार आनंद झाला खेळ पाहण्यांत देशाप्रमाणें चांगला खेळ झाला. लक्ष्मण जानुबंत यांनीं चांगलें भाषण केलें.

महाराज मी या गावास जात असतां जळगाव रस्त्यावर इतका मैला झालेला पाहिला कीं तो पत्रीं लिहवत नाहीं. पाई असल्याकारणानीं रात्रीचे वेळेस मोठे रस्त्यावर जो मैला केला होता त्या योगानें पाय भरला. हा मैला कोणी केला हें माहित नसल्याकारणानीं स्नान करावें लागलें. या गावचा फुलसिंग पाटील फौजदार आणिन हुषार आहे असे असतां त्यावें इकडे दुर्लक्ष कां असलें तें न जाणो.

जळगाव येथील कांहीं सडकेवर मुरूम पडला आहे त्यावर गवत झालें आहे तें काढणें वगैरे तजवीज ते ठेवितील अशी उमेद आहे. याचप्रमाणें सोमवार बाजारांत मनस्वी गवत वाढलें आहे तें काढणें आणि बाजार भरण्याचे जागीं लोक मैला करितात तो बंद होणेविषयीं खबरदारी कमेटीनें केली तर नीट होऊन, जेथें हल्लीं मालगण वसतात तो रस्ता मोकळा होऊन रहदारी जाणारे येणारे यांस नीट पडून गाव सफाईही नीट होईल. कळावे तारीख ६ अक्टोबर सन १८७३ इसवी.

जळगावकर

क्ष

---

## पुणे व्यापार मंडळी.

### सार्वजनिक स्वदेशी माल विकरीचें दुकानाचा आरंभ.

सर्व लोकांस विनंती करण्यांत येते कीं, गेले सालीं तारीख ८ दिसेंबर सन १८७२ रोजीं पुणें येथे श्रीमंत रा. रा. श्रीनिवासराव पंडित प्रतिनिधी हे अध्यक्ष स्थानीं बसून हिंदुस्थानांतील व्यापार संबंधी विचार झाला ते समयीं "स्वदेशी मालाचा खप आणि मितव्यय" हेंच व्यापार काढण्यास मुख्य साधन असें बोलण्यांत आलें होतें परंतु निश्चय ठरणें तो सर्व लोकांचे अभिप्राय समजल्यावर ठरावयाचा होता त्यावरून बरेच दिवस या विषयाची वाटाघाट होऊन स्वदेशी मालाचे खपाबद्दल अभिप्राय बहुतेक लोकांचा एकसारखा आहे व इतर ठिकाणीं त्याजबद्दल थोडी बहुत सुरुवातही झाली. त्याविषयीं पुण्यास सुमुहूर्तावर दुकानाची सुरुवात व्हावी असे मंडळीचे मनांत येऊन व्यापाराचे चालीप्रमाणें दिपवाळी रोजीं श्री लक्ष्मीपूजन करून त्या दिवशीं आरंभ करावा असें ठरलें. समारंभ खालीं लिहिलेप्रमाणें.

पुण्यांत तीन ठिकाणीं दुकानें स्थापन होतील त्याचा तपशील.

एक रविवार पेठेंत, एक बुधवार पेठेंत व एक लष्करांत.

सदर्हू दुकानांत मुख्य जिन्नस देशी कापड व शिवाय दुसरे जिन्नस लोकांचे उपयोगाचे मिळण्यांत येतील व त्या जिनसांची किंमत अगदीं सचोटीनेंच घेण्यांत येईल.

श्री लक्ष्मीपूजन कार्तिक शुद्ध १, बुधवार तारीख २२ आक्टोबर १८७३ रोजीं पेठ बुधवार बेलबागेसमोरील श्री व्यंकटेशाचे देवालयांत होईल ते समयीं तिकडे याकरितां सर्व लोकांनीं त्या ठिकाणीं कृपा करून आलें पाहिजे.

हें दुकान आरंभ होण्याचा मुख्य उद्देश देशांत व्यापार अगदीं कमी होत चालला आहे त्याची वृद्धी व्हावी ह्मणून दुकानें काढण्यांत आलीं आहेत त्यास सर्व देशाभिमानी लोकांनीं या कृत्यास मदत द्यावी अशी त्यांस प्रार्थना आहे.

आपले देशांत कारागिरानें तयार झालेला माल कोणी विकरीकरितां आणिल्यास त्याची योग्य किंमत देऊन घेण्यांत येईल अगर कोणाची इच्छा असेल तर तो विकरीकरितां दुकानावर ठेवण्याकरितां येईल तर कांहीं नेमीत कमिशन कापून विकरी करून पैसा देण्यांत येईल.

अगदीं थोडे ठिकाणीं अशीं दुकानें झालीं आहेत यांस दुसरे सर्व गावांत व शहरांत असे प्रकारचीं दुकानें स्थापनें करण्याची तजवीज जितकी लवकर होईल तितकी देश हितेच्छु लोकांकडून करण्यांत यावी अशी त्यांस विनंती आहे. त्यांजला या मंडळीकडून होईल तितकी मदत देण्यांत येईल.

या पत्राच्या प्रती हिंदुस्थानांतील सर्व वर्तमानपत्रकर्ते महाराज यांणीं आपआपले सुंदर पत्रीं छापाव्या अशी त्यांस विनंती करितों. कळावें लोभ करावा ही विनंती तारीख १९ आक्टोबर सन १८७३

गणेश वासुदेव जोशी.

---

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस:—

तेल्हाऱ्याहून—वि. वि. ठाणें येथील तारीख २८ सप्तंबराचे अरुणोदय पत्रांत लिहिल्याप्रमाणें तारीख २९ सप्तंबर रोजीं लोकमित्र या नावानें एक सभा सरकारी शाळेंत स्थापन झाली. तींत प्रथम विचार होऊन अध्यक्ष स्थानाचा स्वीकार नरसय्या चौ० का० यांणी करावा असें हेडमास्तर यांणीं सुचविल्यावरून सर्वांस ते मान्य होऊन अध्यक्ष स्थानाचा स्वीकार करण्यास विनंती केल्यावरून त्यांणीं तें मान्य केलें नंतर उपाध्यक्ष स्थानाचे योजनेविषयीं चर्चा होऊन रा. मनाजी देशमुख यांजला नेमलें नंतर पुढें खालीं लिहिल्याप्रमाणें मेंबर व चिटणीस वगैरेंच्या नेमणुका झाल्या.

चिटणीस

गणेश बल्लाळ हेडमास्तर म. स्कू. तेल्हारें

ज्या फ्रेंच गृहस्थानें सुएनची संयोगी भूमी फोडून आरपार समुद्र केला तो गृहस्थ रूस देशापासून हिंदुस्थानांत पेशावर पर्यंत आगगाडीचा रस्ता बांधण्याचा खटाटोप करित आहे.

या साली बडोद्यांतील दसऱ्याचा समारंभ सांगण्यासारखा झाला नाहीं असें एक बातमीदार लिहितो.

बडोद्याचे महाराज मल्हारराव हे आपले आणली एक लग्न करणार आहेत आणि नवीन होणाऱ्या सासऱ्याला त्यांणीं दसऱ्याच्या दिवशीं एक पालखी नजर केली असें समजतें.

प्रोफेसर दादाभाई नवरोजी यांस आपले दिवाणाची जागा द्यावी असें मल्हारराव गायकवाडाच्या मनांत येऊन त्यांनीं दादाभाईस विलायतेस तार केली होती परंतु त्यांणीं तो हुद्दा पत्करणें नाकारिलें असें ज्यामिजमशेद लिहितो. सु. प.

**सरकारी कामदारांच्या नेमणुका.**

नामदार गवरनर इन कौन्सिल यांनीं रत्नागिरी जिल्ह्यांतील सबार्डिनेट जड्जाच्या बदल्या केल्या आहेत त्या येणें प्रमाणें;— रा० सा० रघुनाथ गणेश खारकर यांस चिपळून एथें से० क्ला० फ० ग्रे० सबा० जज्ज नेमलें.— रा. सा. गोपाळ अमृत यांस मालवण एथें से. क्ला. से. ग्रे. सबा. जज्ज नेमले.—रा. सा. विश्वनाथ गोविंद चोळकर यांस संगमेश्वर एथें से. क्ला. थ—ग्रे. स. जज्ज नेमलें.

कलकत्त्यास मेडिकल कालेजांत मागें जी मारामारी झाली तीवरून विद्यार्थ्यांस शिक्षा झाल्या त्या येणेंप्रमाणें—२ नेटिव विद्यार्थ्यांस एक वर्षभर काढलें; ३ युरोपियन विद्यार्थ्यांपैकीं एकास एक वर्षपर्यंत काढलें व दोघांची कालेजसंबंधी सर्टिफिकेटें एक वर्षपर्यंत रद्द केलीं, २९ हास्पितल आप्रेन्टिसपैकीं दोघांस एक वर्षपर्यंत व दोघांस ६ महिन्यापर्यंत काढलें, २४ कालेजाच्या वाड्यांतून एक महिनाभर बाहेर जाण्याची बंदी केली व एकास मोठा टपका दिला.

निजामाचे दिवाण सर सालारजंग यांच्या. मनांत आहे कीं ठिक ठिकाणीं ब्यांकि किंवा पेढ्या स्थापाव्या.

कर्जाबद्दल कुळांस सावकारी तुरुंगांत ठेवण्याविषयीं जो कायदा आहे त्यांत लौकरच काहीं फेरफार होणार आहे.

जपानच्या बादशहानें दररोज निघणारें एक वर्तमानपत्र काढलें असून तें सर्वांनीं घेतलेंच पाहिजे असा हुकूम केला आहे. ज्ञा. द.

असें समजलें आहे कीं, सिंध एथील कमिशनर विलयातेस रजेवर जाणार तेव्हां त्यांचे जागेवर मे० हेवलाक साहेब रेविन्यु आणि पोलिस कमिशनर प्रांत दक्षिण ह्यांची नेमणूक होणार व त्यांचे जागेवर मे० जे. ई. अलिफंट पुण्याचे कलेक्टर आणि माजिस्ट्रेट साहेब यांची नेमणूक होणार. ज्ञा. प्र.

मल्हारराव महाराज दुसरें लग्न करणार आहेत. वधूचें नाव लक्ष्मीबाई असून वय चवदा वर्षांचें आहे. लक्ष्मीबाईस एक लक्षाची नेमणूक करून देणार कोणी बळवंतराव भाऊस लक्ष्मीबाईचे कारभारी नेमले आहेत ह्मणतात. यांची नेमणूक सालीना २०००० रुपयांची झाली आहे.

मुंबई ग्याझेटावरून कळतें कीं, बंगाल्यांतील दार्जीलिंगच्या डोंगराजवळ उत्तम प्रकारच्या स्लेट जातीच्या दगडाची खाण सांपडली आहे. ने. ओ.

रावबहादूर धोंडो कृष्ण कानिटकर हु. डे. कलेक्टर यांस जमखंडी एथील कारभाऱ्याची जागा मिळाली. स. शो.

रावसाहेब रामचंद्र सखाराम डिस्त्रिक्ट डिपुटी कलेक्टर बेळगाव हे पुन: आपले सोलापूर एथील मामलेदारीचे जागेवर येणार अशी लोकवार्ता ऐकण्यांत येते.

पंढरपूर एथील श्री विठोबाचे मंदिरांत यात्रेचे दिवसांत हवा कोंडली जाऊन खराब होते व तेणेंकरून यात्रेकरू लोकांचे शरिरप्रकृतीस अनेक प्रकारचे विकार उद्भवतात. ते न होण्याविषयीं विचार करण्या करितां सानिटरी कमिशनर साहेब मुंबईहून मुद्दाम पंढरपुरास येणार आहेत असें ऐकतो.

सोलापुरचे प्रसिद्ध व्यापारी धर्मराव थोबडे यांस दम्याचे आजारानें तारिख १९ रोजीं देवाज्ञा झाली. आ. वृ.

## लोअर स्टयांडर्ड परीक्षेंतील प्रश्न.

### दिवाणी शाखा.

१. अ नावाचा मनुष्य बुलढाणें जिल्ह्यांत ब वर दिवाणींत फिर्यादअर्ज दाखल करितो (ब) अकोलें जिल्ह्यांत राहतो. अची फिर्याद वाशीम जिल्ह्यांतील घराबद्दल आहे. बुलढाणें जिल्ह्यांत अनें फिर्याद दाखल केली त्या कोर्टांनीं एकदम फैल करावी किंवा नाहीं व जर एकदम फैल करू नये तर काय करावें.

२. दिवाणी मुकदम्यांत दस्ताऐवज हजर करण्याविषयीं काय नियम आहेत.

फिर्याद अर्जाबरोबर कोणते दस्तैवज हजर करावेत व फिर्यादीचे पुढील पर्यायांत कोणते दस्तैवज, हजर करितां येतात.

३. नमुन्याप्रमाणें समन्स न लिहितां नुसतें प्रतिवादीस पत्र लिहिलें असतां त्याचे बजावणी पुरता पुरावा कोणता ह्मणता येईल.

४. प्रतिवादी हजर असून वादी हजर नाहीं असे संबंधानें वादीचे, गैरहजीरींत त्याचे विरुद्ध फैसल केला असतां वादीस दुसरी फिर्याद त्याच दाव्याचे विषयाबद्दल करितां येते कीं नाहीं आणि फिर्याद करितां येत असेल तर काय शर्तीवर.

५. गैरहजीरीनें वादी विरुद्ध फैसल केला असेल अगर प्रतिवादीविरुद्ध एकतर्फी फैसल केला असेल तर असे फैसल रद्दित करण्याकरितां अर्ज करावयास किती मुदत आहे व ती कधीपासून मानली पाहिजे.

६. निरानिराळे वर्गाचे साक्षीदारांस पोटगी भत्ता देण्याचे दर काय आहेत. व समन्स करण्याबद्दल व वारंट करण्याबद्दल फी किती द्यावी लागते. व एक पक्षकार एका गावचे पांच साक्षीदारांस समन्स करूं इच्छित आहे त्यास त्याची कामगिरीची फी किती द्यावी लागेल.

७. एक हुकूमनामा तारीख १९ जुलई सन १८७१ इसवी रोजीं झाला आहे. त्यांतील वादीचे नाव (अ) आहे. अ आपले हुकूमनाम्याची बजावणी करण्याकरितां दरखास्त प्रथम जानेवारीं सन १८७४ रोजीं देतो तर तो एकदम बजावतां येतो कीं नाहीं.

८. अनें आपली गाडीबैल बस भाड्यानें देऊन त्याचे ताब्यांत दिले आहेत [क] अवर पैशाबद्दल झालेला हुकूमनाम्यांत या गाडी बैलाची जप्ती व्हावी ह्मणून अर्ज करील तर ही जप्ती कोणत्या रीतिनें व्हावी.

९. हुकूमनाम्याचे बजावणींत जंगम व स्थावर मालाचे निरानिराळे विक्री बद्दल जाहिरनामे व लोकांना विक्रीची माहिती कोणत्या प्रकारें कशी दिली पाहिजे.

१० लिलावांत खरेदी घेणारानीं लिलावाची रक्कम जंगम मिळकतीबद्दल व स्थावर मिळकतीबद्दल केव्हां व कशी दिली पाहिजे.

११. अचा बवर पांचशे रुपयाचा हुकूमनामा झाला आहे त्या हुकूमनाम्याचे फेडींत तो (ब) ची जिनगी जप्त करतो ती जप्ती केल्यानंतर (ब)वर कचे ३०० रुपयांबद्दल झालेल्या हुकूमनाम्याबद्दल (क) बची तीच मिळकत जप्त करून त्याप्रमाणें (ड)चा (ब)वर ७०० रुपये चा हुकूमनामा झाला आहे व [ड] ही (ब)ची तीच मिळकत जप्त करितो व त्या मिळकतीचा हरास होऊन ६०० रुपये उत्पन्न होतात. हे रुपये ६०० तिघा वादीस कसकसे वाटून द्यावेत.

१२ अचा अकोले जिल्ह्यांतील कोर्टांत (ब) वर हुकूमनामा झाला आहे व (ब)ची काहीं मिळकत कलकत्यास आहे तेथें आपला हुकूम नामा (ब) बजाऊ पाहतो तर कलकत्यास हुकूमनामा बजाऊन घेण्यास कायकाय तजविजी योजिल्या पाहिजेत.

**मुदतीचा आक्ट.**

ज्या दाव्याचे कारणाची मुदत तारिख १९ जानेवारी सन १८७३ इसवी रोजीं संपते त्या दाव्याचे कारणाबद्दल (अ) नें स्मालकाज कोर्टांत तारिख १ ज्यानेवारी सन १८७३ इसवी रोजीं फिर्याद केली. तारिख २० ज्यानेवारी सन मजकूररोजीं स्मालकाज कोर्टानें आपले अधिकारात नाहीं ह्मणून दावा काढला व तारिख ३१ ज्यानेवारी रोजीं योग्य कोडतांत वादीनें दावा आणिला तर तारिख ३१ रोजीं दाखल केलेली फिर्याद मुदतींत आहे किंवा नाहीं?

२. तारिख १ ज्यानेवारी सन १८६० रोजीं अनें बस रोखा लिहून दिला व तो नोंदूनही दिला व तारिख १ ज्यानेवारी सन १८६९ रोजीं[अ]बस एक पत्र लिहितो त्यांत पैसा देण्याचें कबूल करितो. या कर्जाबद्दल फिर्याद कोणत्या तारखेपर्यंत करितां येते.

३. नोंदलेल्या रोखयावरून अ बवर तारिख १ ज्यानेवारी सन १८७४ रोजीं फिर्याद करितो. रोख्याची तारिख १ ज्यानेवारी सन १८६८ आहे व नंतर तारिख १ फेब्रुवारी सन १८७४ रोजीं कस दाव्यांत त्याच रोखयावरून प्रतिवादींत दाखल करितो. कचे बाबतींत दावा मुदतीचे बाहेर आहे कीं नाहीं?

४. खालीं लिहिलेल्या फिर्यादीस मुदत काय आहे?

१. घराचे भाड्याबदल.

२. माल पोंचविणारावर माल पोंचविण्यास उशीर केल्याबद्दल.

३. पर राज्यांत मिळविलेल्या हुकूमनाम्यावर चालविलेल्या फिर्यादीस.

४. वडिलोपार्जीत काम मिळण्याबदल

५. गहाण घेणारावर जंगम गहाण माल परत घेण्याबदल ?

६. प्रतिवादीचे सांगितल्यावरून प्रतिवादीनें केलेल्या कामाची मजूरी अमुक दिवसांत त्या मजुरीचा पैसा देऊं असा करार नसेल तेव्हां.

७. चोरी करून मिळविलेल्या जंगम मिळकतीबदल.

**पुराव्याचा आक्ट.**

१. सूचक प्रश्न हक्कानें केव्हां विचारतां येतो, कोडताचे परवानगीनें केव्हां, विचारतां येतो,व कोडतानें अशा प्रकारची परवानगी कशी हकीकत असेल तेव्हां द्यावी.

**कराराचा आक्ट,**

अला बची तीन देणीं आहेत.

१. पहिले रुपये ५०० तारिख १ ज्यानेवारी सन १८६६ रोजीं खात्यांत निघालेल्या बाकीबदल आहेत व हें कर्ज वसूल करणें मुदतीच्या बाहेर गेलें आहे.

२. दुसरें कर्ज २०० आहे. ते तारिख १ ज्यानेवारी सन १८६५ चे नोंदलेल्या कर्जरोख्यावरून आहे.

३. रें कर्ज १०० रुपये तारिख १ ज्यानेवारी सन १८६९ चे चिठ्ठीवरून आहे.

अ तारिख १ जानेवारी सन१८७१ इसवी रोजीं ५०० रुपये बस देतो परंतु अमुकच कर्जाचे फेडींत मी हे रुपये दिले आहेत असें कांहीं तो सांगत नाहीं तर सावकार ब आपले मुदतीबाहेर गेलेल्या कर्जात ती रक्कम वसूल घेऊ शकतो किंवा नाहीं.

**नोंदण्याचा आक्ट.**

दस्तैवज झाल्या तारखेपासून किती दिवसाचे आंत तो नोंदण्यास आणिला पाहिजे.

२. कशी हकीकत असेल तेव्हां व कोठपर्यंत ती मुदत वाढवितां येते.

३. जी सर्व स्थावर मिळकत सबरजिस्टरचे हद्दींत नाहीं त्या स्थावर मिळकतीबदल दस्तैवज नोंदण्यास आणिला असतां सबरजिस्टर यांणीं काय तजवीज केली पाहिजे.

४. किती दिवसानंतर ज्यांस मालीक नाहींत असे दस्तैवज फाडून टाकितां येतात व फाडून टाकण्याचे बाबतींत अमुक दस्तैवज फाडू नये असे कांहीं आहे कीं काय.

**स्मालकाज कोर्टाचा आक्ट.**

१. स्माल काज कोर्टांत चालण्याजोग्या कोणत्या फिर्यादी आहेत.

२. स्मालकाजकोडताचा कोणत्या लोकांवर अधिकार आहे.

३. स्माल काज कोर्टाचे हुकूमनामे स्थावर मिळकतीवर केव्हां व कसे बजावतां येतील.

हें पत्र अकोला एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा. प्र.

Registered No. 4—1872.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ७ | अकोला, रविवार ता० २ नोवेंबर सन १८७३ इ० | अंक ४४

## जाहिरात.

### वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | रु० |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| साल अखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डाकहाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| अखेर | २ |

### नोटिशीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस—,

वि. वि. अडगावाहून दोन कोसावर एदलापूर ह्मणून एक लहानसें खेडें आहे. तेथें एक गोसावी कुणबी जातीचा राहात असतो. त्याणें नवरात्रांत आपणास मातींत पुरून घेतलें होतें व त्यावर गहूं पेरिले होते. ते वाढण्याकरितां कुणबी लोक त्यावर सकाळीं संध्याकाळीं सुमार २० घागरी पाणी ओतीत असत. बुवाचें डोकें व हात मात्र मोकळे होते. बरकड सर्व अंग बुजलें होतें. आठ दिवसपर्यंत बुवानीं जिवंत समाधी घेतली होती. इतक्या वेळांत त्यांणीं कांहीं भक्षिलें नाहीं. व देहधर्मही केले नाहींत. ही गोष्ट मी कानानें ऐकिली असें नाहीं तर डोळ्यांनीं पाहिली आहे. आठ दिवसानंतर होम करून बुवा कांहीं अन्न खाऊं लागले. ही खबर प्रसिद्ध होण्याकरितां आपणाकडे पाठविली आहे. कळावें ही विनंती.

एक बातमीदार.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस.

वि. वि जळगाव येथील तहशिलदार मि० सगद मीर इनायत हुसेन यांनी बदली उमरावतीस झाल्याबद्दल हुकूम आल्यावरून येथील सर्व लोकांस माहित झालें तेव्हां येथील व या तालुक्यांतील लोकांस वाईट वाटलें. हे गृहस्थ फार परोपकारी व लोकप्रिय असत. आतां यांचा व आपला वियोग होणार तेव्हां आपल्यांत यांचें आगमन झाल्या पासून चार वर्षें झालीं त्यांत झालेलें सुख, व हे जाणार याबद्दल वियोगाचें दुःख किती झालें हें प्रदर्शित करण्याकरितां व यांचे हातून सार्वजनिक हिताचीं, गरीब लोकांच्या कळवळ्याचीं कामें कशा रीतीनें झालीं व यांनीं कोणास इजा न देतां सरकारी काम बरोबर वेळच्या वेळेस बजावून आपली शिफारस दाखविली आणि लोकप्रियता कशी संपादन केली हें सर्वत्रांस समजण्याकरितां शब्द निबंधानें कळवावें ह्मणून येथील नोटिस ऑफिसरांचे सेक्रेटरी मि० काशिनाथपंत यांस सभा करण्यास सभ्य गृहस्थांनीं कळविल्यावरून त्यांनीं शाळागृहांत तारीख ९ माहे सप्टेंबर सन १८७३ इ० रोजीं सभेचा समारंभ केला होता. तहशिलदार येण्याचे रस्त्यावर पोलीसचे लोक उभे होते. त्यांपुढें काळीकडील शिपाई व चौकीदार, एक सारिखे उभे होते. ज्या बंगल्यांत सभा भरणार तें ठिकाण सुशोभित केलें होतें. नौबदखाना व वाजंत्री, हलके हीं वाद्यें त्या वेळीं आणिलीं होतीं. पूर्वी तयारी झाल्यावर निमंत्रण करून, त्यांची स्वारी येतां बरोबर बाजा सुरू झाला आणि सरबत्ती सुरू झाल्या. कांहीं वेळ हा थाट झाल्यावर तीं वाद्यें व सरबत्ती बंद झाली. नंतर मि. वामन रघुनाथ हेडमास्तर यांनीं सभा भरविण्याचा उद्देश कळवून कांहीं सुरस भाषण केलें. नंतर मि. गोपाळराव व मि० बळवंतराव मास्तर यांनीं व शाळेंतील चार मुलांनींहि निबंध वाचिले. नंतर त्रिंबकराव जाहागिरदार ठुगकी यांनीं हिंदुस्थानींत भाषण केलें. नंतर मि. मोहनीराम गोविंद नायब तहशिलदार यांनींहीं सुरस भाषण केलें. हें सर्व झाल्यानंतर तहशिलदार यांनीं भाषण केलें. तें थोडक्यांत लिहितों.

मजविषयीं जें तुह्मीं बोलला हें फारच जास्ती आहे. मी जें सरकारी काम केलें तें करणें माझें कामच होतें. आणि या सुधारणेविषयीं जी तारीफ तुह्मीं केली ती म्युनसिपालिटीची केली पाहिजे कारण इतर मेंबराप्रमाणें मीही एक मेंबर आहे.

त्यांनीं हें जे भाषण केलें हें त्यांच्या थोरपणास योग्य आहे. नंतर पानसुपारी अत्तर गुलाब फुलें वाटून सभा बरखास्त झाली. हा समारंभ सोमवारीं सायंकाळीं होऊन बुधवारीं प्रातःकाळीं. मि० सखाराम दत्तात्रय तहशिलदार आले त्यांस मामलेदारानी च्यार्ज दिला व ते रवाना झाले. त्यांस पोहोंचविण्यास तशीच गर्दी झाली होती. प्रथम पेशकार यांचे घरीं पानसुपारी घेऊन आणि सर्वांचें मुजरे घेत आबाल वृद्धांसहित कोणास शेकहांड व कोणास सलाम करीत तहशिलदार चालते झाले. पत्रें विस्ताराची माफी असावी. तारीख २२ माहे सप्टेंबर सन १८७३ इसवी.

एक बातमीदार.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस:—

वि. वि. आह्मीकडे पत्र आल्यास लिहिलें नाहीं ह्मणोन रागावले असाल तर क्षमा असावी. पैशर्जा जळगांव येथील लोकांनीं तहशिलदार साहेब यांची बदली झाल्या कारणांनीं जो समारंभ केला त्या हकीकतीचें पत्र पाठविलें त्यास आर्डर मिळाला नाहीं तेव्हां येथील कित्येक लोकांची नाउमेद झाली आहे त्यास पत्र छापून त्यांस उमेद द्यावी असा हेतु आहे. काल रोजीं तारीख ६ आक्टोबर सन १८७३ इसवीस जळगाव तालुक्यांतील पिंपळगाव काळे येथें गावकरी लोकांनीं नाटक केलें तें पाहण्यास गेलो होतो अख्यान सुलोचना होते. वऱ्हाडांत खेडेगावांत नाटक झालें हें पाहून फार आनंद झाला खेळ पण इण्यांत देशाप्रमाणे चांगला खेळ झाला. लक्षमण जानुबंत यांनीं चांगलें भाषण केलें.

महाराज मी या गावास जात असतां जळगाव रस्त्यावर इतका मैला झालेला पाहिला कीं तो पूर्वी लिहवत नाहीं. पाई असल्याकारणानीं गावीचे वेळेस मोठे रस्त्यावर जो मैला केला होता त्या योगानें पाय भरला. हा मैला कोणी केला हें माहित नसल्याकारणानीं स्नान करावें लागलें. या गावचा फुलसिंग पाटील पोलीसदार अतीन हुषार आहे असें असतां असें इकडे दुर्लक्ष्य कां असलें तें न जाणो.

जळगाव येथील कांहीं पाहेकेवर मुरूम पडला आहे त्यावर गवत झालें आहे ते काढणें वगैरे तजवीज तें ठेवितील अशी उमेद आहे. याचप्रमाणें सोमवार बाजारांत मनस्वी गवत वाढलें आहे तें काढणें आणि बाजार भरण्याचे जागीं लोक मैला करितात तो बंद होणेविषयीं खबरदारी कमेटीनें केली तर नीट होऊन जेथें हल्लीं माळगण बसतात तो रस्ता मोकळा होऊन रहदारी जाणारे येणारे यांस नीट पडून गाव सफाईही नीट होईल. कळावें तारीख ६ अक्टोबर सन १८७३ इसवी.

जळगावकर
क्ष

## पुणे व्यापार मंडळी.

### सार्वजनिक स्वदेशी माल विकरीचें दुकानाचा आरंभ.

सर्व लोकांस विनंती करण्यांत येते कीं, गेले सालीं तारिख ८ दिसेंबर सन १८७२ रोजीं पुणें येथे श्रीमंत रा. रा. श्रीनिवासराव पंडित प्रतिनिधी हे अध्यक्ष स्थानीं बसून हिंदुस्थानांतील व्यापार संबंधी विचार झाला ते समयीं "स्वदेशी मालाचा खप आणि मितव्यय" हेंच व्यापार काढण्यास मुख्य साधन असें बोलण्यांत आलें होतें परंतु निश्चय ठरणें तो सर्व लोकांचे अभिप्राय समजल्यावर ठरावयाचा होता त्यावरून बरेच दिवस या विषयाची वाटाघाट होऊन स्वदेशी मालाचे खपाबद्दल अभिप्राय बहुतेक लोकांचा एकसारखा आहे व इतर ठिकाणीं त्याजबद्दल थोडी बहुत सुरुवातही झाली. त्याविषयीं पुण्यास सुमुहूर्तावर दुकानाची सुरुवात व्हावी असे मंडळीचे मनांत येऊन व्यापाराचे चालीप्रमाणें दिवाळी रोजीं श्री लक्ष्मीपूजन करून त्या दिवशीं आरंभ करावा असें ठरलें. समारंभ खालीं लिहिलेप्रमाणें.

पुण्यांत तीन ठिकाणीं दुकानें स्थापन होतील त्याचा तपशील.

एक रविवार पेठेंत, एक बुधवार पेठेंत व एक लष्करांत.

सदर्हू दुकानांत मुख्य जिन्नस देशी कापड व शिवाय दुसरे जिन्नस लोकांचे उपयोगाचे मिळण्यांत येतील व त्या जिनसांची किंमत अगदीं सचोटीनेंच घेण्यांत येईल.

श्री लक्ष्मीपूजन कार्तिक शुद्ध १, बुधवार तारिख २२ आक्टोबर १८७३ रोजीं पेंठ बुधवार बेलबागेसमोरील श्री व्यंकटेशाचे देवालयांत होईल ते समयीं तिज्याकरितां सर्व लोकांनीं त्या ठिकाणीं कृपा करून आलें पाहिजे.

हें दुकान आरंभ होण्याचा मुख्य उद्देश देशांत व्यापार अगदीं कमी होत चालला आहे त्याची वृद्धी व्हावी ह्मणून दुकानें काढण्यांत आलीं आहेत त्यास सर्व देशाभिमानी लोकांनीं या कृत्यास मदत द्यावी अशी त्यांस प्रार्थना आहे.

आपले देशांत कारागिरांनीं तयार झालेला माल कोणीं विकरीकरितां आणिल्यास त्याची योग्य किंमत देऊन घेण्यांत येईल अगर कोणाची इच्छा असेल तर तो विकरीकरितां दुकानावर ठेवण्याकरितां येईल तर कांहीं नेमीत कमिशन कापून विकरी करून पैसा देण्यांत येईल.

अगदी थोडे ठिकाणीं अशीं दुकानें झालीं आहेत आंत दुसरे सर्व गावांत व शहरांत असे प्रकारचीं दुकानें स्थापन करण्याची तजवीज जितकी लवकर होईल तितकी देश हितेच्छु लोकांकडून करण्यांत यावी अशी त्यांस विनंती आहे. त्यांजला या मंडळीकडून होईल तितकी मदत देण्यांत येईल.

या पत्राच्या मार्फत हिंदुस्थानांतील सर्व वर्तमानपत्रकर्ते महाराज यांणीं आपआपले सुंदर पत्रीं छाप्या अशी त्यांस विनंती करितो. कळावें लोभ करावा ही विनंती तारीख १९ आक्टोबर सन १८७३

गणेश वासुदेव जोशी.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस:—

तेल्हाऱ्याहून—वि. वि. ठाणें येथील तारीख २८ सप्तंबरचे अरुणोदय पत्रांत लिहिल्याप्रमाणें तारीख २९ सप्तंबर रोजीं लोकमित्र या नावानें एक सभा सरकारी शाळेंत स्थापन झाली, तींत प्रथम विचार होऊन अध्यक्ष स्थानाचा स्वीकार नरसय्या मी० का० यांणी करावा असें हेडमास्तर यांणीं सुचविल्यावरून सर्वांस ते मान्य होऊन अध्यक्ष स्थानाचा स्वीकार करण्यास विनंती केल्यावरून त्यांणीं तें मान्य केलें नंतर उपाध्यक्ष स्थानाचे योजनेविषयीं चर्चा होऊन रा. मनाजी देशमुख यास नेमलें नंतर पुढें खालीं लिहिल्याप्रमाणें मेंबर व चिटणीस वगैरेंच्या नेमणुका झाल्या.

चिटणीस
गणेश बल्लाळ हेडमास्तर म. स्कू. तेल्हारें

अ. चिटणीस
नागोराव पांडुरंग हे. का. तेल्हारे.
मेंबर
१ दानिबा पांडे
२ कोंडोपंत भाऊ
३ पोष्टमास्तर
४ गुलाबचंद दीपचंद साहू
५ तनसुकदास मगणीराम
६ सुकदेव चुणीलाल
७ गणोबा सिंपी
८ किसनदासजी [ हे गैर हजर होते कारण त्यांचा पुत्र नारला होता.]

आणखी आवंतर शेट सावकार वगैरे दोनशें मनुष्य होते सभेचा थाट फार उत्तम रीतीचा ठेविला होता. आराष वगैरे फार चांगली केली होती. प्रथम हे. मास्तर यांणीं सभेचा उद्देश व अशा कृत्यापासून काय फायदे होतात याबद्दल थोडक्यांत चांगलें समजून सांगितलें. नंतर दानीबा पांडे यांणींही चांगले थोडा वेळ भाषण करून सभेकरितां एक दिवस नेमण्याविषयीं सुचविलें वरून विचार होऊन रविवारी १ वाजल्यापासून ४ वाजेपर्यंत ही सभा व्हावी असें सर्वानुमतें ठरलें. नंतर श्री. का. अध्यक्ष यानीं उठून थोडक्यांत एक गोष्ट सांगितली व यापासून फायदा आहे वगैरे पुष्कळ सांगितले नंतर अध्यक्षांनीं सर्व लोकांचे आभार मानून व पानसुपारी होऊन सभा विसर्जन जहाली. सदर्हू सभा पाहतां लवकर फार चांगली होईल असें कालचे घडलेले चिन्हावरून दिसते. उपाध्यक्ष रा. मनाजी देशमुख हे या वेळेस कांहीं बोलले नाहींत खरे परंतु पुढील खेपेस तरी आपले अनुमोदन लोकांस देऊन आपले मनांतील हेतु लोकांस कळवितील अशी आशा करितों. हें कृत्य खरोखर स्तुत्य आहे व अशा लहान शा गावीं अशा गोष्टी घडताहेत तरी तेथील अधिकारी लोकांस भूषण आहे. मला वाटते मारवाडी लोकांत यापासून थोडा सगन झाला नाहीं. परंतु माझी अशी खात्री आहे कीं, ते दोन चार वेळा सतत येतील तर त्यांनां या कामाची विशेष गोडी लागेल- मात्र हातांत धरलें काम त्यांचें पुढारी लोकांनीं सोडू नये. हल्लीं या सभेंत वर्तमानपत्रें ७ येत आहेत व कालचे सभेंत कोंडोपंत भाऊ यांणीं एक वर्तमानपत्र देण्याचे व पोस्टमास्तर यांणीं एक देण्याचें कबूल केलें. सदरील सर्व कृत्यास रुपये १५० सालीना लागतील तर ती रक्कम येथील मोठे संभावित लोकांस फार थोडी आहे ह्मणून याची चर्चा या सभेंत निघाली नाहीं. पुढले सभेंत येविषयीं चर्चा होईल. जी वर्गणी जमेल ती तपशिलवार आपणाकडे लिहून कळवीन. आतां बाकी हकीकत लिहिली आहे पुरें करितों ही विनंती.

आपला एक बातमीदार.

## नोटिस.

नोटिस—मुकुंदलाल नंदलाल साहू राहणार अकोलें यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं माझा मुलगा नारू उमर वर्षे १५ चा याजला मी घरीं नसतां तुमचे शिपायानें जबरीनें आणून त्या मुलाकडून तुह्मी पुरजा करून मागितला असतां त्याणें करून न दिल्या मुळें त्याजला सायंकाळपर्यंत दुकानांत बसवून ठेवून सायंकाळीं सोडून दिलें. व मी असें ऐकतों कीं, त्या मुलाचे नावचा तुह्मी एखादा किंवा कांहीं पुर्जे तयार केले आहेत. जर असें केलें असेल तर मी, जिवंत असतां माझे मुलास बोलावून आणून बसवून ठेवून तुह्मी पुर्जे करून घेणें व त्याची सही अथवा निशाणी दुसऱ्याकडून करविणें हें गैर आहे यास्तव या नोटिशीचे पुढचे वऱ्हाडसमाचारपत्रांत मला तुह्मी कळवावें कीं, यापमाणें तुह्मी कोणी पुर्जा, किंवा पुर्जे करून घेतले कीं काय? घेतले असल्यास किती रुपयांचे करून घेतले व स्टांप कागदावर असल्यास कागद कोणी विकला व लिहिणारा कोण आहे आणि त्यावरील साक्षिदार कोण आहेत व ते लिहिणार आहेत किंवा कसे हें कळवावें. जर या नोटिशीचा जबाब तुह्मी न देतां पुर्जा ठेवून घेऊन पुढें कालांतरानें काढल्यास तो तुह्मी कपटानें खोटा बनविला हें साबित करण्यासाठी या नोटिशीचा उपयोग करण्यांत येईल. हें समजून उत्तर द्यावे तारिख ३१ माहे अक्टोबर सन १८७३ इसवी.

(सही) लक्ष्मण वल्द नवलाजी
माळी चांदुरकार दस्तुर
खुद.

वऱ्हाडसमाचार

मिती कार्तिक शुद्ध १३ शके १७९५

## स्वदेशीय कापड.

प्रस्तुत हिंदुस्थानांत जिकडे तिकडे गडबड चालली आहे कीं इंग्रजी कापड व इंग्रजी पदार्थ उपयोगांत आणूं नयेत. देशी कापड वापरावें व त्याकरितां निवळ देशी कापड विकण्याचीं दुकानेंही मुंबई, पुणें, नागपूर, सोलापुर, वगैरे ठिकाणीं झालीं आहेत. ईर्षा फार उत्तम आहे. व ही अशीच निश्चयानें कांहीं वर्षें टिकून राहील तर हिंदुस्थान देशाचें वास्तवीक कल्याण होईल यांत संशय नाहीं. मोठी आश्चर्याची गोष्ट ही आहे कीं, कापूस उत्तम व विपुल आमचे देशांत पिकतो आणि तो हजारो कोस दूर, विलायतेस जाऊन तेथें त्याचीं वस्त्रें तयार होऊन तीं आमचे देशांत येतात व आम्ही तीं विकत घेतों. यांत दोन वेळां येता जातांचे हजारो कोसावरील भाडें, तिकडील यंत्रांचें भाडें, तिकडील कारागिरांची मजुरी व व्यापाऱ्यांचा नफा इतका बोजा आपले लोकांवर विनाकारण पडत आहे व तेणें करून आपले देशास दरिद्र येत आहे. ही गोष्ट ध्यानांत ठेवण्याजोगी आहे आपले देशांत कापडांचे माग नसते, वस्त्रें विणणारे कारागीर नसते, व कापूस आपल्या देशीं पिकत नसता, तर विलायतेहून आलेलें कापड वापरणें बरोबर होतें. पण जर हीं सर्वे साधनें आपले देशांत आहेत व आपण यांचा उपयोग न करून घेतल्यामुळें आपले देशाचें फार मोठें नुकसान होत आहे, तर आपण लवकर सावध झालें पाहिजे.

आमच्या या लिहिण्यांत असा हेतु नाहीं कीं फक्त साळी व कोष्टी यांचे हात मागावर जसलें वाईट बरें कापड निघेल तसलेंच घ्यावें व यंत्रांच्या सहाय्यानें तयार झालेलें कापड घेऊं नये. मुंबईत, गुजराथेंत वगैरे जे कापड विणण्याचे कारखाने झालेले आहेत. यांतील कापड बेलाशक घ्यावें. ते स्वदेशीय नव्हे असें नाहीं व लोकांनीं इकडीलच कापड घ्यावयाचें असा निग्रह केला ह्मणजे अर्थशास्त्राचे नियमाप्रमाणें गरज पाहून माल तयार होईल ह्मणजे व्यापारी लोक आणखी नवीन यंत्रें आणितील व त्यांत उत्तम माल निघण्याचे कामीं सुधारणा करतील यांत संशय नाहीं. आपले देशांतील लोकांस साधारणपणें लागणारें कापड, घोंगड्या, पासोड्या गाद्या, चादरी, रजया, पागोटीं, धोतरजोडे, लुगडीं, खारवे, मुकटे, गोणपाट, तरटें हीं या देशांतच विपुल होतात. तसेंच विलायती यंत्रें हिंदुस्थानांत आलीं आहेत त्यांतून मांजरपाटही अंगरख्याच्या, बंड्यांच्या व धोतरजोड्यांच्या उपयोगी पडण्या जोगे निघतात व त्यांत दिवसानुदिवस सुधारणा होत जाईल. लोकांचा निग्रह मात्र टिकला पाहिजे. व बारिक तलमसुती जगन्नाथ्या व तऱ्हेतऱ्हेचीं छानछोकी छिटें कांहीं दिवस वार्जिलीं पाहिजेत ह्मणजे तींही आपल्या देशांत लवकरच निघू लागतील यांत संशय नाहीं.

हल्लीं लोकांत स्वदेशीय कापड विकण्याचीं दुकानें काढण्याचा क्रम सुरू झाला आहे हा आरंभास बरा आहे. पण मुख्यत्वें हें झालें पाहिजे कीं लोकांत विश्वास वाढून मोठें भांडवल जमविण्याचा व एकीनें व्यापार करण्याचा चांगला प्रघात पडला पाहिजे व तेणेंकरून सूत काढण्याचीं आणि कापड विणण्याचीं यंत्रें आपल्या देशीं जास्त येऊन तीं जिल्ह्या जिल्ह्यांनीं झालीं पाहिजेत. त्याखेरीज इच्छित कार्यभाग तुटपुंजी कापडाच्या दुकानावर अवलंबून राहून होणार नाहीं. ज्या जिल्ह्यांत जितका कापूस उत्पन्न होतो त्या जिल्ह्यांत तितक्या कापसाचें सूत व कापड तयार होण्यापुरतीं यंत्रें सिद्ध झालीं पाहिजेत व त्यांनां लाखो रुपये भांडवल लागते त्याची तजवीज निघाली पाहिजे. १० रुपयांचा भाग करून व पाच चार हजार रुपये भांडवल जमवून यंत्रांचे महत्कार्य होईल असें नाहीं. मोठमोठ्या लक्षाधीश व्यापाऱ्यांनीं, राजेलोकांनीं व संस्थानिकांनीं मनावर घेऊन मोठाल्या रकमा यांत गुंतविल्या तरच हें काम होण्याजोगें आहे. हत्तीच्या गळ्यांत जवाहिरांच्या व मोत्यांच्या कंठ्या घालाव्या किंवा सोन्याच्या अंबाऱ्या कराव्या त्यापेक्षां हें कृत्य फार अगत्याचें व आपल्या देशाची जतन करण्याचें आहे असें राजेलोकांच्या ठायीं ईश्वर कृपेनें उपतिष्ठलें पाहिजे. व देशाचें नष्टचर्य संपण्याची वेळ आली असेल तर तसें घडेल यांत संशय नाहीं. इंदुरचे श्रीमंत होळकर सरकार यांनीं आपल्या राजधानींत एक कापड विणण्याचें यंत्र आणिलेलें आहे. असेंच शिंदे, गायकवाड, निजाम इत्यादि मनावर घेतील तर त्यांस कांहींच अवघड नाहीं.

आमचे वऱ्हाडांत लक्षावधि रुपयांचा कापूस प्रतिवर्षीं पिकतो. पण तो तयार झाला पुरें कीं त्याच्या गठड्या होऊन त्या थेट विलायतेस जातात. शेतांतून कापसाची रोपें आहेत तोंच शेतकऱ्यास कापसाकरितां पैसा बहद्दानें मिळत असतो. कापूस दाबून गठड्या करण्याकरितां खामगाव, उमरावती, अकोट, शेगाव इतक्या ठिकाणीं मिळून कोट अर्धकोट रुपये किमतीचीं यंत्रें पडलेलीं आहेत व त्यांतून हंगामांत हजारो मनुष्य रात्रंदिवस खपत असते पण ही कर्तबगारी कोणाची व भांडवल कोणाचें ह्मणाल तर युरोपियन लोकाचें. हिंदुलोकांच्या कपाळीं अजून इतकी योग्यता आली नाहीं. मुंबईच्या व्यापारी कंपन्यांच्या वऱ्हाडांत शाखा आहेत व त्यांजवर युरोपियन लोकच एजंट आहेत आणि त्यांची ही घरायोड आहे, उमरावतीस व खामगावास नेटिव सावकार ही बरेच आहेत पण ते सर्व एक मिळून कापडाचें व सुताचें एकादें तरी यंत्र वऱ्हाडांत आणतील व त्याच्या योगें परदेशीं नेण्याकरितां कापूस दाबून गठड्या करण्याचें एकादें यंत्र तरी उभें पडून नेटिवांस जय आला असें पाहण्याचा दिवस आमच्या वऱ्हाडांत कधीं, येईल काय? ईश्वरा, अनाथ व दीन दुबळ्या देशाची तुला काळजी!

## बडोदा संस्थानची चौकशी

बहुत दिवस बडोदा संस्थानच्या अव्यवस्थे विषयीं बोभाट चालू होता व तो वाढत वाढत शेवटीं इंग्लिशसरकारानें चौकशीकरितां एक कमिटी नेमण्याचें मजलेवर येऊन पोचला हे पाहून आम्हांस फार वाईट वाटते. मोठ मोठ्या हिंदुराज्यांच्या अशा अव्यवस्थेने धुळधाण्या झाल्या आहेत तरी आमचे नेटिव राजे अजून डोळे उघडीत नाहींत हें राष्ट्राचें मोठें दुर्दैव होय. सांगली संस्थानिकास आपला राज्यकारभार चांगला चालवितां येईना ह्मणून त्याजवर एक युरोपियन कामदार देखरेखी करितां नेमिल्याचें याच आठवड्यांत वर्तमान आहे. सातारा जिल्ह्यात जत संस्थानांत अव्यवस्था झाली ह्मणून तिकडेही सरकारानें अशीच एक नेमणूक केली. व आतां हे मोठें राज्य बडोद्याचें याची गति कशी होईल तें सांगवत नाहीं चौकशीकरितां कमिटीदार नेमिले आहेत ते येणेंप्रमाणें—

प्रेसिडेंट
१ कर्नल मीड. पोलिटिकल एजंट.
मेंबर
१ मि. रावनस्क्राफ्ट मुंबईचे कलेक्टर
१ कर्नल एथरीज इनाम कमिशनर.
१ नवाब फैएजअलीखान जयपुरचे दिवाण

४

आतां ही कमिटी बडोद्यास जाऊन व वकरच आपले कामाची सुरवात करील. यांत एक इनाम कमिशनर कां नेमिले तें कळत नाहीं. बाकीचे मेंबर फार चांगले आहेत व प्रेसिडेंट आपलें काम निष्पक्षपातानें उत्तम करितील असा बडोदे सरकारांनीं भरवसा बाळगावा. श्री. मल्हारराव गायकवाड यांस त्याचे तर्फे एक मेंबर निवडून घ्यावा असे विचारिले होतें पण त्यांनीं ती गोष्ट मान्य केली नाहीं असें ऐकतो. श्री. मल्हाररावाचे भोंवतीं जे दुर्जन लोकांचें कडबाळ आहे तें त्यांनां चांगल्या गोष्टीकडे वळूं देत नाहीं हेंच सर्व नाशाचें मूळ दिसतें. कर्नल फेर साहेब बडोद्याचे रेसिडेंट यांची कांहीं वागणूक गोंठी तऱ्हेवाइक दिसते. मि. दादाभाई नवरोजी यांस विलायतेस सल्ला मसलत पुसावी असा मल्हाररावांचा विचार होता त्यास रेसिडेन्टानीं हरकत आणिली व तसे न करण्याविषयीं ताकिद दिली. याच प्रमाणे मि० श्रीपाद बाबाजी टाकूर असिस्टंट कलेक्टर सुटींत बडोद्यास गेले होते त्यांवर रेसिडेंट साहिब फार खपा झाले व श्रीपाद यांस तेथून त्यांनीं काढून दिले असे कळतें. टाइम्स कर्ता ह्मणतो कीं अशा गोष्टी लक्ष्यांत घेतल्यास रेसिडेंट साहिबानें डोकें बिघडलें (त वेडे झाले) असे ह्मणणे भाग आहे.

## वऱ्हाड

कमिशनर साहेबांची स्वारी वाशिमाकडे गेली. डिपुटि कमिशनर साहेब अकोले तालुक्यांत फिरत आहेत ते आज उद्या परत येतील. मि० डनलाप साहेब तालुक्यांत फिरत आहेत. मि० नीलिस साहेब रजेवर आहेत मिळून एकही न्यायाधीश तूर्त येथें नाहीं. विद्याखात्याचे डायरेक्टर व इन्स्पेक्टरही फिरावयास गेले आहेत.

—०००—

मेजर बुशबी साहिब डिपुटी कमिशनर विलायतेस रजेवर गेले होते ते मुंबईस आले उद्या इकडे येणार व तूर्त त्यांनां अकोल्यास नेमणार असें समजतें.

—०००—

एक्झिक्युटिव कमिशनर व जुडिशियल कमिशनर वऱ्हाडाकरिता निरनिराळे करण्याविषयीं बहुत दिवस वाटाघाट चालली होती तिजविषयीं अलीकडे असे वर्तमान आलें आहे कीं हिंदुस्थान सरकारानें त्याविषयीं विलायत सरकारची मंजुरी मागितली आहे व मेजर नेमाईड साहेब यांस एक्झिक्युटिव कमिशनर आणि मेजर अलाहाईस साहेब यांस जुडिशियल कमिशनर करण्याविषयीं लिहिलें आहे.

—०००—

मि० रिवेट कारनाक साहेब यांविषयीं सिमल्याच्या तारेवरून इंग्लिशम्यान नावाच्या वर्तमानपत्रांत असें लिहिलें आहे कीं त्याविषयीं हिंदुस्थान सरकारचा कायमचा ठराव अजून कांहीं झाला नाहीं न तो बहुधा सक्त होईल. यांस सस्पेंड करून फार दिवस झाले न त्यांची पहिली चाकरी चांगली झालेली आहे या साठीं तूर्तातूर्त त्यांस कामावर हजू केलें आहे नंतर ठराव मागाहून होईल.

एजीस ...कान कार्टीचे काम तूर्त मि० बुलक साहेब यांनीं पहावे असा रेसिडेंट साहिबाकडून तारायंत्र द्वारें हुकूम आला आहे असें समजतें. पण एलिचपुराहून इस्टाब्लिशमेंट अजून आलेच नाहीं.

—०००—

अकोला हायस्कुलाच्या प्रवेश परिक्षेत ६२ मुले पास झालीं असे कळतें त्याविषयीं व परिक्षेविषयीं विशेष पुढें लिहूं.

## वर्तमानसार

इंदुर आणि धार यांचे दरम्यान हद्दीचा कांहीं तंटा आहे. व त्याची चौकशी कर्नल वाटसन साहेब पोलिटिकलएजंट याजपुढें २४ वे तारखेस सुरू होणार आहे.

मारवाड देशांत मल्याणी परगण्यांत दुष्काळ पडण्याचा रंग आहे. व त्याचे निवारणार्थ कांहीं तजविजी चालू आहेत.

राज्यस्थानामध्यें प्रतापगड आणि बनस्वारा या दोन संस्थानामध्यें गावांच्या शिवेच्या संबंधानें मोठा तंटा होऊन छोटीशी लढाई झाली. ४० मनुष्यें मरण पावलीं व ६० मनुष्यें जखमी झालीं असें कळतें.

पंचमहाल प्रांतीं एका सामान्य आगेवानास एका तरुण्यास सहा वर्षे प्रतिबंधांत ठेविलें आहे. त्यास कोठें नोकरी करूं देत नाहींत व बाहेर जाऊं देत नाहींत असे गुजराथमित्रावरून समजतें.

वकीलांची परीक्षा मुंबईस वर्षास होते ती बंद करावी आणि एल. एल.बीची परीक्षा पास झालेले लोकांस वकीलीं करूं द्यावी अशाविषयीं सरकारास ला असोसियेशन सभेनें अर्ज केला आहे.

बंगाल्याकडे या वर्षी पाऊस चांगला झाला नाहीं ह्मणून दुष्काळाचें भय उत्पन्न झालें आहे सिमल्याहून नामदार गवरनर जनरल साहेब त्यासाठीं कांहीं तजविजी योजण्याकरितां या आठवड्यांत कलकत्यास गेले आहेत.

दिल्ली ग्याझिटांत लिहिलें आहे कीं नोनेर परगण्यांतील बहाली मोलवी तोफा, बंदुका ओतीत आहेत व त्यांजवळ ३०० घोडेस्वार आणि ७०० पायदळ शिपाई आहेत.

बंगाल टाइम्सवरून कळतें की पारीस शहरीं चालू वर्षाच्या पहिल्या सहा मांहींत घोडे, खेचरें व गाढवें मिळून एकशें शायशीं जनावरें लोकांनीं खाल्लीं गाढवखा... त्यांपैकीं देतील मजल येऊन पोहोचली!

फ्रान्स देशांत शेंकडा २२ मुलें उजव्या बाहुल्याचीं आंधळनात यानीं कारणे अशीं आहेत कीं मोठमोठाल्या शाळांतून उजेड कमी, बसण्याच्या जागा गैरसोयीच्या आणि लिहिण्याची मेजें फार ठेंगणीं. मेजें ठेंगणीं असल्या मुळें लिहिणाराचे पाठीस पोंक येतात हें ह्मणणें पुष्कळ अंशीं खरें आहे.

नेटिव सिविल सरव्हंट बाबू सुरेंद्रनाथ बानरजी यांजवरील आरोपाची १९वे तारखेस चौकशी सुरू होणार आहे. मि० फिल्लिप साहेब त्या कामीं प्रेसिडेंट नसणार आहेत.

विलायतेंतील कोणकोणते जिन्नस येतात त्यांवर रा. रा. विष्णु शास्त्री पंडित यांच्या कर्त्याची कविता.

कटाव

पहा केसा आळस्याचा,
परिणाम दुस्तर झाला,
व्यापार सर्व बुडाला ॥ ध्रु ॥
देशी वस्तुची पायमल्ली,
इंग्रजि वस्तुनीं अतिशय केली,
नाहीं तिळभर जागा राहिली.
चिंतेनें जनमनें व्यापिलीं,
कारागिरांचीं दारें झाकली,
उपास लोकें काढु लागलीं,
पोरें बाळें नकोशि झालीं,
माणसें देशोधडी लागलीं,
कितीक मेलीं कितीक वाचलीं,
कितीक भिक्षा मागु लागलीं,
दांतीं तृण धरुनिया बैसलीं,
हाहाकारें भूमि व्यापिली.
धाय मोकलुनि रडूं लागलीं,
कोण आह्मा तारिल माउली,
आह्मा नाहिं काय कोणिच वाली,
हीच वैखरी भरोनि उरलीं,
क्षय द्रव्याचा ॥ पहा केसा ०॥ १ ॥
धोत्रें उपरणी पंचे जोड्या,
कुडत्या जाकिटें सदरे बंड्या,
बुताव बिरडीं अंकडे गुंड्या,
बत्या टोप्या फेटे पगड्या,
टेप फिती आणि दाल नाड्या,
लुगडीं लहंगे चोळ्या साड्या,
मेणबत्या आगिल्या काड्या,
तंबाखूचे विरूट वीड्या,
छड्या सोडगे काच्या लकड्या,
गळास झुंबरे झाडें हंड्या,
शिग्राम ब्राहेम फेटन गाड्या,
पुडी अगि डोकाच्या शेगड्या,
पेट्या आणि लखबत्ते दगड्या,
मापें वजनें कांटे दांड्या,
या मालाच्या येऊनि छकड्या,
देशि वस्तुंच्या झाल्या चिंधड्या,
क्षयद्रव्याचा ॥ पहा केसा० ॥ २ ॥
भरलि विलायत गेही दारीं,
सुई टांचणी चाकु कातरी,
टांक लेखणी लाल दोरी,
शाई कागद वाळु बरोरी,
आरसा वस्त्रा चिमटा अणि सुरी,
पायमोजे वर बूट गार्टरी,
हनमोजे अंगरखे बिजारी,
रुमाल अणि गळबंद कुपरी,
खुर्ची मेजें नाचें परोपरी,
पेले चमचे कांटे तगारी,
गोळ्या चूर्णें रस पिचकारी,
गोडी पेष्टा सुरा आसुरी,
सारंग्या अणि बाजे सतारी,
तंबुर झेंगट शिंग तुतारी,
बंदुक पिस्तुल आणि तलवारी,
कुठवर वर्णावीं हीं सारीं,
क्षय द्रव्याचा ॥ पहा केसा० ॥ ३ ॥

सु. प.

मुंबई इलाख्यांतील तुरुंगाबद्दल जो एक कायद्याचा मसुदा मुंबई कौंसिलापुढें आहे त्याचें वाचन सुरू झालें असतां अद्याप त्याचें देशभाषेंत भाषांतर झालें नाहीं व पुढेंही प्रसिद्ध होण्याचा रंग नाहीं हें पाहून नवल वाटतें. तुरंगाच्या व्यवस्थेशीं लोकांचा फारसा संबंध नसल्यामुळें भाषांतर करण्याचें कारण नाहीं असें कायदेकारांचें मत असल्यास तें त्यांचे चुकीचें आहे. या इलाख्यांतील तुरुंगांच्या व्यवस्थेशीं एतद्देशीय लोकांचा फारच निकट संबंध आहे. तुरुंगांत जाणारे सर्व नेटिवच असल्यामुळें, त्यांस तिथें कशा प्रकारें वागविलें जाणार, त्या वागविण्यांत कोणते दोष आहेत व ते कसे सुधारले पाहिजेत, इत्यादि गोष्टींविषयीं विचार करणें व आपआपले अभिप्राय देणें अगर ते दोष सुधारण्याविषयीं योग्य उपाय करणें आह्मा लोकांचें काम असल्यामुळें त्या बिलाचें भाषांतर करून प्रसिद्ध करणें व त्याबद्दल त्या लोकांच्या अभिप्रायाचे विचार करणें कायदेकारांस भाग आहे असें ठरतें.

अ. ट.

देशीकापडाचें दुकान. धुळ्यासही विजयादशमीच्या मुहूर्तानें स्थापन झाल्याचें आमच्या समजण्यात आलें आहे. याप्रमाणें देशीकापडाचीं दुकानें मुंबईत १, सोलापुरास १, नागपुरास १, पुण्यास ३ व धुळ्यास १ अशीं ७ दुकानें स्थापन झालीं आहेत.

खडकवासल्याचा बंधारा. या बंधाऱ्याचें सर्व काम संपलें थोड्या दिवसांतच पाटांत पाणी सोडण्याची सुरुवात होईल व ती झाली ह्मणजे पुण्यांतील पाण्याचें दुर्भिक्ष मोडेल. टाइमस आव इंडियानें प्रसिद्ध केल्याप्रमाणें पुढच्या हकीकतीवरून हें केवढें मोठें काम आहे हें लक्षांत येईल. पुण्यापासून सुमारें ६ कोसांच्या अंतरावर खडकवासल्या नजीक मुठानदीस बांध घातला आहे. एकंदर लांबी सुमारें ३४०० फूट असून उंची १०० फूट आहे. बांधाचें दगडी काम सुमारें ७८,००,००० घन फूट आहे. या कामास सन १८६८ च्या डिसेंबर महिन्यांत आरंभ झाला. नदीस बांध घातल्यामुळें वरच्या बाजूस जो मोठा तलाव झाला आहे त्याची लांबी ७ कोस व रुंदी सरासरी अर्धा कोस आहे. तळ्याच्या मध्यभागच्या पाण्याची खोली ८९ फूट आहे. तळ्यापासून जो पाट काढला आहे त्याची सरासरी रुंदी ३९ फूट असून तो पुण्यापर्यंत अगदीं तयार झाला आहे. पुण्यापासून तळ्यापर्यंत १२ मैल व तेथून पुढें तळ्याची लांबी १४ मैल, एकूण २६ मैल पर्यंत तलावांतून व पाटांतून होड्या चालण्यासारखें पाणी सांपडणार आहे. तलावांतून पाटांत होड्या नेण्याकरितां बंधाऱ्याजवळ एक यंत्र ठेवणार व त्याच्या योगानें तळ्यांतील होड्या पाटांत व पाटांतील तळ्यांत उचलून ठेवणार पाटांतून सुमारें ४५० घन फूट चालावयाचें. हें एवढें मोठें काम बांधण्यांत आजपर्यंत एकंदर खर्च सुमारें ४९ लक्ष रुपये झाला. बंधाऱ्याच्या पाण्यापासून सुमारें १५० चौरस मैल जमीन भिजावी असा अजमास आहे.

ने. शं.

## इनामकमिशनचा उकिरडा पुन्हा व्यर्थ उकलला.

आह्मांस लिहिण्यास अतिशय विलक्षण आश्चर्य वाटतें कीं, ज्या सरकारच्या लुटालुटीविषयीं दिगंत कीर्ति झाली, ज्याच्या वाईटपणाविषयीं सर्व एतद्देशीय व पुष्कळ युरोपियन लोकांची खात्री झाली व ज्याच्या दरोडेखोरांस द्या अलौकिक

कल्यामुळे या इलाख्यातील लोकांचीं मनें अतिशय खळबळून जाऊन अगदीं दंगा होण्याच्या बेतावर आलीं होतीं व कितीएक सुज्ञ व विचारी युरोपियन कामगारानीं दक्षिण महाराष्ट्र देशांत घोटाळा होण्यास हेच खातें बहुतेक अंशीं कारण झालें ह्मणून ह्मटलें. त्या खात्याच्या चांगुलपणाविषयीं, परोपकारबुद्धीविषयीं आणि त्याच्या योगानें देशांत स्वस्थता झाल्याविषयीं हकीकत सांगून त्याजबद्दल लोकांच्या मनांत पूज्यबुद्धि उत्पन्न करण्याच्या हेतूनें त्याच खात्याचे कामगार यांनीं लोकांच्या डोळ्यांत धूळ टाकण्याचा व सरासरी फसविण्याचा प्रयत्न हल्लींच्या काळीं करावा. इनाम कमिशन खात्याचा दुर्लौकिक सर्वत्र झालेला असतां त्याचें पुनःपुनरुज्जीवन करण्यात आणि अपूर्व्या महितानें त्यावर वेडेंवांकडें कांहीं तरी लिहून ग्रंथ काढण्यास प्रवृत्त व्हावें हा मोठा चमत्कार आहे. डयुक आफ आरगाईल यांनीं सुचविल्यावरून मुंबई सरकारानें कर्नल एथरिज इनाम कमिशन खात्याचे हल्लींचे कामगार यांस त्या खात्याचा इतिहास लिहावयास सांगितल्यावरून त्यांनीं "नारेटिव आफ धि इनाम कमिशन" ह्मणून स्तुतिपाठाचें स्तोत्र तयार केलें. आणि तें सरकारानें छापून प्रसिद्ध केलें. त्या इनाम कमिशन स्तोत्राची एक प्रत सरकारानें मेहरबान होऊन आह्माकडे पाठविली तिचा आह्मीं आभारपूर्वक स्वीकार करून त्या ग्रंथाच्या योग्यतेविषयीं इग्रजींत सप्टेंबरच्या २९ व्या व या महिन्याच्या २० व्या व आजच्या या तारखांत थोडेंसें कथन केलें आहेत; परंतु आमच्या मराठी वाचकांकरितां त्याची थोडी हकीगत सांगितली पाहिजे. असावें एक, बोलावें एक, आणि वाईट केलें तें चांगलें केलें ह्मणून प्रतिपादन करावें हा विलक्षण धारिष्टाचा व अलौकिक खरेपणाचा प्रकार सुधारलेल्या इंग्रज लोकांडून होणें अशक्य आहे असे हा ग्रंथ पाहिल्यावरून ह्मटल्याखेरीज राहवत नाहीं. आतां याजबद्दल सरकार, त्यांचे कामगार व बानिंगानेटच्या शिडिणाऱ्या सारखे युरोपियन यांस वाईट वाटल्यावांचून व राग आल्यावाचून राहणार नाहीं; परंतु आमचा नाइलाज आहे. आमचें ह्मणणें इतकेंच आहे कीं, जुनी घाण आतां उकरून काढून पुनः तो सुवास आहे ह्मणून सांगण्याचा सरकारानीं प्रयत्न करावयाचा नव्हता. असो, जें आमच्या पुढें आलें त्याचा विचार करणें आमचें कर्तव्य आहे मग तें कोणास आवडो न आवडो, आह्मांस करणें प्राप्त आहे.

आमच्या इंग्रजी वाचकांकरितां जसें या नवीन ग्रंथाचा खोटेपणा अगर व्यर्थपणा दाखविण्याचें प्रयोजन आहे तसें आमच्या मराठी वाचकांस दाखविण्याचें कारण नाहीं. कारण आमच्या बहुतेक एतद्देशीय मराठी वाचकांस इनाम कमिशन खात्याची चांगली माहिती व नित्येकास तर स्वतांचाच अनुभव आहे. शिवाय एतद्देशीय वर्तमानपत्रांत कोणी बाबे ग्याइट सारखा इनाम कमिशन भक्तही स्तुतिपाठ गावयास उभा राहिला नाहीं. यास्तव त्या ग्रंथाचे फक्त स्वरूपमात्र लोकांस कळविण्याचें आमचें काम आहे. हा ग्रंथ हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी, राजे, जहागिरी, सरंजाम. इनामें वगैरेंचा स्वाहा करण्याकरितां झालेला लार्ड डालहौसी साहेबांचा अवतार त्यांचे परम भक्त डयुक आफ आरगाईल यांनीं तारिख ४ एप्रिल सन १८७१ च्या नंबर २३ च्या पत्रांत फर्माविल्या हुकुमावरून मयत इनाम कमिशन व सिंवत सेटलमेंटखातें यांजकडील कामगार कर्नल आल्फ्रेड टामस एथरिज यांनीं तयार केला असून पुण्याच्या डेकन हेरल्ड छापखान्यांत मुंबई सरकारच्या दप्तरापैकीं नंबर १३२ चें पुस्तक ह्मणून प्रसिद्ध झालें आहे. कर्नल एथरिज यांनीं स्टेटसेक्रेटरी यांच्या हुकुमास अनुसरून इनाम कमिशन खातें यांनीं कायदा होण्यापूर्वीं केलेल्या कामासुद्धां व त्याजपासून पैशासंबंधीं झालेला परिणाम या सर्वांच्या हकीकतीचा ह्मणून तारिख २१ एप्रिल १८७३ रोजीं केलेला हा रिपोर्ट आहे. याजवर सरकारचा तारिख ६ माहे मे सन १८७३ इसवी चा नंबर २१६८ चा ठराव झाला तोही या रिपोर्टाच्या आरंभीं या ग्रंथांत छापिला आहे. यांत कर्नल एथरिज यांनीं हें महत्वाचें काम उत्तम व समाधान वाटण्यासारखें केलें ह्मणून लिहिलें आहे. तसेंच इनाम कमिशन खात्याचें मूळतत्व व बीज यांजविषयीं सरकारचा अभिप्राय सांगण्याचें कांहीं कारण दिसत नाहीं; परंतु या खात्यांतील त्या योग्य कामगारांची सरकार व रयत यांचा न्याय करण्याचीच वास्तवीक बुद्धी होती याजविषयीं व त्यांगीं आपलें काम इतके बेताने व बिनचूक रीतीनें केलें कीं, त्याच्या योगानें मुंबई इलाख्याच्या साधारण मुलकी संबंधीं कारभारांत अत्यंत मोठा लाभदायक परिणाम झाला अशी आमची खात्री आहे असें सरकारानें त्या ठरावांत ह्मटलें आहे. शेवटीं त्याणीं आणखी असें सांगितलें कीं, कर्नल एथरिज यांचा हा उत्तम थोडक्यांत रिपोर्ट यापुढें दाखल्याकरितां आधाराकार त्या पद्धाण्यास फार उपयोगी पडेल, सबब तो छापून प्रसिद्ध करावा. आतां सरकारानें इनाम कमिशनच्या मूळतत्वाच्या वगैरेविषयीं आपला अभिप्राय कां गुप्त ठेविला हें समजत नाहीं. एरवीं त्या खात्यांतील कामगारास दोषमुक्त तर काय पण उलट त्यांची उत्तम तारिफ केली आहे. आणि कर्नल एथरिज यांचा रिपोर्ट तर केवळ वायबलच करून सोडलें आहे.

कर्नल एथरिज यांच्या इनाम कमिशन नारेटिव वाचतांना या खात्याचे उत्पादक बडे सिविलसर्विसपैकीं याहुदी ज्यास निशयनेंत व सर्व पृथ्वींतील मारवाडी असें समजतात त्या लोकांपैकीं व त्या धर्माचे मुंबई इलाख्यांत अनेक कारणांनीं प्रसिद्ध झालेले गोल्डस्मिड साहेब हे होते असें सांगितलें आहे. रेविन्यु सर्वे खात्याचे सुपरिंटेंडेंट असतां यांस धारवाड व बेळगाव जिल्ह्यांत गाव व जमिनी यांच्या आनेशय देणग्या आहेत असें पाहून त्या सरकारांत खालसा होण्याकरितां तजवीज व्हावी अशाविषयीं त्यांनीं उद्योग आरंभिला. या दुमालयांपैकीं पुष्कळ देणग्या लबाडीनें संपादन केलेल्या लोकांच्या वहिवाटींत आहेत सबब यांची चौकशी झाली पाहिजे असें तारिख २५ सप्तेंबर सन १८४१ इसवीच्या रिपोर्टांत सरकारास सुचविलें. शिवाय या चौकशींकरितां पेशव्यांच्या दप्तराचा उपयोग करावा अशीही त्यांनीं सूचना केली, यावरून सरकारानीं यांची सूचना ता. ७ आक्टोबर १८४१ रोजीं मान्य केली. आणि मग त्यांचीच नेमणूक दप्तरावर केली. त्यांनीं १८४२ सालच्या अखेरीस दप्तराची त्या वेळेस होण्यासारखी होती तेवढी दक्षिणमहाराष्ट्र देशासंबंधी कागदपत्रांची व्यवस्था केली. आणि या दप्तरावरून पुढें सरकारानें ता. १६ जून १८४३ रोजीं चौकशीकरितां गाल्डस्मिड साहेब व रा. ब. मोरोपंत तात्या प्रान्तसपल सदर अमीन यांची इनामकमिटी नेमिली नंतर या कमिटींत ता. १७ जानेवारी १८४४ रोजीं इनामकमिशनचे मुख्य पुरस्कर्ते हार्टसाहेब यांची नेमणूक झाली. आतां या कमिटीनें चौकशी सर्व पेशवेदप्तर लागण्याच्या पूर्वीं सुरू केली हे किती न्यायाचें आहे हें उघडच आहे. कारण हें दप्तर व बाहेरच्या लोकांपासून दावडे घालून आणलेलें दप्तर १८६२-६३ पर्यंत तर लागले नव्हते हें प्रसिद्ध आहे.

असो या कमिटीनें काम सुरू झाल्यावर तीन वर्षांनीं हार्ट साहेब यांनीं तारिख ३ नोवेंबर १८७३ रोजीं बेळगांवचे कलेक्टर मि. रीवस, धारवाडचे जज्ज मि. फ्रियर, धारवाडचे कलेक्टर मि. मान्सफिल्ड रोवेन्युसर्वेचे सुपरिन्टेंडेंट कप्तान. व इतर लोक ( त्यांचीं नांवें दिलीं नाहींत ) यांस असें विचारलें कीं, या कमिशनप्रकरणीं सामान्यतः लोक काय ह्मणतात, त्यांच्या पोटांत भीति, अविश्वास अथवा असंतोष उत्पन्न झाला आहे कीं काय? हें चौकशीचें काम कलेक्टर वगैरे त्यांच्या हाताखालचे लोकांपेक्षां इनाम कमिटीच्या लोकांकडून बरें होईल किंवा कसें. आतां या विचारण्यांत हार्ट साहेब यांचा काय वास्तविक हेतु होता हें कळत नाहीं परंतु आमचे वायबलकर्ते यांनीं आपल्या गुरुजीच्या चतुर दूरदर्शीपणाची वाखाणणी केली आहे. अर्थात या विचारण्याचीं उत्तरें नावें दिलेल्या कामगारांकडून अशीं आलीं कीं या इनाम चौकशीपासून इनामदार लोकांखेरीज इतर लोकांत भीति, अविश्वास व असंतोष हीं उत्पन्न झालीं नाहींत व कलेक्टर व त्यांचे असिस्टंट वगैरे कामगार यांस त्यांचे स्वतांचे चालू कामच अतिशय असल्यामुळें त्यांच्यानें हें काम चांगलें होणार नाहीं व याजकरितां निराळे कमिटीच्या सभासदांसारखे त्याच कामाचे माहितगार असे कामगार पाहिजेत. आतां या प्रश्नोत्तरांविषयीं आह्मांस असें वाटतें कीं आपण चालविलेला क्रम निर्मळ, न्याय्य व लोकप्रिय होण्यासारखा नसून भीति, अविश्वास व असंतोषउत्पादक आहे असें त्या प्रश्न विचारणारांच्या पोटांत वागल्यावाचून त्यांनीं विचारलें असें संभवत नाहीं. कारण रास्त न्याय जेथें होण्याचा संभव असेल तेथें असे प्रश्न विचारण्याचें मुळीं कारणच नाहीं. न्यायकोर्टें स्थापन झालीं त्या वेळेस जज्जांनीं असे प्रश्न विचारल्याचें कोठें ऐकिवांत नाहीं. शिवाय हार्ट साहेब यांस त्या कामाचा चांगुलपणा दाखवून व ते कलेक्टर वगैरे कामगारांकडून होणार नाहीं असें नवीन खातें उत्पन्न करावयाचें होतें यास्तव हा प्रश्नोत्तरांचा घाट घातला होता परंतु तुर्त आह्मांस अगोदर असा संशय येतो कीं ज्या सर्व कामगारांस हे प्रश्न पाठविले त्यांचीं नांवें व उत्तरें एथरिज साहेबांनीं दिलीं नाहींत तेव्हां त्यांत कांहीं त्यांच्या इच्छेविरुद्ध होतीं कीं काय कोण जाणे. अर्धवट काम केल्यानें लोकांस संशय येतो आणि आतां ज्याअर्थीं इनाम कमिशनचा उजळणाथा करावयाचा प्रयत्न आहे त्याअर्थीं सर्व जगापुढें मांडावें हा उत्तम मार्ग होय. असो, तूर्त आज इतकेंच आह्मीं आमचें ह्मणणें पुरें करितों.

इं. प.

---

## नोटिस.

नादारी.
मुकदमानंबर १०
सन १८७३

विद्यमान बापुजी रंगनाथ ए. अ. कमिशनर साहेब बहादूर कमिशनर नादारीकोर्ट उमरावती.

नोटिस

रहाणार तालुके यांस कळावें कीं, तानासा वल्द मणीकसा लाड रहाणार कारंजे हा नादार आहे असा तारिख ६ माहे आकटोबर सन १८७३ इसवी रोजीं ठराव झाला आहे आणि तारिख ८ नोवेंबर सन १८७३ इसवी हा दिवस नादाराच्या सावकारांनीं जमण्याकरितां आणि सावकारांनीं आपले तर्फेचा अगाइना नेमून देण्याकरितां, नादारानें आपले सुटकेविषयीं दिलेल्या अर्जाचा विचार करण्याकरितां नेमलेला आहे.

नादाराच्या सुटकेवर ज्या सावकारांचा तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्याबद्दल आठ आण्याचे स्टांपकागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटिस द्यावी. त्या नोटिशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल ते आधार आणि त्याजबद्दल ज्यास साक्षीसमक्ष करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नावें नमूद करावीं. ही नोटिस जमण्याकरितां नेमिलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वीं दाखल केली पाहिजे.

कोर्टांत आफिशियल असाइनींच्या कचेरींत सावकारांनीं पाहण्याकरितां नादारानें केलेली यादी उघड्या ठेविल्या आहेत.

नादारावर दावे ज्यास रजिस्टरीं दाखल करणें असतील त्यांणीं आठ आण्याचे स्टांपकागदवर अर्ज करून रजिस्टर करून घ्यावे. ह्या अर्जांत दावे लिहून त्यावर ते दावे खरे असल्याबद्दलचा प्रतिज्ञालेख लिहून त्यावर अर्जदारानें सही केलेली असावी.

जे सावकार दूरचे रहाणारे असतील त्यांणीं आठ आण्याच्या स्टांपावर दाव्याची यादी लिहून एकाद्या जुडिशियल आफिसरापुढें तिच्या खरेपणाविषयीं शपथ लिहावी. आणि ती यादी टपालांतून कोर्टास पाठवावी ह्मणजे ते दावे रजिस्टरीं दाखल होतील.

तारिख माहे सन १८७३ इसवी मुकाम.

बपुजी रंगनाथ
कमिशनर नादारी कोर्ट.

---

हे पत्र अकोला येथ लडेराव बाळाजी फडकेयांचे वऱ्हाडसमाचार छा. छा. प्र.

Registered N° 4—1872.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ७ अकोला, रविवार ता० ९ नोवेंबर सन १८७३ इ० अंक ४५


## जाहिरात.

### वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डांकहाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| अखेर | २ |

### नोटिशीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| " दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरखबर.

सर्व लोकांस मी चिमणाबाई मर्द भोलू लाळ कायत राहणार अकोला या नोटिशी वरून जाहिर करते कीं माझें वय सुमार ७५ वर्षांचे आहे मी दोन्ही डोळ्यानीं आंधळी आहे विठू वल्लद हनमंता कुणबी हा दोन तीन महिने मजपाशीं कांहीं वित्त विषय आहे ह्मणून टपून राहून लाडी गोडी व ममता दाखऊन ह्मणाला कीं मी तुझे जवळ पुत्रा प्रमाणें राहून तुझें पालन पोषण करितो. मीं आतुर होते सबब कबुल केले व तो आपले आई बाप चुलते वगैरे ५।६ जणा सुद्धा माझे घरीं येऊन राहिला त्या वरून ममतेच्या पोटीं मी त्यास पाळक पुत्र ह्मणून कागद करून दिला. त्यांत त्यानें मी जिवंत आहे तों पर्यंत माझे पैशास हात लाऊ नये व मला पोटाला घालावें आणि मी मेल्या मागें माझी सर्व जिनगी घ्यावी. असें लिहून दिलें होते पण त्या प्रमाणें त्याने वागणुक केली नाहीं. कागद होउन एक महिना झाला नाहीं तोंच माझी पुरून ठेविलेली जिनगी सुमार १६० रुपयाची व रोकड रुपये १४० चोरून घेऊन गेला व हळू हळू आपले रावें लटके देशी घेऊन गेला व मागून एकटा येऊन मला अतिशय गांजून त्रास देऊ लागला. पोटाला देईना उपास पाडू लागला तेव्हां मीं फौजदारींत फिर्याद केली त्या वरून चौकशी होऊन त्याला १ महिन्याच्या कैदेची सजा झाली आहे असा तो लुच्चा मनुष्य ठरला व त्यानें करार तोडला सबब आज मित्ती पासून मी त्याचा दस्तैवज रद्द केला आहे. या उपर त्याचा माझा अर्थी अर्थी कांहीं संबंध नाहीं हें सर्वांस कळावें. तारिख ९ नोवेंबर सन १८७३ इसवी.

( सही ) चिमणाबाई मर्द भोलु लाळ कायत रहाणार अकोला.

## नोटिसा.

नोटिस—गुलाबचंद ईश्वरदास दुकान धानोरे तालुकें जळगाव जिल्हा अकोट यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुह्मी तारिख १२ माहे आक्टोबर सन १८७३ इसवीरोजीं वऱ्हाडसमाचारपत्रांत नोटिस दिली कीं आमचे खातेबाकीबद्दल रुपये २५० घेणें आहेत. व घरांचे १८० रुपयांस दिलें असून तुह्मी आमचे जवळून २५० रुपयास परत घेतले व लाभाची बाकी रुपये ७० मिळून रुपये ३२० घेणें गिघनात वगैरे मजकुराची तुह्मी नोटिस दिली त्याचा जबाब असा आहे कीं, तुमचे खातेबाकी बद्दल रुपये चार पंचासमक्ष २२३ निघाले त्यांत आह्मी धाब्याचें घर तुह्मास १८० रुपयास दिलें आणि नगदी रुपये ८ दिले बाकी रुपये ३५ राहिले असून त्याचा करार दिपवाळी झाल्यावर मुदल देण्याचा होता तो करार तुमची नोटिस पावल्या वेळेस पुरा झाला नव्हता. नंतर करार पुरा होण्याचे सुमारास आह्मी तुमचे कडेस रुपये घेऊन आलो तरी तुह्मी रुपये न घेतां उलट खोटी नोटिस देऊन तिचा खर्च मागता परंतु तुमचे आह्मास १५ रुपयाखेरीज देणें नाहीं. तसेंच दिलेलें घर परत घेण्याचें कारण नाहीं. मी घर दिलें तें चार पंचासमक्ष दिलें आहे आणि त्या घरांत सिरगिदारही तुमचेंच तर्फे रहातो. यासकरितां तुह्मी हे रुपये ३५ नोटिस पोचल्यापासून आठ दिवसाचे आंत घेऊन जावे. असें न केल्यास सदर्हू रुपये आह्माजवळ ठेविल्याबद्दल रखवाली प्रीत्यर्थ दरमहा चार आणे प्रमाणें भरून घेतले जाईल व तुमचे नोटिशीचा खर्च न मिळतां आमचे नोटिसीचा खर्च तुह्मास दावा लागेल. असें करण्यास तुह्मी आळस केल्यास तुमची बेइमानकीची कीर्ति कायद्याप्रमाणें काम चालविण्यांत उघड करू हें खूप समजावें. तारिख ४ माहे नोवेंबर सन १८७३ इसवी.

(सही) उत्तमचंद जितमल टावरी

दुकान पिंपळगाव काळे

दस्तुर खुद्द.


## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये

### पुरुष संबंधी अधिकार.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि. वि. खालील विचार प्रसिद्ध करण्याची कृपा व्हावी.

इंग्रजी कायद्याच्या मुख्य शाखा चार कल्पिल्या आहेत.

१. पुरुषाचे अधिकार.
२. धनसंबंधी अधिकार
३. व्यवहारीक नुकसान.
४. अपराध.

यांतील प्रथम पुरुष संबंधी अधिकार याचा विचार असा आहे कीं, कायद्याचे दृष्टीनें पुरुष ह्मणजे एक एक मनुष्य हा च अर्थ नाहीं; तर पुरुष ह्मणजे कोणीं एक व्यक्ति, किंवा कोणी एक मंडळी, किंवा कोणी एक कंपनी, किंवा कोणी एक संस्थान, लायब्ररी, शाळा, पेढी, वगैरे हे सर्व पुरुष आहेत. हरएक ज्यांस कांहीं सत्ता आहे व ज्यांस वादांत वादी अथवा प्रतिवादी होतां येतें, ज्यांची गोष्ट त्यांचे किंवा त्यांचे तर्फेचे मुकत्याराचे मार्फत कोडत्यांत ऐकते त्यास पुरुष ह्मणावें. आतां पुरुषास दोन रूपें आहेत, स्वाभावीक आणि कृत्रिम. आणि दोहीं रूपाच्या संबंधानें त्यास अनेक अधिकार आहेत. आतां हे अधिकार देशाचे सरकार ज्या प्रकारचें असेल त्याप्रमाणें कमी किंवा ज्यास्त असतात ह्मणजे जे राजे स्वच्छंदी असतात ज्यांस कायदे नसतात किंवा उयास कायदे थोडे असतात त्या राजांची प्रजा थोडे अधिकार पावते. त्या प्रजेच्यानें आमचे अधिकार अमूक आहेत असें म्हणवत नाहीं व असें म्हणावयास त्यांस कांहीं आधार नसतो. यास्तव राजाचे आर्जवानें गरीबी दाखऊन वागावें लागतें. याप्रमाणें तुर्कस्थान, इराण, इत्यादि मनस्वी सरकारा खालची प्रजा आहे त्याहून इंग्लंडांतील प्रजेस अधिकार अधिक आहेत. कारण कीं, त्यास कायदा आहे. राजा मनस्वी नाहीं पार्लमेंट कोडत आहे. राज्यास रचना आणि व्यवस्था आहे त्याहून अमेरिकेंतील संयुक्त संस्थानचें राज्य लोकसत्तात्मक आहे यास्तव तेथील प्रजेचे अधिकार फार मजबूत आहेत आणि त्या अधिकारांत कमजास्त कोणी सरकारी अमलदार करील तर ते भांडूं शकतात आणि अधिकाऱ्या विरुद्ध न्याय मिळतो परंतु स्वइच्छ, व बेकायदा. राज्यांत या प्रकारची प्रजेचा जोर नसतो दुसरें असें आहे कीं, कोणतेही अधिकारी यांस किंवा राजास आपली सत्ता कमी व्हावी अशी इच्छा नसते यास्तव प्रजेच्या ततेस राजे सर्व काळ प्रतिकूळ असतात त्याप्रमाणें ज्ञानवृद्धीस भट वगैरे धर्माधिकारी प्रतिकूळ असतात त्याप्रमाणेंच हे आहे. कारण कीं ते आपले सत्तेच्या नाशाचें हें कारण आहे असें समजतात. यास्तव कितीएक देशांत प्रजा चांगली ज्ञानी झाली ह्मणजे ती ज्यास्त अधिकार मिळविते. इंग्लंडच्या इतिहासांत राजा ज्यान यापासून प्रजेनें आपले अधिकाराचा पट्टा जबरदस्तीनें व तरवारीचे जोरानें घेतला हें इतिहास पढणारे लोकांस ठाऊक आहे. त्याच प्रमाणें फ्रान्स देशांतही झाले आहे. परंतु हिंदुस्थानांत पूर्वापार जीं राज्यें होत आलीं ती स्वइच्छ असलें कारणानें एथील प्रजेस कोणतेही प्रकारचा अधिकार आहे असें ह्मणतां येत नाहीं. सर्व ठिकाणीं राजाज्ञा प्रमाण. असेंच मोगलाइत वगैरे चालल्या मुळें बहुत दिवसांपासून एथील प्रजेचे अधिकार भ्रष्ट झाले. त्यांचें उज्जीवन इंग्रज सरकारचें राज्य झाल्या पासून झालें. आतां मनुष्यास स्वाभाविक अधिकार कोणते आहेत असें पाहिले असतां प्रथम त्याचें संरक्षण सर्वांनीं करावें हा अधिकार आहे, त्याचे शरीरास कोणीं उपद्रव देऊं नये व त्यास जाण्यायेण्याची वगैरे मनाई कोणी करूं नये. हरएक व्यवहार करण्यास मनाई असूं नये. दुसरा, तो जें मिळवील त्यावर त्याची सत्ता आहे. जें ज्याचें धन तें कोणी हरण करूंनये. तिसरा अधिकार असा आहे कीं, त्यास आवडेल तो धर्म त्यानें चालवावा. चौथा अधिकार असा आहे कीं, कोणताही विचार करण्यास प्रतिबंध नसावा. पाचवा अधिकार हरएक बाबदींत त्यास अर्जी करतां येते. सहावा अधिकार त्याची अब्रू कोणीं घेईल किंवा नाश करील तर त्याचे संरक्षण होईल. सातवा अधिकार असा आहे कीं, त्याजवर किंवा त्याचे मालावर किंवा त्याचे नातलगावर कोणीं उठल्यास त्याचा प्रतिकार करण्यास त्यास अधिकार आहे. हा अधिकार प्रतिपुरुषीं आहे, तसा राष्ट्रासही आहे. त्याचे अधिकार नामावयास जेव्हां परचक्र येतें किंवा दुसरें कारण उत्पन्न होतें तेव्हां प्रजा शस्त्रें घेऊन लढतात आणि ज्या लढाया अधिकार स्थापनार्थ होतात त्याच यथा न्याय, बाकी जुलुमाकरितां ही बहुत होतात. या प्रमाणें प्रत्येक पुरुषांत हे स्वाभाविक अधिकार आहेत. प्रत्येक अधिकारामध्यें कांहीं कर्तव्य असतें आणि प्रत्येक अधिकाराचा नाश झाला तर उपाय असतो. मनुष्य जेव्हां उत्पन्न झाला तेव्हां वनवासी असेल आणि त्या काळीं त्याचे अधिकारही फार थोडे असतील, परंतु जेव्हां तो ग्राम, पुर, पट्टणवासी झाला तेव्हां कांहीं अधिकार त्यास सोडावे लागले व कांहीं दुसऱ्या कडून मिळाले ह्मणजे सर्वांचे अधिकार रहाण्याकरितां परस्परांनीं तोडजोड केली. पुरुषास जेव्हां जेव्हां वनवास असेल तेव्हां तेव्हां चौकी पहारा आपणच करावा, पाहिजे ती जमीन पिकवावी, पाहिजे तेथें पाणी भरावें, परंतु गावांत आला तेव्हां गावचे कायदे लागू पडले. तेथें चौकी पहाऱ्यास सर्वांनीं रखवालदार ठेविला त्यास पोटगी देण्याची वर्गणी झाली. तेव्हां ती सर्वांनीं दिली पाहिजे. जमिनीच्या मर्यादा झाल्या तेव्हां दर एकानें आपले हद्दींत वहिवाट करावी असें ठरलें. हे प्रतिबंध रानच्या वहिवाटीपेक्षां अधिक झाले. सर्व लोकांनीं एक रखवालदार केला, तेव्हां सर्वांची स्वतांची मेहेनत दूर झाली. जमिनीस बांध, अटकाव पडले यामुळें आपआपली वहिवाट चांगले रीतीनें होऊं लागली याप्रमाणें कोणी न मानून गैर वहिवाट करूं लागला तर त्यास सर्वांनीं शिक्षा करावी, कैदेत टाकावें, त्याची स्वाभाविक मोकळीक ही हिरावून घेऊन त्यास तसदी द्यावी असें ठरलें. तेव्हां गावच्या कानुप्रमाणें ज्यास पत्करणें त्यांनीं गावांत रहावें. ज्यांस हे कानू भावणार नाहींत त्यांणें गाव सोडून द्यावें. याच न्यायानें इंग्लंडांतील प्रजा अमेरिकेंत जाते अमेरिकेंतील युरोपांत जाते. जे कानू

ज्यास गोड वाटतील त्या कानूच्या मर्यादेंत रहाण्यास त्याची खुषी आहे, आतां पुरुषास स्वाभाविकाहून अन्य संबंध उत्पन्न होतात आणि त्यांविषयींचे अधिकार वेगळाले असतात. ते संबंध नवरा नायको, पितापुत्र, दत्तक लेकवळा, धनी चाकर, लहान आणि प्रतिपाळ करणारा, संन्यासी गोसावी, सावकार आणि देणेंदार, जमीनदार आणि कूळ, राजे न्यायाधिश, दासी, अडते, पातीदार इत्यादि अनेक संबंध जसजसा व्यवहार वाढतो त्याप्रमाणें उत्पन्न होतात. धर्मशास्त्रांत व्यवहाराचें लक्षण असें सांगितलें आहे कीं, ज्या संबंधी विवाद पडतो तो व्यवहार. ज्याजबद्दल विवाद पडत नाहीं, त्याविषयीं कायदा असणेंही जरूर नाहीं. याप्रमाणें विवादाचीं अठरा स्थळें गणिलीं आहेत आणि त्याविषयीं नियम केले आहेत. हिंदुशास्त्राचे सरणी प्रमाणें असे अनेक ग्रंथकारांनीं अनेक प्रकारचे विभाग केले आहेत. आतां हे कृत्रिम संबंध उत्पन्न झाले त्यांत परस्परांशी कसें वागावें, त्यांचे धर्म काय, हें धर्मशास्त्रांत ह्मणजे कायद्यांत विवक्षित केलें असतें. आतां सर्व कायद्यांचें सार असें आहे कीं, असें कोणतेंही नुकसान नाहीं कीं, ज्यास कांहीं उपाय नाहीं. सर्व नुकसानास उपाय आहेत. जेथें जेथें उपायाची न्यूनता दिसेल तेथें तेथें लोकांनीं सर्वदा शोधांत असून आपले कायदे बदलून अगर नवीन करून उपाय योजावे आणि प्रत्येक वादांत एक पुरुष ज्याचें नुकसान झालें आहे तो किंवा ज्याजला कांहीं अधिकार सिद्ध करावयाचा असेल तो आणि दुसरें त्याचा प्रतिपक्षी ज्याणे तें नुकसान केलें किंवा जो अधिकारास विरुद्ध वागतो तो, आणि तिसरें ज्याविषयीं वाद तें धन किंवा तो अधिकार हीं तीन आणि चौथें त्याविषयीं काय उपाय आहे, हे या प्रत्येक वादांत दाखविलें पाहिजे. जसें सावकार ह्मणतो कीं मीं अमक्यास दहा रुपये कर्ज दिले ते रुपये तो कराराप्रमाणें देत नाहीं तो प्रतिवादी आणि ते रुपये हा विषय व ते रुपये त्यास कैदेंत टाकून अथवा त्याचें घरदार विकून द्यावे हा उपाय. या प्रमाणें दोन पुरुष एक विषय आणि एक उपाय इतके वादांत अवश्य पाहिजेत. आतां सावकार आपले रुपये मागतो हा एक तो आपला अधिकारच सिद्ध करण्यास पहातो असें समजलें तरी चिंता नाहीं कारण कीं, ज्याचें धन त्यास परतें घेण्याचा अधिकार आहे आणि त्या अधिकारसिद्धीकरितां कोडते वगैरे जे कोणी रखवालदार प्रजेनें स्थापिले आहेत त्या सर्वांनीं त्यास मदत केली पाहिजे याप्रमाणें सर्व अधिकारांचा निर्णय आहे. याप्रमाणें पुरुषसंबंधी अधिकाराचे व्याख्यान आहे.

**वऱ्हाडसमाचार**

मिती कार्तिक वद्य ६ शके १७९६

## राज्यविचार.

फ्रान्स देशांतून आलिकडे ज्या खबरा येतात त्यांवरून दिसतें कीं, तेथें प्रस्तुत प्रजासत्ताक राज्य आहे तें मोडलें जाऊन राजाची पुन्हस्थापना व्हावी असा उद्योग चालला आहे. परंतु विचारपूर्वक पाहिलें असतां हा उद्योग राष्ट्रांतील सर्व प्रजेचा आहे असें दिसत नाहीं. प्रजेनें स्वतां मिळविलेला आपला उत्तमाधिकार आपण होऊन गमवावा इतकी विलायती शहाणी तिकडील प्रजा नाहीं. तेंव्हां हा उद्योग कांहीं कारस्थानी सरदार लोकांचा आहे असें वाचकांस स्पष्ट दिसेल. राष्ट्राचा विचार आपले कुटुंबाचे विच्याराप्रमाणेंच आहे. कुटुंबांत दहा मनुष्यें आहेत तर त्यांत एक नियंता असण्याची जशी अवश्यकता आहे तशीच राष्ट्रास नियंता असण्याची अवश्यकता आहे. नाहींतर सर्व लक्षावधि लोक तितके राज्यकर्ते व तितके मुखत्यारच असें झालें ह्मणजे सर्व कारभार वे बंद होऊन जातील व कोणतेंच काम सुरळीत होणार नाहीं. यास्तव नियमित मनुष्याची राष्ट्रास अवश्यकता आहे. व त्यांतच हा विचार आहे कीं एकच राजा करून ठेवावा किंवा १०।५ मनुष्यांचें कौंसल करून त्यांकडे राज्याधिकार सोपवावा. यांत पहिल्यापेक्षां दुसरा विचार अधिक सुयुक्त आहे. कारण मनुष्य चुकीला पात्र आहे. ह्मणून एकच मनुष्य राजा करून ठेविला व त्यानें चूक केली किंवा दुराग्रह धरिला तर सारे राष्ट्राचा नाश होणार आहे. आणि १०।५ मंडळींत एकजण चूक करूं शकेल तर दुसरा तो सुधारील, तिसरा सुधारील, चवथ्याचा दुराग्रह पडेल तर पांचवा त्यास ताळ्यावर आणील इत्यादि उपाय आहेत ह्मणून एक मनुष्य राजा करून ठेवण्यापेक्षां आपले सत्तेंत राज्य ठेवून त्यावर आपल्या तीळ५।६ लोकांची नेमणूक करणें अधिक सोयीचें आहे; तसेंच एकच राजा ठरवून ठेविला ह्मणजे त्याच्या संततीकडे राज्यसूत्र जातें. मग, ती संतती शहाणी असो, मूर्ख असो, सुशील असो, कुशील असो, सद्गुणी असो, दुर्गुणी असो, ती राज्य चालवितें व तीपासून प्रजेस कधीं कधीं घोर संकटें प्राप्त होतात. यासाठीं राज्य लोकसत्तात्मक असावें व लोकांनीं राज्याधिकार निवडक मंडळीस द्यावा, ही जी योजना तिकडे कित्येक राष्ट्रांत आहे ती फार योग्य आहे. व तें महत्व फ्रान्स देशास प्राप्त झालें असतां आतां दुर्दैवानें जाऊं पहात आहे याबद्दल आह्मास फार वाईट वाटतें.

प्रजासत्तात्मक राज्यांतही जे कौंसलदार व्हावयाचे ते हल्लींच्या आमच्या मुंबईच्या कायदेकौंसलासारखे हडदी असले ह्मणजे आपलाच हेका चालवून दुष्ट व पीडाकारक कायदे वगैरे करण्यानें राज्यव्यवस्था बिघडवून रयतेची धूळधाणीं करणार नाहींत काय? असा प्रश्न हल्लींच्या स्थितीवरून वाचकांस उद्भवण्याजोगा आहे; परंतु त्यांत आणि या कौंसलांत फार अंतर आहे असें थोडा अधिक विचार केला असतां ध्यानांत येईल. प्रजासत्तात्मक कौंसलांत ६ गोरे व तीनच काळे सभासद निवडले जातील असें होणार नाहीं, समता राहील, व मग बहुमतानें गोऱ्यांचे गोरेंच मत केवळ प्रतिपादलें जाणार नाहीं. व असे समयीं होऊं शकेल तेंव्हां तशा राज्यांत प्रजासमूह नुसत्या अर्ज्या करून राजाचे तोंडाकडे पहात बसणार नाहीं असें आह्मास वाटतें. अस्तु. आमची अशी इच्छा आहे कीं, फ्रान्स देशाचें लोकसत्तात्मक राज्य चिरकाळ राहो व इतर राष्ट्रेंही तशा नमुन्याचीं होवोत.

आमचे इंग्लिश सरकारचें राज्य जें विलायतेस आहे तें लोक व राजा यांच्या मिश्र सत्तेचें आहे. पार्लमेंटसभा या लोकसत्तेच्या आहेत आणि महाराणी विक्टोरिया या राजसत्तेनें राज्य करीत आहेत. पण तशा राज्यनियमांचा उपभोग हिंदुस्थानास नाहीं हे हिंदुस्थानचें दुर्दैव आहे. नावडत्या मुलाप्रमाणें हिंदुस्थानास महाराणी साहेबांनीं गवरनर जनरलाच्या दिमतीस दिलें आहे. गॅ० ज० जवळ प्रजासत्तात्मक पार्लमेंट नाहीं, व त्यांच्या हाताखालच्या इलाख्यांतूनही नाहीं. कौंसलें आहेत परंतु त्यांत सर्व युरोपियन अधिकारीच आहेत, प्रजेपैकीं कोणी नाहीं व याजवर महाराणीसाहेब लक्ष्य देऊन घरच्याप्रमाणें आमची व्यवस्था ठेवीत नाहींत हें पाहून आह्मास फार दुःख वाटतें. अस्तु. ईश्वर त्यांच्या पोटीं दया उत्पन्न करो.

## मुंबई कायदे कौन्सलांत नवीन कायदे व त्यांपासून रयतेस त्रास.

इंग्रज सरकारचें राज्य या देशांत झाल्यापासून आम्हांस सुखवृद्धीची जी घांड होती व त्यांचें राज्य करतबदारबिद्दल वारंवार रयत लोकांचे मुखांतून निघणार गुणानुवाद गाण्यानें जे आम्ही फुगून गेलो होतो त्याचे निरसरण आतां व्हावयास लागून त्यांचें खरें वैभव, कावेबाजपणा, काळ्या गोऱ्याचा भेद यांची प्रत्यक्ष मूर्ति आमचेपुढें उभी राहिलेली आतां दिसावयास लागून त्यांच्या या कृत्यांचें अधिकाधिक आश्चर्य वाटतें चाललें आहे. राजा व प्रजा यांमध्यें पितापुत्राचे नातें आहे व त्याप्रमाणें उभयतांनीं वागून एकमेकांस सुख देणें हें कर्तव्य आहे. पित्याचा धर्म मुलाचें उत्तम रीतीनें व सुमार्गानें पाळणपोषण करावें आहे त्याप्रमाणेच राजानें प्रजेचे पुत्रवत् पाळण करावें असा जो सिद्धांत आहे त्यास सध्या हरताळ लागू पडत आहे. आम्ही हिंदुस्थानवासी गरिब रयत लोक इंग्रजसरकारचीं लेकरें असून त्यांच्या सर्व आज्ञा मनोभावानें पाळून त्यांच्या कायद्यास, त्यांच्या सर्व कृत्यास मानून व त्याच्या प्रमाणे चालत असून ते आमची हेळसांड करावयास लागले तेंव्हा आम्ही गरीब लोकांनीं कोणाकडे धाव घ्यावी, अशा या संकटांत आम्हास कोण तारील. एवंच्य आमचे दुर्दैव थोडा चढवून पुढें उभेंच आहे असें ह्मणण्यास काय प्रत्यवाय आहे?

आज हे उद्गार येण्याचें कारण दुसरें कांहीं नाहीं, परंतु मुंबईचे सध्याचें कायदे कौन्सल व त्यांत नवीन कायदे पसार होण्याचा "ऊत,, हें होय. कायदे कौन्सिल हें राज्यांचें सुरक्षितपणाचें व रयतेस प्रसंगोपात कायदे करून सुख देण्याचें व या योगानें राज्यास बळकटी आणण्याचें एक साधन आहे. ह्या कौंसलांत निरनिराळ्या प्रतीचे लोक नेमून त्यांपासून अवश्य गोष्टींचे वेळीं रयतेचे हित अनहित त्याचे सल्यानें ठरून कायद्याच्या खरड्याचे सर्व लिपींत भाषांतर करून सर्वांस जाहीर होण्याकरतां प्रसिद्ध व्हावें ऐंकरून रयतेस त्यापासून होणारी इजा साहजिक कळून त्यांनीं आपल्यास होणारीं सर्व दुःखे अर्जानें कळवावीं- त्यावरून त्यांची भवति नभवति करून व रयतेचे सुखाकडे लक्ष्य देऊन त्याप्रमाणें तो कायदा अमलांत आणावा असें असून अलीकडे या कौंसलानें याकडे दुर्लक्ष केलेलें पाहून न्यायी सरकारास अन्यायी व मुसलमानी राज्याप्रमाणे झोटिंग बादशाई ह्मणण्याचें कपाळी येणार कीं काय तें कळत नाहीं. कायदे कौन्सीलांत जे तीन मेंबर स्वदेशीय आहेत यांनीं अनेक प्रकारचीं दुःखें व त्रास नव्या कायद्यापासून होतात असें समजाविलें तरी त्यांचे कोण ऐकतो. एकूण आमचे दुःख कमी व्हावयाचे नाहीं हेच आमचे नशीबीं आहे असें ह्मणणें भाग येतें.

हिंदुस्थान देश सधन, तेथील रयत लोक राजनिष्ठ व गरीब त्यांस कसेही प्रकारें वागविलें तरी ती वागते असें समजून इंग्रज सरकारानें या सालांत नवीन नवीन नहाळा कायदे करून आम्हा गरिब रयतेस टोंचटोंचून मारण्याचा इरादा केला आहे असें वाटतें मिठाचे कायद्यानें गरीब गुरीब लोकांस मिठावाचून मरण्याची पाळी येणार. "पायधुलाई" चे कायद्यानें रांडामुंडा, भट, सन्यासी, आंधळे, पांगळे, गरीब, गुरीब, नागवले जाऊन रस्त्यावरन हिंडावयाची पैसा नसल्या कारणानें उपाशी मरण्याची पाळी येणार. म्युनिसिपाल कमेटीचे कायद्यानें हरएक लोकांवर कहर गुदरून कलेक्टर व पोलिस अधिकारी लोक केवळ मात करून देऊन झोटिंग बादशाईस आरंभ करणार तेव्हां केवढें वरे संकट आज आपल्यावर आलें आहे ईश्वरा, नकोतें धन, नको ते सिविल सर्जिहाचे परीक्षेस जाणें या दुर्घट प्रसंगापेक्षा मरण पुरवेल असें होऊन गेलें. अशा या नानाप्रकारचे करांनीं सर्व रयत लोकांनीं ओरडून हालकल्लोळ करून दिला तरी आमचे दयाळु सरकार कान असून बहिरें झालें. डोळे असून अंध होऊन सर्व प्रजेच्या आर्जाकडे दुर्लक्ष करू लागलें त्यांनीं या प्रसंगी केवळ आपल्या मत्तलबाकडे लक्ष्य देऊन सर्वांस रंजीस केलें आहे.

अशा या इंग्रज सरकारच्या वर्तणुकेमुळें त्यांनीं आम्हांस जी विद्या दिली व ज्यांनीं आमचे सर्व प्रकारें जें कल्याण केलें त्याचें प्रति फळ व गुरुदक्षणा त्यास

काय : द्यावी," हे वाचकांपैकीं कोणी सांगावें.

## ✓करविषयीं लावणी.

हिंदुस्थानांत दिवसानुदिवस करावर कर वाढत चालले आहेत व तेणेंकरून लोकांस मोठ्या अडचणी येत चालल्या आहेत हें मनांत आणून एका कोल्हापुराकडील कवीनें तेथील ज्ञानसागरपत्रकर्त्याकडे एक लावणी रचून पाठविली आहे. ती आह्मांस मोठी मौजेची वाटली सबब आह्मी आपले वाचणाराकरितां खालीं उतरून घेतली आहे.

(दो दिवसांची तनु० या चालीवर.)

कर नव्हे पर कहर नरा हा खरा करारे करा भरा ॥ विकरा करुनी घरदाराचा अथवा सोडी या शहरा ॥ धृवपद ॥ सुका चुकाही रुका देऊनीं घेतां न मिळे मूठ भरी ॥ गरीब लोकांवरी न गतही माळिण तेही करा भरी ॥ गाई घेतां अति म्हागाई करा देइ तो विकणारा ॥ चारा बाबा बिग जणू तो धारा इनारा मूळ खरा॥गाडी घोडीं विकुनि पारडी करा सुराला द्या नरडी ॥ हड मोडुनी वाडे बांधतां भाडें द्या या या नरडी ॥ यमापरिस हा धिमा दीस तो सिमा न याच्या रागाला ॥ कर नाता वा प्रबर यमाचा चाकर चावा घे गाला ॥ रथीं बैसुनी पथीं चालतां जकात देणें भागपडे ॥ गाडा घोडा विकुनि रोकडा पैशास्तव दे दे कपडे॥ करनव्हे० ॥ बाबूधीरक० ॥ १ ॥ गीठ करानें पिठा परीत महाग विटा घे मनतें ॥ अळणी खाया दळराजाचे मळमळ तोंडा हो करते ॥ पाणि मिळेना पाणी जोडुनी वाणी तोही दीन करी ॥ अपकारानें मापमिळेना वाप कटूना स्वाद निरीं ॥ बोला रुक्का चाला रुक्का अथवा धक्का ध्याल शिरीं ॥ नसल्या पैसा चावडीं वैसा अथवा म्हैसाध्या करीं ॥ हिंदुस्थाना होति रवाना जिन्नस नानाव्यापारीं ॥ कारागिरा नसे गुदारा दारा फिरुनी पोट भरी॥ करा जोडुनीहराविनवितोंकराशेवटींत्यानिरा करासुगॅनिकार पीडिलें बिषारहित हा मृत्यु खरा ॥ कर नव्हे पर०बाबुधीर ध ॥२॥ ऐका सोर स्वस्थ बसारे युक्तिभक्तिनें कवि सुचवी ॥ कर देण्याचा भार तुजला फार नसे बा तो वचवी ॥ अर्जी करूनी गर्जी ध्यावी मुलेंलेकेंरे विकण्याची ॥ होउन बंदा गुलाम धंदा घासीं गंधावाणाची ॥ कंद मुळे गिरीकंदरीं खाउनी कर बंदायीं बंद करीं ॥ बाणसिल जरि तूं मरशिल तेथें कर सुटका ती नाहिं नरी ॥ दात जगाचा अंत करिल तरि सुटका घटका एक नसे॥ दाग पराचे वाम काढुन वाना तुझी देत असे ॥ बा सापडतो पैसा पाहा करे अधिक तो तुजन्याया ॥ पूजे हरारे करा सूटण्या वदतो न सचे कवि गाया ॥ कर नव्हे पर० ॥ बाबू धीर करा ॥ ३ ॥

एक कवि

## वऱ्हाड

बेपिटने कर्नल बुशबी साहेब गेले सोमवारीं येथें आले व त्याचदिवशीं त्यांनीं डिपुटी कमिशनराचे कामाचा चार्ज घेतला.

—०००—

क्या० बुलक साहेब प्रांतांत फिरावयास गेले होते ते मंगळवारीं परत आले.

—०००—

अकोल्यातील भंगी लोक गेलेआठवड्यांत दोन दिवस रुसून बसले होते पण ते लवकरच समजले ह्मणून बरें झालें. नाहींतर लोकांनीं म्युनिसिपालिटीवर रुसून दुर्गंधी मुळे गाव सोडण्याचा प्रसंग आला असता.असो. क्या० बुलक साहेब म्यु. चे व्हाईस प्रेसिडेंट यानीं त्या लोकांचा कंत्राकदर हिरालाल यास त्याबद्दल खरपुस ताकीद दिली आहे. व पूर्ववत काम चालू केलें आहे.

—०००—

क्या० एच. डी. पी रोनिक थर्ड क्लास असिस्टंट कमिशनर होते ते क्या० लाटन साहेबाचे रजेनें सेकंड क्लास झाले. त्याच प्रमाणें मि० नौलिस यांच्या इस्तगेफींत मि० ताजुदीन हुसेन साहेब यांस सेकंड क्लास असिस्टंट कमिशनर केलें.

—

मि. मीरइनायत हुसेन थर्ड क्लास तहशिलदार यांस भास्कर व्यंकटेशचे जागेचे संबधानें सेकंडक्लास तहशिलदार केलें.

—०४०—

रा. रा. आत्माराम भिकाजी ए. ग. कमिशनर यांस सप्तंबरचे तिसरे तारखेपासून तीन महिन्यांची हक्काची रजा मिळाली असल्याविषयीं या खेपेच्या रेसिडेन्सी आर्डरमध्यें छापिलें आहे.

—

अकोला म्युनेसिप्याल्टीकडून शहरांत पाणी विपुल करण्याच्या कामीं कांहीं तजवीज चालू आहे असे ऐकतो. या विषयीं सविस्तर समजले ह्मणजे आह्मी आपले वाचकांस कळवू.

—०००—

मूर्तिजापुरचे ६० रुपयांचे स्कुलमास्तर रा. गोपाळ कृष्ण यांस नांदुऱ्यास ५५ रुपयावर नेमिले व नांदुऱ्याचे ६० रुपयांचे मास्तर रा. नारायण प्रभाकर यांस तितक्याच पगारावर नेमिलें. मूर्तिजापूरचे स्कुलांत गोपाळ कृष्ण याकडून कांहीं अव्यवस्था झाली सबब त्याची कमी पगारावर बदली केली.

—०००—

अकोला हायस्कुलची प्रवेश परीक्षा झाली तींत १०५ मुलांत व मागच्या मिडल क्लास स्कूलांत अकोल्याच्या मिडल क्लास स्कुलाचें नाववर आलें ह्मणजे त्यांतील दोन मुलगे सर्वांचे वर आले असें ऐकतो व एकंदरींतही त्याचे ९ मुलगे पास झाले यावरून त्या शाळेचे हेड मास्तर मि० सुंदर दामोदर यांची तारीफ केली पाहिजे. शंभर व सवाशे रुपये पगाराच्या शाळांवर हे ७५ रुपयांचें स्कूल आलें. तस्मात हे १०० रुपयाचे तरी योग्य आहेत असें आह्मांस वाटतें. मागेंही मुलांच्या संख्येच्या वृद्धीवरून यांचा पगार वाढवावा अशी आह्मी शिफारस केली होती तीही या प्रसंगीं डायरेक्टर साहेब आठवतीलच.

—०००—

नार्मलस्कुलाच्या प्रवेश परिक्षेस सहावे तारखेस आरंभ झाला. अकोल्यास मुलें ४२ आहेत. याचप्रमाणे ही परीक्षा जिल्ह्यांनिल्ह्यांनीं होणार आहे. तिकडेही इतकालेच विद्यार्थी जमले असतील. सर्व बेरजेतून सुमार १५ विद्यार्थी नार्मलस्कुलांत घेतले जातील असें समजतें. बुलढाणे जिल्ह्यांतून आह्मांस एक पत्र आलें आहे त्या वरून समजतेंकीं तेथेंही परिक्षा सुरू झाली. मुलें ४० आहेत. रा. रा. बाळकृष्ण लक्ष्मण शास्त्री डिपुटी इन्स्पेक्टर व रा. रा. धोंडो निबक चिखलीचे मास्तर हे परिक्षक आहेत. व हिंदुस्थानीकरितां देउळघाटचे मास्तर मि० शेख कासम हे आहेत.

—०००—

उमरावतीचे पोस्टमास्तराचें लग्न झालें त्या संबंधी पुष्कळ थाटाची हकीकत टाइम्सच्या पत्र पाठविणारानें लिहिली आहे. युरोपियन स्त्रिया व पुरुष त्या समारंभास ६२ होते असें जाणतें.

—०००—

दोनतीन दिवस झाले आकाशांत अभ्रे येतात तेणेंकरून हवेचा बदल होऊन थंडी कमी झाली आहे. दूर कोठें पाऊसही पडला आताया.

—०००—

क्या. मेंजिस साहेब उमरावतीच्या स्मालकाज कोर्टाचे जज रजेवरून परत येऊन आपले कामावर रुजू झाले. व क्या० ग्रांट साहेब खामगावास परत आले. आता मि० दस्तुर नहिमनजी जामासजी, साहेबही अकोल्यास परत येतील.

—०००—

क्या० बुलक साहेब असिस्टंट कमिशनरचे कांम पाहूं लागले. त्यांकडे अकोला व अकोट तालुके दिले आहेत.

—०००—

BIRTH.

Abdool Huck—3Ist October at Ahmednagar, the wife of Abdool Huck Karnalker Esqr. Extra ast. Comm. Berar of a daughter.

जन्म.

अबदुल हक—तारीख ३१ माहे आक्टोबर रोजीं अहमदनगरास अबदुल हक्क कर्नाळकर इस्कायर, वऱ्हाडांतील एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर यांचे कुटुंब प्रसूत झालें, व त्यांस कन्यारत्न झालें.

## वर्तमानसार

बंगालइलाख्यांत गुदस्त सालीं पीक चांगलें आलें नाहीं. व यासालींही परजन्यानें दगा दिला यावरून तिकडे दुष्काळ पडण्याची भीति उत्पन्न झाली आहे. व हिंदुस्थान सरकारचें तिकडे लक्ष लागलें आहे. बंगाल इलाखा मोठा समृध्द असे. तो आपला निर्वाह करून बाहेर प्रांतांत धान्य धाडीत असे पण या वर्षीं त्यावर मोठें संकट दिसतें तें कृपाळू परमेश्वरानें लवकर दूर करावें असें आह्मी त्याजवळ मागणें मागतो.

बंगाल्याकडील दुष्काळाच्या गडबडीमुळें आग्र्यास व लखनौस दरबारें भरविण्याविषयीं झालेला बेत हिंदुस्थान सरकारानें सोडून दिला.

वायव्य प्रांतांत या वर्षीं सप्तंबर महिन्यांत ८१२८५ मनुष्यें मरण पावलीं. त्याप्रांतांत लोक वस्ती २१८५०२२आहे.

काश्मिराकडे थंड हवेकरितां रजा घेऊन अंमलदार लोक वर्षास जात असत सालोगणकुरी जाऊं लागतील तर त्यांस रजा देऊं नये असा सरकारानें ठराव केला आहे.

मुलतान रेल्वेकडे एक मनुष्य तिसऱ्या क्लासच्या गाडींत बसणारा असून खालच्या अंगास चाकाजवळ कमानीच्या बाजूस दोरानें बांधून जागा करून बसून गेला असें आढळलें. त्यास पकडले आहे. तो ह्मणतो कीं सुख कारक हवेसाठी मी असे केलें.

पंजाबांत हायस्कुलें ९ मिडल क्लास स्कुलें ५० लोअर क्लास स्कुलें १६६ फिमेल स्कुलें ३१४ व नार्मल स्कुलें ९ आहेत. यांस खर्च ३५१०१३ रुपये सरकारी व लोकल मिळून आहे.

म्याट्रिक्युलेशनच्या परिक्षेला मुंबईस १०२५ उमेदवार सांप्रत मजकुरी आहेत. परिक्षा १७ वे तारखेस सोमवारीं सुरू होईल.

श्री० मल्हारराव गायकवाड यानीं नवीन लग्नाचा बेत तहकूब केला. व नवऱ्या मुलीला आपले महालांत आणून ठेविलें. तिच्या भेटीस महाराज जात येत असतात.

बडोद्याचे रेसिडेंट आताशी पहिलेप्रमाणें महाराजांचे भेटीस जात नाहींत व महाराज मात्र आठवड्यांतून दोन वेळां त्यांकडे जात असतात. खानविलकर दिवाण आजारी आहेत व ते दरबारास जात नाहींत. मि० दादा भाई नवरोजी विलायतेहून गायकवाड सरकारचे बोलावण्यावरून दुसरे तारखेचे आगबोटीवरून याबयास निघाले आहेत.

नेपाळचे महाराजानीं राजे कालीकृष्ण देव बाहादर यांस स्टार आफ आनर नावाचें सुवर्ण पदक नजर पाठविलें.

मुंबई कौंसलांतील मिठाचा कायदा तीन वेळां वाचून पास झाला. वीस शेराहून अधिक मीठ परवानगी वाचून घरांत बाळगूं नये असें मसुद्यांत होतें ती संख्या ४० शेरांची केली. व तो नियम मिठागरापासून १० मैलाचे आंत जीं घरें असतील तितक्यांनाच लागू आहे, बाकी ठिकाणीं नाहीं असें ठरलें आहे.

बडोद्याचे चौकशीकरितां कमिटीदार नेमिलेले सर्व मुंबईस हजर झाले. व एक दोन दिवसात ते बडोद्यास जाणार होते.

मुंबईहायकोर्टाचे जडज अनेरबल मि. जस्टिस ग्रीन यांची प्रकृती बरी नाहीं व त्याकरितां ते एक वर्षाची रजा घेऊन विलायतेस जाणार असें समजतें.

नागपुर—मागें इंदुप्रकाशांत येथील दप्तरीनें काढलेल्या मागाविषयीं लिहिलें होतें; ह्या मनुष्यानें आज सात वर्षे ही युक्ति शोधण्यामध्यें आपली ताकत, पैसा व बुद्धि खर्च केली, परंतु हल्लीं त्याला उपास काढण्याचा प्रसंग आला आहे हें पाहून पुणेंकरांनीं मेहेनत करून एक कंपनी काढली व त्यांत असें ठरलें कीं, ३००० हजार रुपये जमवून ५०० रुपये दप्तरीस बक्षीस द्यावे व उरलेल्या अडीच हजारांपयें पांच माग चालवावे व त्यात सुधारणा जितकी होईल तितकी करावी. ह्या तीन हजारापैकीं पंधराशांचा आंकडा पुणेकर मंडळीचाच पडला त्यांत २०० रुप

ये, नारायणस्वामी २०० रुपये नानासोनी; १०० गोपाळराव भिडे, ५० केशवराव भवाळकर, ५० केशवराव पटवर्धन ४० वासुदेवराव लेर प्रभति मंडळींचे याकडे पडले आहेत. बाकी राहिलेल्या १५०० रुपयांकरितां ता. १२ रोजीं आदितवारांत सभा भरली व भेट सावकारांस बलावणीं पाठविलीं त्याप्रमाणें सर्व आले. व सुमारे चार वाजतां रा. सा. केशवराव भवाळकर यानीं सुरस दगडास पाझर आणणारें व व्यापाराचे संबंधानें लेष आणणारें भाषण अर्धा तास करून आमनारूढ झाले. नंतर यादीस आरंभ झाला. शेवटीं ह्या उत्तम देशकल्याणाचे कामा करितां लक्षाधीश जे सावकार या सर्वांचा मिळुन आंकडा मोठ्या मिंडेनें १७९ चा झाला, आमचे बांधवांचा देशकल्याणाविषयीं हा उल्हास; असो कमिटीनें तारीख १८ रोजीं दत्परोस बलावून आणलें व ९ भाग जितके लवकर होतील तितके लवकर करण्यास सांगितले व ह्याचा खर्च कमिटीनें करावा असें ठरलें. ह्या स्तुत्य कृत्याचे पुढारी बहुत करून सर्व वकील लोक आहेत. इं. प्र.

अमदाबादेस पोष्टाकडे एका रजिष्टर घेणाऱ्या कारकुनानें एका कलोल्यांतून कांहीं नोटा काढून घेतल्या ही बातमी उघडकीस येउन त्याला एक वर्षाची सक्त कैद २०० रुपये दंड अशी शिक्षा झाली.

येत्या जानेवारी महिन्यांत कलकत्त्यास घोड्यांचे एक मोठें प्रदर्शन होणार आहे.

शिंदे सरकार यांणीं जो मुलगा दत्तक घेतला होता तो वाईट निघाल्यामुळें राजपदास अयोग्य ठरला आहे. आतां दुसरा दत्तक घेण्याबद्दल आपल्यासच पुत्रसंतान व्हावें म्हणून शिंदे सरकार येत्या महिन्यांत आणखी एक आपला विवाह करणार आहेत. आमचे एतद्देशीय राजेरजवाडे जितक्या जास्त बायका करतात तितक्या मानानें त्यांस संतान होण्याचा लाभ जास्त दूर पळतो असें बहुतकरून अवलोकनांत येतें. हे राजे जर एकच विवाहित स्त्री करून तिजपाशीं इमानानें वागतील तर त्यांस संतती होण्याचा अधिक संभव आहे असें वाटतें.

अटलांटीक महासागराची खोली काढण्यांत आली तिजवरून असें समजतें कीं त्या महासागराची खोली १२०० फुटी आहे. एक दोन ठिकाणीं मात्र १२०००० फुटी खोली आहे असें समजतें.

तुर्कस्थानच्या सरकारानें ४ लक्ष बंदुका युनायटेड स्टेटाहून मागितल्या आहेत.

खिवावर केलेल्या स्वारीस ५० लक्ष रुपये खर्च झाला असा अजमास आहे.

अमेरीकेंतील एका मंडळीच्या अध्यक्षानें व्याख्यान देऊन असें सिद्ध करून दाखविलें की एका देशाच्या हवेंत उत्पन्न झालेला झाडाचा रोपा दुसऱ्या कोणत्याही ठिकाणच्या हवेंत वाढवितां येतो.

एडिनबरो एथें एकानें नवीन तऱ्हेचीं लोखंडी पेनें ( टांक ) तयार केलीं आहेत त्यांस हिंदु पेन्स असें नांव दिलें आहे. सु. प.

खानदेश— जिल्ह्यांतील तालुके निहाय व तालुक्यांतील मोठें मोठें गावीं सरकारानें अफू विक्रीचीं दुकानें घातलीं. एकंदर दुकानें २६ झालीं. त्या प्रत्येक दुकानावर बारा बारा रुपयांचे कारकून नेमिले. व धुळयास तारीख २७ पासून मामलेदार कचेरींत अफूविक्री होऊं लागली. सरकारचे हातातून काय सुटलें आहे!

मालेगाव तालुक्यांतील चंदनपुरी हें जहागिरीचें गाव रा. सा. गोविंदराव गरुड यांणीं धोंडोशामराव यांचे नांवें तारीख २८ मिनहूस १७०२९ रुपयास लिलावांत घेतलें. खा. वै.

श्रीगिरीची यात्रा— बलारीचा एक मित्र असें लिहितो कीं, यंदा गिरीच्या यात्रेंत ६००० वर लोक जमले होते. रिटर्न टिकिटें मिळण्यास ४५ दिवसांचा अवकाश लागेल म्हणुन बातमी चहूंकडे पसरल्यामुळें लोक फार दिलगिर होते, परंतु लवकरच टिकिटें मिळालीं. देवदर्शनाच्या वेळीं तीन मनुष्यें चिरडून मरण पावलीं. पाण्याची हाकाहक फार होती परंतु ईश्वर कृपेनें वरच पर्जन्य पडला. धा. वृ.

तिसावे तारखेची कलकत्याहून तार वर्तमानपत्रांस आली आहे. तिजवरून समजतें कीं, चालू सालीं बंगालप्रांतांत पाऊस फार कमी पडल्यामुळें पीक खराब झालें. कितीएक प्रांतांत धान्य पेरलेलें ठिकाणींच जळून खाक झालें. असें म्हणतात कीं मजूरलोकांस खाण्यास मिळावें म्हणून सरकार सोन नदीचा कालवा आणि दार्जीलिंग रेल्वे हीं दोन्ही कामें सुरू करणार आहे. हिंदुस्थान देश फार सुपीक आहे असें पुष्कळ लोक समजतात परंतु चार पांच वर्षांत कोणते तरी हिंदुस्थानचे प्रदेशांत मोठा दुष्काळ पडला नाहीं असें बहुतकरून होत नाहीं. याप्रमाणेंच नेटिवांचे राज्य हिंदुस्थानांत असतां दुष्काळ पडले असतील. त्या राजाच्या कारकीर्दींत रस्ते वगैरे जाण्या येण्याच्या सोयी बरोबर नव्हत्या यामुळें अशा वेळीं एके प्रांतांतून दुसरे प्रांतांत धान्य जाण्यास फार कठिण पडत असेल यामुळें हल्लीच्या पेक्षां मनुष्येंही दुष्काळांत फार मेलीं असतील. हल्लीं बहुतेक ठिकाणीं गाड्या जाण्या सारखे रस्ते झाले आहेत व आगगाड्याही बहुतेक प्रांताजवळून गेल्या आहेत. शिवाय समुद्रांतून जहाजें धान्य घेऊन येतात. अशी स्थिति असतांही १८६४–६५ सालीं ओरिसा प्रांतांत जो दुष्काळ पडला होता त्यानें लाखो मनुष्यें मेलीं व आईबापावांचून जीं मुलें राहिलीं होतीं तीं किति एक हजार होतीं. तीं कोणाचे स्वाधीन करावीं व त्यांचें पालन पोषण कोण करील, ही सरकारास काळजी पडली होती. पुढें त्या मुलांचा सरकारानें कोणते रीतीनें बंदोबस्त ठेविला हे बरोबर समजलें नाहीं. इंडियन स्टेट्समन म्हणतो कीं, ६५ चे सालापेक्षांही हा दुष्काळ मोठा पडण्याचा संभव आहे पण त्या वेळेचे लेफ्टनेंट गवर्नर सर सेसिल बीडन हे दार्जीलिंगचे थंड हवेंत बसून हाताखालचे लोकांपासून रपोट मागवीत होते तसे हल्लींचे लेफ्टिनेंट गवर्नर नाहींत, सर जार्ज क्यांबेल यांनीं लोक उपाशीं मरूं नयेत याविषयीं आजपासूनच उद्योग चालविला आहे व त्यांस गवर्नर जनरल साहेब आपले हातून होईल तितकी मदत करतील यांत संशय नाहीं. सरकारानें कितीही मदत केली तरी लोकांचीं संकटें सर्वथैव दूर होतील असें नाहीं पण अन्न थोडें बहुत मिळून लोक वाचतील. ६५ सालाप्रमाणें अन्नावाचून मरणार नाहींत. हल्लींच बंगाल्यांत तांदुळ ५५ पासून ६० रुपये पर्यंत शेकडा महाग झाले आहेत व मुंबईंतही दहा बारा रुपये शेकडा चढले आहेत. आजच जर अशी महागाई होत चालली तर पुढें अधिक होईल यांत शंकच नको. हिंदुस्थानचे दुर्दैव त्यास कधी सोडोल तें न कळे. ज्ञा. प्र.

## वऱ्हाडचें वर्णन.

[ साधारण माहिती ]

सन १८५३ सालीं व सन १८६१ सालीं निजामसरकारचा व इंग्लिश सरकारचा तहनामा होऊन जो मुलूख ब्रिटिश सरकाराकडे आमानी म्हणून आला आहे. त्यालाच हल्लीं राजकीय संबंधानें व भूगोल वर्णनाचे संबंधानें वऱ्हाडप्रांत असें म्हणतात. पूर्वीं वेगवेगळ्या काळीं वऱ्हाड प्रांताची हद्द वेगवेगळी होती असें पुढें वऱ्हाडचा इतिहास आम्ही सांगू तेव्हां कळून येईल. वऱ्हाड प्रांत हैदराबाद संस्थानचा उत्तर भाग आहे. याला अर्धें वेष्टण पूर्व, उत्तर, आणि वायव्य भागास नागपूर म्हणजे मध्य प्रांत याचें आहे. व पश्चिम भागाला सुमार ४० मैल खानदेशाची हद्द आहे. वऱ्हाडच्या उत्तरेस गाविलगडचे डोंगर म्हणून सातपुड्याचा भाग आहे. पूर्वेस वर्धा नदी आहे. पश्चिमेस खानदेशाखालीं अजिंठ्याचे डोंगराची ओळ आहे. अजिंठ्याचे पूर्व पश्चिम डोंगराच्या ओळीनें वऱ्हाडाचे दक्षिणोत्तर दोन भाग झालेले आहेत. उत्तरेकडील भागाला पाइणघाट किंवा घाटाखालचा प्रांत असें म्हणतात. व दक्षिणेकडील भागाला बालाघाट किंवा घाटावरचा प्रांत असें म्हणतात.

पाइणघाटची जमीन सर्व वऱ्हाडांत पिकाला अति उत्तम आहे. हिच्या दोहों बाजूला डोंगर असून मध्ये उतरण आहे व पयोष्णी नदी मधून वहात आहे. या भागांत फारशी झाडी नाहीं. डोंगर कटारीला जे गाव आहेत त्यांनाच मात्र झाडी आहे. पयोष्णी नदी पावसाळ्यांतमात्र मोठी भरलेली दिसते पण उन्हाळा लागण्याचे सुमारास ती अटूं लागते. व शेतांतील पिकें निघून गेलीं आणि नदीचें पाणी खंडलें म्हणजे देश वैराण दिसूं लागतो. परंतु बालाघाटची स्थिति याहून अगदी भिन्न आहे. यांत झाडी बरीच आहे. पाणी पुष्कळ असून ते जमीन थोडी खणली असतां लागतें, बालाघाट कोठें कोठें मैदान आहे व कोठेंकोठें त्यांत डोंगराच्या उतरणी आहेत.

वऱ्हाडचें क्षेत्रफळ सुमार १७००० चौरस मैल आहे यावरून वऱ्हाडप्रांत ग्रीस देशा एवढा दिसतो. ग्रीस देशाचें क्षेत्रफळ १७६९० चौरस मैल आहे; परंतु वऱ्हाडची मनुष्यसंख्या ग्रीसचे दुप्पट आहे ती अशी—

वऱ्हाड २२२००७४

ग्रीस १०,९६,८१०

वऱ्हाडची पूर्व पश्चिम लांबी सुमार १५० मैल आणि दक्षिणोत्तर रुंदी सरासरी १४४ मैल आहे. वऱ्हाड ७६ आणि ७९ रेखांश व अक्षांश १९ आणि २१ याच्यामध्यें आहे.

वऱ्हाडचे ६ जिल्हे केले आहेत. त्यांचीं नांवें इलिचपुर, अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशीम, आणि वणी. यांचे या संबंधानें माहिती अशी—

इलिचपुर—हा जिल्हा वऱ्हाडच्या उत्तरभागास आहे. याच्या उत्तरेस तापी नदी, व मध्यप्रांतांतील बैतुल आणि चिंदवडा हे जिल्हे आहेत, पश्चिमेस नेमाड आणि अकोला जिल्हा आहे. पूर्वेस वर्धा नदी, आणि दक्षिणेस अमरावती जिल्हा आहे. या जिल्ह्याची पैमाष मोजणी अजून झाली नाहीं. तथापि साधारण अदमासानें याचें क्षेत्रफळ ३१६० चौरस मैल आहे. यांत गाविलगडचे डोंगर ज्यांत मांग्रा किंवा मेळघाट म्हणतात त्यांचा समावेश आहे. या जिल्ह्यांतील सर्व डोंगराळ प्रदेश मेळघाटा खालीं आहे. बाकीचा सपाट असून दक्षिणे कडे उतरता आहे, यांतून पुष्कळ लहान लहान ओहोळ निघून ते वर्धा व पयोष्णी या नद्यांनां मिळाले आहेत. या जिल्ह्यांत अमराया पुष्कळ आहे. व शेतांतील पिकाच्या हंगामाच्या दिवसांत त्यांची मोठी रमणीय शोभा दिसते. या जिल्ह्यांतील मेळघाट तालुक्याची दक्षिणोत्तर लांबी ३८ मैल व पूर्व पश्चिम ६० मैल आहे. मेळघाटचें क्षेत्रफळ १६२५ चौरस मैल आहे

उमरावती —या जिल्ह्याचे उत्तरेस इलिचपुर जिल्हा, दक्षिणेस वाशीम व वणी जिल्हा, पूर्वेस वर्धा नदी, आणि पश्चिमेस अकोला आणि इलिचपुर जिल्हा. अमरावती जिल्ह्याचें क्षेत्रफळ सुमार २९६६ चौरस मैल आहे. व लोकसंख्या ४०७२९६ मैल आहे. त्या मानानें दर चौरस मैलास १५७ मनुष्यें आहेत.

अकोला—याचे उत्तरेस सातपुडा पर्वत, पूर्वेस पूर्ववऱ्हाड, इलिचपुर जिल्हा दक्षिणेस सातमाळ किंवा अजिंठ्याचा डोंगर, पश्चिमेस पयोष्णी नदी पर्यंत बुलढाणें जिल्हा पुढें त्या नदीच्या उत्तरेस खानदेश जिल्हा; याची दक्षिणोत्तर लांबी ७२ मैल व पूर्व पश्चिम रुंदी ६३ मैल आहे. या जिल्ह्यांत १७२६६२९ एकर किंवा २६९७ चौरस मैल जमीन आहे. यांत ४११९७ एकर किंवा ६४ मैल जमीन दुमाले जहागीर व इनाम आहे व बाकी १६८५४२८ एकर अथवा २६३३ मैल सरकार खालशांत आहे.

एकंदर जमिनी पैकीं ३४६७१ एकर जमीन लागवड होण्यासारखी नाहीं, ३१७६१ एकर नद्या, ओहोळ व तलाव या खालीं आहे, ४१२८ एकर बाभूळबन आहे, ६७५० एकर गावठाण आहे, ९३४६० एकर वनचराईकरितां आहे, १०१०६९ एकर नानाप्रकारच्या सार्वजनिक सरकारी कामाखालीं आहे; व बाकी १४५३५८६ एकर पिकाऊ जमीन आहे. व तींत १२७००३ एकर पडीत आहे.

( पुढें चालू. )

हें पत्र अकोला एथें लक्ष्मणराव बाळाजी फडके यांनीं वऱ्हाडसमाचार छा. छा. प्र.

Registered No. 4—1872.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ७ | अकोला, रविवार ता० १६ नोवेंबर सन १८७३ इ० | अंक ४६

## जाहिरात.

### वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डांकहाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| अखेर | २ |

### नोटिशीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश रिपींत दर ओळीस | ०४ |
| " दुसरे खेपेस | ०२ |

## नोटिसा.

नोटिस— गिरधारीलाल कन्हयालाल बस्ती खामगाव तालुके जळगाव यास देण्यांत येते कीं. तुह्माकडेस आमची बाकी खात्यावरून व्याजासुद्धां आजपावेतों रुपये ३०५ घेणे निघत आहे. करितां तुह्मी आजपासून आठ दिवसांचे आंत रुपये दाखल करावे न केल्यास दिवाणी कोर्टांत नोटिशीचे खर्चासुद्धां फिर्याद करून रुपये घेण्यांत येतील कळावे. तारिख १४ माहे आक्टोबर सन १८७३ इसवी. मुक्काम अकोलें

(सही) संभूराम गोर्टीराम दुकान पेठ खामगाव.

---

नोटिस— मंगळाजी शिवराम नाईक साकणे रहाणार खामगाव यांस खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येते कीं तारिख १८ माहे आक्टोबर सन १८७३ इसवीची तुह्मी दिलेली नोटिस पावली त्याचें उत्तर तुह्मास देण्यांत येते कीं वडिलोपार्जीत निगे मालमिळकतीचा हिस्सा मागण्याबद्दल तुमचे आह्मी जबाबदार नाहीं. कारण आपले उभयतांचे तीर्थरूप अद्याप विद्यमान आहेत. सबब आह्मी तुमचे कोणत्याहि प्रकारचे जबाबदार होऊं शकत नाहीं. व जिनगीतलि निगे हिस्सा आह्मांस मागण्याचाहि तुमचा आह्मावर हक्क नाहीं. हें समजावें. तुमचे नोटिशीचा खर्च तुह्मावर असोन या नोटिशीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल तारिख ७ नोवेंबर सन १८७३ इसवी.

( सही ) बाळाजी शिवराम साकणे खामगावकर दस्तुर खुद्द

---

नोटिस—थानासिंग गोटमल रजपुत दुकान अकोट यांस, खालीं सही करणार यांजकडून देण्यांत येते कीं; तुमची व आमची शराकती ठरून सन १२७० फसली सालीं मोजे शिरसोली येथें दुकान सुरू केलें ज्यावेळेस दुकान सुरू केलें त्यावेळेस असा ठराव झाला कीं, तुमच्या रकमेस हंगामशिर व्याज नसून रुईचा हंगाम संपल्यावर राहिले महिन्याचें दिपवाळीपर्यंत व्याज एकोत्तरा प्रमाणें द्यावें व त्याप्रमाणें दिपवाळीस हिशेब होत असे व दोन तीन वर्षांनीं कसरी वाटीत आलों. याप्रमाणें मागें तीन वेळा कसरी वाटल्या गेल्या. दुकान सुरू झाल्यावर केवळ तुमचेच रकमेवर अवलंबून न राहतां आह्मीं शिवलाल गुलाबचंद यांचे रुपये दरसाल च्यारदोन हजार आणून दुकान चालिवलें मात्र तुह्मीं नावाला झाला. ज्या सालीं आमची दुकानांत कसर नसून आमचे नांवें बाकी पडली त्या सालीं पडलेली बाकी आह्मीं तुह्मांस दिली. व दुकानाबद्दल तंटा झाला तेव्हां तुह्मी होवून ह्मणाला कीं, पूर्वींप्रमाणें चालूद्या असें बोलून पुन्हां दुकानांत शराकत केलीत त्या वेळेस तुह्मीं नवा करार केलात कीं आजपासून आपचे रकमेस व्याज नाहीं व तुह्मीं दुकानांत जो गुमास्ता आहे तो मनाकरून तुमचा मुलगा लिहिणारा आहे त्याजकडून लिहिणें लिहिवावें त्यावेळेसच आह्मी उमगून चिलें कीं जर आपण रकमेस व्याज घ्यालें तर गुमास्त्याचा हक्क सवाशें रुपये साल प्रमाणे द्यावा लागेल तुह्मीं कबूल केलें कीं "व्याज लेवेंगा सो हक्क देवेंगा" असें ठरून पुन्हा शराकती झाली पुढें सन १२८२ फसली अखेर जेव्हां तुमचा व आमचा हिशेब कसरीबद्दल मागील रीतीप्रमाणें होऊं लागला तेव्हां तुह्मी नाहीं ह्मणत असतां प्रथम व्याजाचा जमाखर्च करून घेतला पुढें जेव्हां आह्मीं मुलाचे हक्काबद्दल जमाखर्च करूं लागलों तेव्हां तुह्मीं लिसा करून जमा करूं न देतां चालू दफ्तर घेवून अकोटास गेले त्या दिवसापासून तुमचा आमचा खिसा चालला आहे तुह्मीं आमचे नांवें पडलेली बाकीमात्र मागता. न तुह्मी एकट्याचेच मुखत्यारीनें दुकानदारी करता परंतु तुह्मीं एकटे कांहीं मुखत्यार नाहीं असें असून वहिवाट करता परंतु जें तुमच्या मुखत्यारीपासून आमचें दुकानचें नुकसान होईल व झाल्यास, त्याचे जबाबदार तुह्मीं व्हाल व तोटा होईल तो तुह्मांस सोसावा लागेल त्याचे आह्मीं जबाबदार नाहीं व तो अमायकींत धरला जाणार नाहीं, तुह्मीं आमची कसर व मुलाचा हक्क शिवाय आमची जमा पडलेली जमा न करतां आमचे नांवें पडलेली रक्कम मात्र मागतां हें बरोबर नाहीं, कसरीचा व हक्काचा आणि शिवाय जोवा जमाखर्च करून दुकानदारी वटून द्यावी अगर दुकानदारी कोणातरी एकाकडे लागावी. हे हंगामाचे दिवस आहेत याकरितां ही नोटिस देण्यांत येते कीं नोटिस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत खिसा साफ करून टाकावा. खिसा साफ होऊन जिकडे दुकानदारी लागेल त्याजकडे आमचे जवळ असलेलीं मागील दफ्तरें व पुरजे दिले किंवा घेतले जातील कळावे तारीख ८ माहे नवेंबर सन १८७३ इ०

(सही) एकोबा वल्लद रामाजी गढकरी दस्तुर खुद्द.

## पत्रव्यवहार

यासदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये

---

हरिभक्तनारायण रा० रा० वऱ्हाडप्रेमर यांस.

वि. वि. रामराम, नमस्कार, सलाम व गुडबाय वगैरेनीं तोषविलें नाहीं ह्मणून रागाऊं नका. सर्वांचे नाव हरिभक्त हें दिलें आहे यांत सर्वच आलें. खालीं लिहिलेल्या चार ओळीनां छापपण्यात जागा द्या देशसुधारणेचे कामास हें एक मोठें उदाहरण प्रत्यक्ष पाहिलेलें सर्वां पुढें ठेवितों हें मात्र दुसरीकडे तुह्मी फेकूं नका ह्मणजे झालें.

जळगाव तालुक्यांत सोनाळें हें गाव आहे. त्या गावास सोनाजी बुवा साधू प्रसिद्ध होऊन गेले. त्या देखत व मागेंही आजवर कार्तिक शुद्ध १५ मेस यात्रा भरत असते. ही यात्रा बरीच मोठी असून गेगळांत संरक्षणाकरितां स्वार वगैरे येत असत. हल्लीं पोलिस ठाणें येत असतें. यात्रा आठ दिवस असते. मालही बराच येतो. प्रतिपदेचे रात्रीं रथ फिरतो. रथापाशीं गावोगावचीं भजनें येतात त्यांत अभंग ह्मणून अर्थही सांगतात. सालमजकुरीं मी या यात्रेत एक नवीन सुधारणा पाहिली. ती कोणची ह्मणाल तर स्त्रियांनीं पुढें हरदासासारखे उभे राहून भजन आणि अभंग ह्मणावे व मागील वाजविणारांनीं सूर द्यावा. हें पाहून फारच आनंद झाला. शेवटीं मी एक तासभर तें कृत्य पहात उभा राहिलों. ही बाई कुणबी जातीची असून हिचें वय अजमास २०।२५ चे आंत आहे. हिणें वऱ्हाडांत पहिले प्रतीचा अभंगाचा अर्थ सर्वांस सांगितला. हिचें कीर्तन पहाण्यास लोक अजमास १००० वर जमले असतील. दंगा होऊं नये ह्मणून पोलिसचे कान्स्टेबलही वारंवार पंढरपुरचे तोब्याची गति दर्शवित होते. ही सुधारणा समजली पाहिजे. या बाईस भ्रतार आहे अगर नाहीं, रहाणार कोठील वगैरे पत्ता घेऊन मागाहून कळवीन.

हिंदुस्थान हितेच्छुहो, सुधारणेंत सुधारणा ही विशेष समजली पाहिजे. कळावे तारिख १० माहे नोवबर सन १८७३

आपला मित्र

वेताळ.

---

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस—

वि. वि. आपल्या तारिख १९ माहे आक्टोबर सन मजकूरचे अंकांत आमचें कारंजे येथील लायब्ररीचे सभासदांविषयीं जो मजकूर आहे त्याचे पुढें झालेला प्रकार खालीं लिहितों, तो असा कीं, सर्व सभासद जमल्यावर अध्यक्ष स्थानीं रा० बपुजी रंगनाथ ए० असिस्टंट कमिशनर हे बसल्यावर त्यांचे शेजारीं येथील हेड मास्तर बसले होते परंतु सेक्रेटरी कोण आहेत हें मला मुळींच समजलें नाहीं. मग पुढें रा. बापुसाहेब यांणीं सर्व सभासदांस सांगितलें कीं, आपण मागें आग विझविण्याचे बंबाबद्दल वर्गणी रुपये ४०० केली होती. त्याजबद्दल आह्मी डे० कमिशनर साहेबास लिहिलें होतें. त्यांणींहि ५०० रुपये देण्याचें मंजूर केलें यास्तव आतां बंब आणविणें आहे. पण तितक्या रुपयांत बंब येऊं शकत नाहीं. त्याकरितां आणखी दोन तीन शें रुपये पाहिजेत. तसेंच लायब्ररीचें मकाण बांधण्यास शंभर रुपये लागतील तेही सर्वांनीं दिल्यास फार चांगलें होईल. बाजारओळींतील नवीन बांधलेल्या दुकानांत दिवाळीचे पाडव्यास दुकानें न्यावीं असें मला वाटतें." तेंही सर्वांनीं मान्य केल्यावर सभा विसर्जन झाली. एडिटरराव पहा आमचे सभासद सार्वजनिक कामाकरितां मोठे उदारपणानें पैसा देतात हे त्यांचे उपकार समजावयाचे आहेत. परंतु ते आपला जसा फायदा करून घ्यावा तसा घेत नाहींत. ह्मणजे लायब्ररींत गेल्यापासून देशोदेशींचें, वर्तमान व चमत्कार वाचण्यांत येऊन जे फायदे होतात ते ते करून घेत नाहींत याबद्दल मात्र वाईट वाटतें. तर पत्रकर्तेराव तुह्मी तरी त्यांचे ज्ञानचक्षु उघडे करून मार्गी लावाल अशी आशा आहे.

तारिख १८ माहे आक्टोबर रोजीं येथें डेपुटी कमिशनर साहेब यांची स्वारी आली होती. त्यांपुढें येथील कसब्याचे चीफ कान्स्टेबल शिवय्या यांणीं सृष्टीविरुद्ध संभोगाचा एक गुन्हा चवकशीकरितां नेला होता. त्यांतील गुन्हेगार उमर वर्षें २२ चा असून मुलगा पांच वर्षांचा होता. या गुन्ह्याची चौकशी साहेब बहादूर यांणीं करून, तूर्त गुन्हेगार यास बिनभाड्याचे घराची हवा खाण्याकरितां पाठविलें आहे. तसाच येथें एक खुनाचा मुकद्दमा रा० बापुजी रंगनाथ ए. असिस्टंट कमिशनर यांचे समोर चालू आहे—आरोपी एक मांग असून त्याच्या बहिणीनें व्यभिचार करून पोट आणल्याबद्दल याला राग येऊन त्याणें तिला विळ्यानें मान कापून ठार मारिलें. काय हा व्यभिचाराचा प्रकाश आहे. सदरहू गुन्हा पकडण्याचे कामीं शिवय्या चीफ कान्स्टेबल आणि लक्ष्मण सदाशिव हेड कान्स्टेबल या उभयतांनीं फार श्रम घेतले. तसेच मागेंहि एका खुनाच्या आणि डाकाच्या मोकदम्यांत फार मेहेनत घेतली असून त्यांचे वरिष्ठ अधिकारी त्यांस बढतीच्या आशा देत नाहींत. आतां तरी त्यांचे पोलिस सुपरइन्टेंडेंट साहेब दाद लावितील अशी आशा आहे. एडिटरराव येथें तारिख २१ माहे आक्टोबर रोजीं संध्याकाळीं डे० कमिशनर साहेब यांची स्वारी येथील इंग्लिश मराठी स्कूलाची परीक्षा घेण्याकरितां आले होते, त्या समयीं शाळेंतील मुलांच्या परीक्षा घेऊन तसेंच मुलांच्या

करती पाहून अधिक फार खुश झाले. व एथील हेड मास्तर रा. पुरुषोत्तम गणेश येथें आल्यापासून एथील शाळेचा ऊर्जित तत्काळ आला असें त्यांच्या दृष्टीस पडलें. या शाळेंत मुलें १६३ आहेत. तारिख २२ रोजी एथील नवीन बांधलेल्या बाजार ओळींतील दुकानांची शोभा व आरास पहाण्याकरितां सा० ब० यांची स्वारी आठ वाजतां रात्रीनें सुमारास मंगळ दरवाज्यानें आंत शिरून दुतर्फा दिव्यांच्या ओळींची शोभा पहात पहात आले. दिल्ली दरवाज्या नजीक एक सुंदर बांधलेला कमानीसारखा दरवाजा केला होता त्याचे नजीक पोलिसचे शिपाई लोक सलामी देण्याकरितां उभे केले होते. व तेथें चौघडा आदिकरून सर्व वाद्यांचा घोष चालू होता. अशा प्रकारची शोभा पाहून सा. ब. यांस मोठा आनंद झाला. नंतर त्यांस पोलिस स्टेशनानजीक सुंदर सुशोभित जागा केली होती त्या ठिकाणीं सा. ब. यांची स्वारी सर्वांचे सलाम घेत येऊन बसल्यावर दारूकाम व बंधाट फिरवण्याचे खेळ सुरू झाले अशा प्रकारचे खेळ आटपल्यावर सा. ब. यांणीं खुश झाल्याबद्दल सर्वांस असे सांगितलें कीं तुह्मी ही सर्व केलेली शोभा पाहून मला फार आनंद झाला. तसेच तुमचे सर्वांचे नशीबानें बापुसाहेब यांची एथें नेमणूक झाल्या दिवसापासून या शहराचा ऊर्जितकाळ आला आहे व त्यांनीं या सर्व शहराची सुधारणा करण्याचे कामात फार श्रम घेतले याजबद्दल त्यांचे येथें सदोदित नाव रहाण्याकरितां या पेठेचें नाव बपुजी रंगनाथ पेठ हें द्यावें अशी माझी इच्छा आहे. असें दर्शविल्यावर सर्व शेट सावकार आदिकरून सर्वांनीं हाच विनंती केली कीं आमची सर्व लोकांची अशीच आशा आहे. असें सर्वांनी सांगितल्यावर सा. ब. यांणीं तेंच नाव कायम केलें. नंतर पानसुपारी अत्तर गुलाबपाणी वाटल्यावर सा. ब. यांची स्वारी उठून सर्वांस सलाम करून सर्व शहरची शोभा पाहून बंगल्याकडेस चालती झाली. तर एडिटर सा० आमचे बापुसा० प्रमाणें सर्व कामदार मेहनत घेऊन निःपक्षपातानें झटून काम करतील तर आमचे वऱ्हाडांतील लोकांचे प्रारब्ध उदयास आल्यावाचून रहाणार नाहीं. परंतु आह्मी परमो नशीबाचे खराटे. तेव्हा असे अधिकारी कोठून मिळणार. मिया व हजरत आणि बडे साहेब हेच आमचे वऱ्हाडात बाहिले आहेत. कळावें पत्रविस्ताराची माफी मागतो हे विनंती.

आपला फिरस्ता.

वऱ्हाडसमाचार

मिती कार्तिक वद्य १२ शके १७९५

## न्यायकोर्टाचें स्थळ.

इंग्लिश सरकारचें राज्यांत न्यायाच्या कोर्टाचें स्थळ एक जागीं मुक्रर केलें असतें व तें तसें असलें ह्मणजे प्रजेस व सरकारास मोठी सोय असते. दिवाणी किंवा फौजदारी एक मुकदमा चालावयाचा ह्मणजे त्यांत वेगवेगळाल्या गांवचे पक्षकार, साक्षिदार, वकील, फिर्यादि, आरोपी, व त्यांचे रक्षणार्थ सरकारी लोक असे हजर होतात, व तो मुकदमा एकच वेळ चालून निकालास लागतो असें नाहीं कित्येक वेगवेगळ्या दिवशीं त्याची चौकशी चालत असते ह्मणून त्याकरितां जागा एक मुक्रर असावी हे फार चांगले. मुलकी कामाच्या संबंधानें अधिकारी बाहेर गांवीं फिरतात व ते आज उत्तरेस तर उद्या दक्षिणेसही जातात आणि त्यांनीं तशा फिरण्यांत मुकदमे बाहेर गांवीं नेले ह्मणजे रयतेस कांही फार त्रेधा होते. त्यांना साहेबाचा मुक्काम कळत नाहीं व त्यांचे अज्ञानपणामुळें भलत्याच गांवीं ते भलत्याच साहेबाच्या तंबूवर जातात. कारण अडाणी जातीचे व खेड्यापाड्यांतील लोकांना कोणत्या तालुक्यांतले कोण साहेब हें कांही कळत नाहीं. व साहेब लोकांची अवघड नावें त्यांच्या तोंडातून भलत्याच उच्चारानें निघत असतात. नौजिया साहेब कोठें आहेत ह्मणून कोणी विचारिलें असता नवे आले साहेब किंवा नोजिस साहेब गांवाबाहेर अमराईंत उतरले आहेत महाराज असें महार पोर सांगतात व तेथें जाऊन पहावें तो पोलिस सुपरिंटेंडेंट किंवा दुसरे कोणी असतात. अवल कोर्टाचे साहेबांचा पत्ता विचारावा तो पोष्टर साहेबाचा पत्ता लागतो. व तेथून त्या पार्टीचे साहेब बरेच दूर असतात मग साहजिक त्या मनुष्याचे गैरहजिरीनें न्याय कोर्टाचें काम एकादे भलत्या गांवीं चालतें व त्याचा दावा बुडतो, तो प्रतिवादी असला तर त्याला आपली तक्रार सांगण्यास मार्ग न राहून त्याविरुद्ध फैसला होतो. तो साक्षीदार असल्यास "तुरुंगांत धरिले जाईल व तुमची जिनगी जप्त करून विकली जाईल" हे समन्सांतील शब्द जपांत बसून तो भयानें गांगरून जातो, सरकारतर्फे साक्षिदार असल्यास भत्त्याखातीं नाहक विशेष खर्च येतो. वकील लोकांस अधिक दगदग पडून पक्षकार लोकांवर खर्चाचा बोजा अधिक बसतो. याशिवाय अधिकारी लोक स्वैर वागून रयतेचें नुकसान करितात. वाडेगांवास अमुक दिवशीं हजर व्हावें अशी मुकदम्यांतील लोकांस समन्स द्यावी आणि आपण त्या दिवशीं पातुरास असावें. असेही कधीं कधीं घडतें. कधीं कधीं नेमल्या दिवशीं साहेबाच्या मुक्कामाचा गांव कळविण्याची विलक्षण तऱ्हा घडते. ह्मणजे अशी—अमुक दिवशीं तुह्मी बाळापूर व देऊळगाव साकरशा याचे दरम्यान हजर रहावें. या दोन गांवांचे दरम्यान अंतर सुमार १० मैलांचें आहे व मध्यें गावही कित्येक आहेत तेव्हा रयत लोकांनीं कोणत्या गांवीं ह्मणून हजर रहावें हे त्यांस कळत नाहीं व त्यांचा मोठा घोटाळा होतो. अशा कित्येक अडचणीवरून न्यायाधिकाऱ्यांनीं न्याय निवाड्याचें काम सदर स्टेशनाबाहेर नेले असतां चालूं नये ह्मणून मागें मेहेरबान लायल साहेब कमिशनर असतां त्यांनीं सक्त ताकीदा देऊन बंदी केली होती पण ती वहिवाट पुन्हा सुरू आहे व तेणेंकरून लोकांस मोठा ताप होतो असें समजण्यांत आलें आहे. तर या गोष्टीकडे मेहेरबान कमिशनर साहेब लक्ष्य पुरवून रयतेची अशी गैरसोय होऊ देणार नाहींत अशी आह्मी आशा करितो.

## हायस्कुलांतील तीन वर्षांच्या स्कालरशिपा.

वऱ्हाडच्या विद्याखात्याचे अक्टिंग डायरेक्टर मि० कर्काडी साहेब यांनीं थोडंच दिवस वऱ्हाडांत असतां ज्या कांहीं सुधारणा केल्या त्या वर्णनीय आहेत. गुदस्तांसालापासून म्याट्रिक्युलेशनच्या परीक्षेंत पास होणाऱ्या तीन मुलांस मुंबई पुण्याकडे कालेजांत जाऊन शिकण्यास मदत होण्याकरितां व पुढच्या परीक्षा देण्याच त्यांस उत्तेजन येण्याकरितां वीस वीस रुपयांच्या तीन वर्षांच्या मुदतीच्या स्कालरशिपस मेहेरबान रेसिडेंट साहेब यांचे परवानगी घेऊन त्यांनीं ठरवून दिल्या हो वऱ्हाडच्या होतकरू विद्यार्थ्यांवर त्यांनीं अलोट कृपा केली असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. त्याचप्रमाणें कांपिटीशन परीक्षेचा बेदा मोडून दोन हायस्कुलांच्या निरनिराळ्या प्रवेश परीक्षा ठरविल्या. व मिडलक्लास स्कुलांतून जे नवीन विद्यार्थी पास होऊन हायस्कुलांत शिकण्यास येतील त्यांतील वर आलेल्या दहा स्कुलांतल्या पहिल्या मुलाला एकेक सहा रुपयांची स्कालरशिप तीन वर्षांच्या मुदतीची देण्याचा ठराव केला; ही त्यांनीं एक मोठी उत्तम योजना केली यांत संशय नाहीं. हुशार मुलें तीन वर्षें हायस्कुलांत शिकलीं ह्मणजे चवथ्या वर्षी तीं म्याट्रिक्युलेशनच्या परीक्षेस जातील व तींत पास झालीं असतां वरील रुपयांवर कालेजांत जातील व कोणी घरतील तर ल्हा नागपुरास ह्मणजे देशभाषेच्या १० रुपयांच्या स्कालरशिपा मिळवितील असा त्यांचा सुमार असावा अशी आमची कल्पना होती; पण या वर्षास जीं मुलें हायस्कुलच्या प्रवेश परीक्षेत पास झालीं त्यांतून कोणासही गुदस्तप्रमाणें तीन वर्षांच्या मुदतीच्या नव्या स्कालरशिपस मिळावयाच्या नाहींत असें एकण्यांत आलें आणि तें खरें असेल तर मोठें चमत्कारीक आहे. मुदतीच्या स्कालरशिपा असतात त्या जितक्या वर्षांची मुदत तितक्या वर्षें नव्या नव्या द्याव्या लागतात मग त्या फेरपाळीनें मिळत असतात ह्मणजे गुदस्त (सन १८७२) सालीं ज्या मुलांस तीन वर्षांच्या स्कालरशिपा मिळाल्या त्या त्यांच्याकडे सन १८७४ पर्यंत चालाव्या या वर्षी मिळतील त्या सन १८७५ पर्यंत व पुढले वर्षी मिळतील त्या १८७६ पर्यंत चालाव्या असा क्रम पाडून व याकरितां तीन वर्षांच्या ३० स्कालरशिपांचे सांगड एकदम आणवून द्यावयास पाहिजे होत. तसें न करितां फक्त गुदस्ता पुरतीच ही तजवीज मि० कर्काडी साहेब यांनीं केली होती असें एकतो व तसेंच खरें असेल तर यांत कांहीं व्यवस्था व योजना मुळींच झाली नाहीं असें ह्मटलें पाहिजे. तीन वर्षांच्या मुदतीच्या स्कालरशिपा एकच वर्ष दिल्या यांत त्या शाळेच्या मुलांनीच कांहीं विशेष पुण्य केलें होतें कीं काय? किंवा कांहीं साहेबांच्या मेहेरबानीनें त्यांचाच तेवढा हक्क होता कीं काय? आह्मांस वाटतें कीं हा ठराव केवळ चुकीचा झाला. गुदस्तप्रमाणें आणखी दोनवर्षें नव्या स्कालरशिपा देणें डायरेक्टर साहेबांस अवश्य आहे व अजूनही ते आपली चूक असेल तर सुधारून रेसिडेंट साहेबांकडून या व पुढच्या सालाकरितां नव्या स्कालरशिपस आणवितील व वऱ्हाडच्या गरीब विद्यार्थ्यांवर उपकार करून ठेवितील असें आह्मी सोत्कंठ इच्छितों.

## वस्त्रें विणण्याच्या यंत्रास हरकत.

मुंबईंत मुरारजी गोकुळदास या नावाचे मोठे सावकार आहेत त्यांचे नावानें चालणार कापडाची गिरणी आहे. त्याच गृहस्थानें मनांत सोलापुरास एक गिरणी ह्मणजे सूत काढण्याचीं व कापड विणण्याचीं यंत्रें स्थापन करावीं असें आलें. वेशी बाहेर पडीत जागा सरकारी आहे ती त्यांनीं विकत मागितली त्यावरून अधिकाऱ्यांनीं तिचा लिलाव केला त्यांत ५०० रुपयांहून अधिक कोणी बोलत नाहीं असें पाहून अखेर तीन वार करण्याचे परवानगीकरितां वरिष्ठांस लिहिलें. तिकडून हुकूम आला कीं, त्या जागेचे हजार रुपये रसाई व दर साल १५०० रुपये भाडें देत असतील तर ती जागा द्यावी, नाहीं तर देऊं नये. असें सोलापुरचे वर्तमानपत्रावरून कळतें. ही गोष्ट खरी असेल तर नेटिव लोकांनीं लक्ष्यांत आणण्याजोगी आहे. मुळीं पडीत जमीन व ती उद्योगांत येते तर सरकारानें अवश्य द्यावयाची होती; लोकोपयोगी व सार्वजनिक हिताचें काम कोणी आरंभल्यास सरकार द्रव्याची मदत देते व इतरही सहाय पुष्कळ करितें. चांगल्या कापसाची लागवड होण्याकरितां शेतकरी लोकांस सरकारानें अनंत प्रकारें मदत केली आहे व अजूनही तें करीत आहे हें आमच्या बहुतेक वाचणारांस माहित असेल. मग कापसाचें सूत व कापड तयार करण्याचें यांत्रिक काम देशांत नवीन सुरू होतें तर तेथें सरकारानें विशेष मदत करावयास नको होती काय? अलबत मदत करणें अवश्य होतें. पण या कामीं सरकारानें केवळ वाकडी गोष्ट केली; जागेचा लिलाव मांडल्यावर जो कोणी सर्वांत अधिक दाम बोलेल त्यास ती जागा मिळावी अशी सर्वत्र वहिवाट आहे. व त्याप्रमाणें ५०० रुपये त्या जागेची किंमत झाली असतां सरकारानें १००० रुपये मागितले, ते मागावयाचे नव्हते. बरें, इतकी किंमत आल्याशिवाय आपला माल आह्मास द्यावयाचा नाहीं असें मालकास ह्मणावयास थोडा बहुत हक्क आहे असें मानिलें तरी पुढें जें सरकारानें वर्षास १५०० रुपये भाडें मागितलें तें मागण्यास सरकारास हक्क आहे असें आह्मास कोणत्याही रीतीनें दिसत नाहीं. वार्षिक भाडें मागावयाचें होतें तर जागेची किंमत कां मांडली? ते आह्मास कळत नाहीं. असो. कापड विणण्याचीं यंत्रें

आपल्या देशांत वृद्धी पावण्यास विलायतचे लोक मोठमोठ्या अडचणी आणू पहातात असें जें आपले कानावर आहे त्या गोष्टीस या दरीक करण्यानें सरकारानेंही आपला थोडा अंश आहे असें दाखविण्याची येणेंकरून कल्पना लोक करितील असें आह्मास वाटतें. परंतु आपल्या सरकाराविषयीं लोकांची अशी कल्पना होणें बरें नाहीं ह्मणून सरकारानें हिंदुस्थानांत कापडाचीं यंत्रें जागोजाग घालून जातीनें या गोष्टीस विशेष मदत करावी ह्मणजे त्यांचें कर्तव्यकर्म बजाविलें जाऊन लोकांस पक्षपाती वर्तन दिसलें जाणार नाहीं. कापूस तयार करण्यास सरकार सहाय्य देते. आणि वस्त्रें तयार करण्याच्या यंत्रास सहाय्य देत नाहीं, तर कापूस विलायतेस न्यावा व तिकडून त्याचीं वस्त्रें बनावीं, हिंदुस्थानचे लोकांस ती विद्या व ती सोय असूं नये असा सरकारचा गर्भित कल असल्याचें लोकांस दिसूं लागेल.

## बडोद्याचा चौकशी.

नेमलेले सर्व कमिशनर बडोद्यास जाऊन चौकशीचें काम सुरू झालें. सरकारानें अहमदाबादचे असिस्टंट कलेक्टर मि० मेकर्ता साहेब यांस या कमिशनचे सेक्रेटरी नेमिलें आहे. भाऊ शिंदे यांस तुरुंगांत विष घालून मारिलें या मुकदम्याची चौकशी प्रथम होणार असें ह्मणतात. वादिगी १८ असामी आहेत. कैलासवासी खंडेराव महाराजांचे कुटुंबाने कोणी आप्त साक्षी करितां आले आहेत. व दुसरेही पुष्कळ लोक आले आहेत. खंडेरावचे लोकांनीं तर पाळत ठेविली आहे कीं चौकशी कधीं सुरू होते व आह्मी आपली माणसें तीत केव्हां नेऊन ठेवितो. याप्रमाणें बडोद्यास हल्लीं मोठी गडबड होऊन राहिली आहे. लोक ह्मणत होते कीं कमिशन फक्त कंटीनेंट फौजेबद्दल आहे. सदरील गोष्टी तपासण्यास कमिशनास अधिकार नाहीं. व ऐकण्यांत तर असें आहे कीं रेसिडेंट साहेबांनीं सुमारें अडीच हजार अर्ज गायकवाडाच्या व दरबारी लोकांच्या विरुद्ध झालेले कमिशनापुढें पाठविण्यास सज्ज केले आहेत. कोणी ह्मणतात कर्नल फेर रेसिडेंट या कामांत अधिक प्रसंग करितात, कोणी ह्मणतात ते फार विचारी आहेत त्यांकडून योग्य प्रकरणाशिवाय अधिक प्रसंग कधीं व्हावयाचा नाहीं. असो. आतां पुढें काय होतें पाहूं.

## वऱ्हाड

कमिशनर क०. बेल साहेबांची स्वारी वाशिमाकडून या आठवड्यांत इकडे फिरत फिरत येईल.

—०००—

येथील स्मालकाज कोर्टाचे क्लार्क आफ धि कोर्ट व कारकून, नाझर, शिपाई वगैरे येऊन कामाची सुरवात झाली. जुन्या हायस्कुलांत कोर्टास जागा दिली आहे व २० वे तारखेपासून मुकदमे नेमिले आहेत.

—०००—

एम ए. च्या परिक्षेकरितां येथील हायस्कुलांतील फर्स्ट असिस्टंट रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी बी. ए. या आठवड्यांत मुंबईस गेले. व खामगावचे स्कूल मास्तर रा. रा. निळकंठ नारायण भट हे बी. ए. च्या परिक्षेस या वर्षी उमेदवार आहेत व तयारीकरितां त्यांनीं दोन महिन्यांची रजा पूर्वीच घेतलेली आहे. हे उभयताही गृहस्थ पास होतोत असें आह्मी इच्छितो.

—०००—

गेले आठवड्यांत आमचे रिपोर्टराकडून आह्मांस वर्तमान मिळालें होतें कीं उमरावतीचे स्माल्काज जड्ज क्या० मॅनिस साहेब रजेवरून परत आले व खामगावचे स्माल्काज जड्ज क्या० ग्रांट साहेब हे आपले जागेवर परत आले; परंतु त्याप्रमाणें त्या आठवड्यांत घडून आलें नाहीं ही बातमी चुकीची ठरली त्याकरितां आह्मी दिलगीर आहों. आतां खरखराजागीं वर्तमान समजलें आहे कीं क्या० मॅनिस साहेब काल १९ वे तारखेस उमरावतीस आपले कामावर रुजू होणार होते व क्या० ग्रांट साहेब खामगावास येणार होते. आतां मि० दस्तुर बहिरामजी साहेब एक दोन दिवसांत येथें येतील.

## नोटिस.

नोटिस—लक्ष्मण वल्लद नवरंगा रहाणार चांदूर तालुके अकोलें यास खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तारीख २ माहे नोवेंबर सन १८७३ इसवीचे वऱ्हाडसमाचाराचे द्वारानें नोटिस दिली त्याजबद्दल उत्तरीं कळविण्यांत येते तें असें कीं, सखाराम वल्लद हिरामण मालगण यांजकडील पैशाविषयीं तुमचा बाप वगैरे जामीन होते आणि तुह्मी बापापासून पंधरा सोळा वर्षें वेगळेच अहां. तुमचा मुलगा व पुतण्यामात्र नवरंगजीच्या जवळ होते मवत्र नवरंगजी मेल्यावर रुपयाविषयीं नारू वगैरेस तगादा केल्यावरून तूर्त आमचे पाशी नाहीं, हिशेब करून नवीन पूर्ती करून देतो असें कबूल करून सदर्हू इसम वगैरे मिळून आपले खुशीनें स्टांप कागद आणून दोन दस्तैवज करून दिले असून त्या वेळस तुमची मातुश्रीही होती. नंतर तुह्मी व नारू व शिदू मळून असे मिळून मार्गील दोन पूर्ती दोनशे बासष्टचे घेऊन गेले, आह्मी नवरी वगैरे बिलकूल केली नसून विनाकारण आमची रक्कम बुडविण्याकरितां नोटिशींत खोटा मजकूर जाहीर करता. पुर्ती लिहिली तो कोणी लिहिला, साक्षीदार कोण आहेत ही सर्व माहिती पुरजा लिहून देणारे नारू वगैरेस आहे. कराराप्रमाणें आमची रक्कम अदा न झाल्यास शिरस्त्याप्रमाणें तजवीज होईल. विनाकारण तुह्मी नोटिस दिल्यामुळें आह्मास जबाब देणें भाग पडलें सबब या नोटिशीचा खर्च आणून द्यावा न दिल्यास शिरस्त्याप्रमाणें तजवीज करूं. तारीख १४ माहे नोवेंबर सन १८७३ इ.

(सही) मुकुंदलाल नन्हालाल दस्तुर बनारसीलाल.

## वर्तमानसार

मुंबईस पुढील सालाकरितां मि० नेल्सटेलर यांस शेरिफ नेमणार.

अयोध्या आणि रोहीलखंड रेलवेचे नवीन दोन तुकडे नोवेंबरचे पहिले तारखेपासून सर्व लोकांकरितां सुरू झाले.

मुंबई सरकारानें केलेला मिठाचा जुलमी कायदा हिंदुस्थान सरकारानें पास करूं नये. व कायदे पास करण्याचे कामीं मुंबई कौंसल फार घाई करते ती त्यानें करूं नये या बाबत मुंबईच्या हजारो लोकांनीं हिंदुस्थान सरकारास अर्ज केला आहे.

सर जमशेटजी जीजीभाई यांस हिंदुस्थान सरकारानीं मेटीस बोलाविल्यावरून ते मुंबईहून ६ वे तारखेस तिकडे गेले.

ड्यूक आफ एडिंबरो यांची मालमत्ता—ग्राम नोटस पब्लिक ओपिनियनवरून समजते कीं, ड्यूक यांची होणारी पत्नी ह्मणजे रशियाच्या बादशहाची कन्या इचा बापापासून मिळणारें पेनशन व रोकड पैशाशिवाय क्रिमिया येथें मोठी स्थावर मिळकत ह्मणजे जमीन जुमला मिळणार आहे. तसेंच जर्मनींतील ड्यूक आफ गोथा हे आपले वारसास ह्मणजे ड्यूक आफ एडिंबरो यांस ३०,००० रुपयाचें सालीना पेनशन करून देणार आहेत, व ब्रनसविक एथील ड्यूकही कांहीं नेमणूक करून देण्याचे विचारांत आहेत. विक्टोरिया राणी साहेबही आपल्या मुलाला १५,००,००० रुपये प्रिन्स आलबर्ट यांनीं ठेविलेल्या फंडांतून देणार आहेत. या खेरीज पार्लमेंटाकडून नेमणूक मिळणें आहे ती निराळीच!

इंग्लंडांतील लोकांचे संपत्तीचें अनुमान खालीं लिहिलेल्या एका गोष्टीवरून करतां येईल. रोजगार व धंदे यापासून होणारे प्राप्तीवरील करांचें परिशिष्ट छापून प्रसिद्ध झालें आहे त्यांतील तपशील—गतवर्षी तारीख ५ एप्रिलपावेतों ग्रेटब्रिटनांत एकंदर ४३७७३३ मनुष्यांवर कर बसला. ज्या रकमेवर कर घेतला ती १२२२१७४१८० इतकी होती व कराची रक्कम ३०५९३३६० इतकी झाली. एक लक्षावर व पांच लक्षांचे आंत मिळविणारे लोक १८५७ होते आणि पांच लक्षांवर मिळविणार लोक ६८ होते.

सर सालरजंग यांणीं आपल्या चिरंजीवांस शिकविण्याकरितां मि० स्मिथकोर्ट यांस ठेविलें आहे असें कळतें हे साहेब जा[illegible] चिरंजीव असून मोठे विद्वान आहेत. थोडे दिवसांपूर्वी विलायतेतील फ्रेझर्स मासिक पुस्तकांत हफीज व त्याचे भाषांतरकर्ते या विषयावर जे निबंध येत असत ते यांच साहेबांनीं लिहिले होते. असें ह्मणतात कीं हल्लींच प्रसिद्ध कवि टेनिसन साहेब यांचे मुलाचा अभ्यास हे पहात होते.

यंदा उत्तर हिंदुस्थानांतील बंगाल, बहार आणि छोटा नागपूर येथें ठिकठिकाणीं फारच कमी पाऊस पडल्यामुळें सुमारें एक लक्ष ऐशीं हजार चौरस मैलांत पीक चांगलें न होऊन सुमारें ६ कोटि मनुष्यांस अन्नाची अडचण पडणार आहे सदर्हू अडचण होईल तितकी दूर करण्याकरितां ह्मणून गवरनर जनरल व लेफटनेंट गवरनर यांणीं कालवे, पूल, रेलवे व दुसरीं कित्येक लोकोपयोगी कामें एकदम सुरू करून लोकांस मदत करावी ह्मणून ठराव प्रसिद्ध केले आहेत.

शाळा जाळणारा फकीर—गुजराथेंत नडियाद परगण्यांत कित्येक शाळा जळाल्या त्यांचा बरेच दिवस पत्ता लागेना. शेवटीं पोलिसानें पाळत ठेवून एक मुसलमान फकीर पकडला. तो सांगतो कीं कित्येक दिवसापूर्वीं माझी बायको फरारी झाली. ती सांपडून देण्याविषयीं मी सरकारास अर्ज केला. पण सरकारानें दाद घेतली नाहीं व माझ्या अर्जाचें उत्तरही दिलें नाहीं ह्मणून मी रागावलों व सरकारचा सूड उगविण्यासाठीं हें शाळा जाळण्याचें काम चालविलें. मला पकडलें नसतें तर मी सर्व शाळा जाळून टाकल्या असत्या.

वायव्यप्रांताचे लेफ्टिनेंट गवरनर जनरल आग्र्यास गेले.

मुंबईचे गवरनर आग्र्यास गवरनर जनरल साहेबांचे भेटीकरितां निघाले ते काशीस गेले होते. तेथें दोन दिवस राहून पुढें लखनौस गेले.

बाबू नोबीनचंद्र आणि महमद हुसेन खान सी. एस. आय. हे विलायतेस साक्ष देण्याकरितां लवकरच जाणार, अशी सरकारी बातमी प्रसिद्ध झाली आहे.

आग्र्यास नामदार गवरनर जनरल साहेब येणार त्याकरितां तेथील म्युनिसिपाल कमिटी रोषनाई व दारूकाम करणार आहे.

मि० जान मारियट बी. ए. बारिस्टर यांस मि० जस्टिस ग्रीन यांचे जागेवर मुंबई हायकोर्टांत जड्ज नेमिलें.

विलायतची आगबोट मुंबईत १४ वे तारखेस आली तींतून आनस्टी साहेबांची पत्नी आली आहे.

सर जमशेटजी जीजीभाई बारोनेट आग्र्यास जाण्याकरितां निघाले ते जबलपुरास गेले तेव्हां मेसर्स काशेटजी आणि कामाजी यांच्याकडे उतरले. त्यांणीं त्यांचें आदरातिथ्य उत्तम केलें. फौजेकडील सेनापतीनीं बारोनेट साहेबांचे दिमतीस एक स्वारांची टोळी दिली होती. काशेटजी यांणीं दिवाणखाना वगैरे लावून मोठी उत्तम शोभा केली होती. बारोनेट साहेबांबरोबर त्यांचे तीन चिरंजीव आणि दुसरे कित्येक पारशी गृहस्थ आहेत.

पुण्यास 'स्वदेशकल्याण' या विषयावर भाऊ साहेब नातु यांच्या दिवाणखान्यांत गेल्या गुरुवारीं रात्रीं वे. शा. सं. रा. रा. विष्णु शास्त्री पंडित यांणीं फार सुरस कीर्तन केलें. मंडळी खूब जमली होती. ज्यास कीर्तनाची खबर लागली त्याणें येण्यास आळस केला नाहीं. पुष्कळ मंडळीस निमंत्रण पत्रिका गेल्या होत्या. मंडळीचा आदरसत्कार व बसविण्याची व्यवस्था उत्तम होती. तथापि गर्दी फार झाल्यामुळें मंडपाचे दिवाण असूनही लोकांच्या अंगांतून घामाच्या धारा चालल्या होत्या. हरिदास बुवा जातीचे विद्वान, बहुश्रुत, शोधक, कांब, नम्र, असे प्रकारचे असून तसेंच पोंड अगदीं बृहस्पतीच्या नीतिक पोचलेले, हास्यमुख असे असल्यामुळें फारच मनोरंजक आणि प्रसंगास योग्य असें भाषण होतें. वक्तृत्व, कंठमाधुर्य आणि इतर हावभावास शोभविणारे त्यांचे हाव

इतर हरिदासास शोभविणारे त्याचे हाव भाव पाहून हे एक विद्वान हरिदासपणाच करित आले आहेत काय? असें श्रोत्यांस वाटल्यावाचून राहिलें नाहीं. आर्यावर्तातील ( या हिंदुस्थानातील ] चौदा विद्या आणि चौसष्ट कलांचे जनक प्राचीन आर्य लोक आणि हल्लींचे आपण नामधारी यांच्या विद्या, ज्ञान- संपत्ति, त्यादिकांच्यामध्यें जें हल्लीं महदंतर बसत आहे त्याचें उत्तम प्रतिपादन करून त्या पाराच्यासंबधानें झालेली या आर्यवर्ताची दुर्दशाही चांगले प्रकारें वर्णन करून दाखविली. या प्रकारचे हे गोसाव्यांच्या मालिकेतील दुसरे गोसावी होत. यांचे आज रोजीं सायंकाळीं वेताळ पेठेंत रा. रा. सखाराम बाळकृष्ण स्कूलमास्तर यांच्या घरीं दुसरें कीर्तन होणार आहे. लो. च्छु

सुरते नजीक सीगनपूर नावाच्या खेड्यांत ११४ वर्षांच्या वयाची एक पारशीण आहे व तीस ७५ वर्षांची मुलगी व ५० वर्षांची नात आहे. सदहू वृद्ध बाई अजून चांगली सदृढ आहे.

गुजराथीमित्रावरून कळतें कीं, रा. रा. भाऊ खेडकर यांस गाइकवाडानें पुनः चाकरीस ठेविलें-

तारिख १ माहे नोंवेबरच्या येथील आर्गस पत्रांत रा. अनंदराव लक्ष्मण उर्फ भाऊ खेडकर हे दोन वेळ वर्तर्फ झाले वगैरे प्रकारचा मजकूर लिहिला असल्यामुळें भाऊ खेडकर यांनीं डाकास साहेब यांच्या मार्फत आर्गस पत्राच्या मालकास अशी नोटिस दिली आहे कीं सदहू मजकूर छापल्याबद्दल क्षमा मागून तो खोटा आहे असें आपल्या पत्रांत न छापलें तर लायबलची फिर्याद केली जाईल.

बंगाल्यांत थोडा पाऊस पडल्याची खबर तारायंत्रद्वारें आली आहे. परंतु आतां पाऊस पडला तथापि त्यापासून कांहीं उपयोग नाहीं.

वायव्य प्रांतीं मुलींच्या शाळांची तपासणी करण्याकरितां दोन मडमा इनस्पेक्टर्स नेमल्या आहेत.

बंगलूरचा सेसन नज्ज कैद्यास शिक्षा सांगत असतां, कैद्यानें आपल्या पायांतील जोडा काढून जडजास फेंकून मारला.

तारीख १३ माहे मजकूरच्या तारेवरून कळतें कीं जर्मनी व फ्रान्स यामध्यें झालेल्या लढाईंत फ्रेंच लोकांस एकंदर किती खर्च झाला त्याचा अनमास सुमारें ४,३६,९५,००,००० रुपयांपेक्षां जास्त आहे.

इराणच्या सरहद्दीवरील तुर्क लोकांवर स्वारी करण्याचा रूसलोकांचा बेत असल्याविषयीं तार आली आहे.

लांडग्याच्या गुहेंत सांपडलेल्या मुलाविषयीं अलीकडील खबर अशी कळते कीं, त्यास हल्लीं लखनौ एथील इसपितळांत ठेवलें आहे. तो थोडें बोलूं लागला आहे. हा मुलगा फैजाबाद परगण्यांत लांडग्याच्या गुहेंत सांपडला. वय सुमारें १४।१५ वर्षांचें आहे. अंगावर जखमा झाल्याचे वण आहेत. समोरील दांत किंचित पुढें आले असून थोडे आंत वळले आहेत. नखें फार कठीण झालीं आहेत परंतु तीं आतां काढविलीं आहेत. कच्चें मांस खावयास मागतो परंतु तें त्यास देत नाहींत. अन्नाचें ताट पुढें नेलें ह्मणजे अजून तोडांनें खातो. दोन पायांवर माणसासारखें अजून त्यास चांगलें चालतां येत नाहीं. परंतु जनावरासारखें हातापायांवर जलद चालतो. गुहेंत लांडगे मांस आणून देत असत व पूर्वींचें कांहीं आठवण नाहीं असें सांगतो. ने. ओ.

मुंबईच्या तुरुंगांत खून—गेल्या मंगळवारीं धारवाडचा मर्दानशहा वल्लद शरीफशाहा या नावाचा एक मुसलमान तेथें आलेला कैदी यानें एकाएकी व विनाकारण जेम्स टाम्सन या नावाच्या युरोपियन वार्डरास एका बांबूच्या काठीनें डोकें फोडून ठार मारलें. त्यानें काठीचे दोन टोले मोठे जबर मारले त्याजमुळें तो युरोपियन तावडतोब मेला. त्या वेळेस आसपास दुसरे कैदी होते त्यांनीं धांवून मोठ्या प्रयासानें धरून त्याच्या हातांतील काठी हिसकावून घेऊन त्यास अधिकाऱ्यांच्या हवाली केलें. या मनुष्यास एकंदर २१ वर्षांची कैद होती.

मुंबईच्या लोकांची सभा—पूर्वीं शेरीफमार्फत सूचना झाल्याप्रमाणे शनवारीं टौनहालमध्यें अतिशय मोठा जमाव जमून सभा झाली. अध्यक्षस्थानीं येथील प्रसिद्ध गृहस्थ फार्बस साहेब हे होते. याप्रसंगीं मेसर्स फार्बस, बाळाजी नारायण खोटे, नसरवानजी जमशेटजी रत्नाकर, पेडर, ब्रैट, काशिनाथ त्रिंबक तैलंग, आर्देसर हार्मसजी वाडिया, बाळमंगेश वागळे, जनार्दन सखाराम गाडगीळ वगैरे मंडळींनीं भाषणें केलीं. या सभेंत मिठाच्या कराच्या कायद्यास संमति देऊं नये ह्मणून गवर्नर जनरल साहेब यांस अर्ज करावा व त्यांस काय देकौन्सलच्या गेल्या सेशनांत कायदे पसार करण्याच्या कामांत अतिशय त्वरा झाली ह्मणून ठरलें. अर्ज तयार करून पाठविण्याकरितां कमिटी नेमिली. रा. रा. काशिनाथ त्रिंबक तैलंग यांचें भाषण आमच्या गवर्नरसाहेबांच्या भाषणास उत्तम उत्तर होतें. असें सर्वांस वाटलें. एकंदरीनें त्यांचें भाषण फार चांगलें झालें व सभेचा थाट ही फार चांगला उतरला. पुण्याचे व इतर ठिकाणचे लोक देखील आले होते.

कर्नाटक रेल्वेच्या कामास गेल्या बुधवारी सकाळीं चिंगलपट येथें आरंभ झाला.

ताजमहाल शहाजहान यांनीं बांधला व त्यास चार कोटि अकरा लक्ष रुपये खर्च लागला.

गेल्या महिन्यांत खेडा जिल्ह्यांतील कितिएक शालागृहें जळाल्यामुळें, डा. बुल्हर ए. इ. यांनीं, मर्थे व मास्तर लोक यांनीं शाळांतून निजावे असे चमत्कारिक सर्क्युलर काढलें आहे.

रेल्वेंत नेटिवांचा कमी भाग—हिंदुस्थानांतील रेलवे कंपन्यांत एतद्देशीय लोकांचे फारच थोडे भाग आहेत. सन १८७२ सालीं हिंदुस्थानांतील सर्व रेलवे कंपन्याचे एकंदर ६१,९४० भागीदार आहेत, यांजपैकीं ३८८ मात्र एतद्देशीय आहेत.

काबूलची फौज—काबूलच्या आसपासच्या प्रदेशांतील लोकांची पायदळ पलटणींत भरती पुनः करूं लागले व सर्व नव्या व जुन्या मिळून चौसष्ट पलटणी तयार करून मुलखाच्या जरूरीप्रमाणें तुर्कस्थान, कंदाहार, हिरात व काबूल येथें ठेवाव्या असा ठराव झाल्याचें बां. ग्या. वरून कळतें.

योग्य साह्य—बंगालच्या दुष्काळाच्या अडचणीच्या दूरीकरणार्थ ईस्टइंडिया रेलवेकंपनीनें आपल्या रेलवेच्या रस्त्यावर हावऱ्यापासून बनारसपर्यंत व त्याच्या वरच्या व खालच्या बाजूस निर्वाहाचे धान्य, अटा वगैरे पदार्थांचा दर प्रत्येक मणास दर मैली पैचा एक अष्टमांश भाडें घेण्याचा ठराव केला.

मद्रासेतील तुफानाचा परिणाम—गतवर्षीं मे महिन्यांत तुफान झालें त्या वेळेस अतिशय उष्ण हवा होती ती बदलून एकाएकीं अतिशय थंड झाली. त्याच्या योगानें चोवीस तासांत सुमारें पन्नास हजार जनावरें थंडीनें मेलीं. त्यांस निवाऱ्यांत नेऊन बांधण्यास अवकाशच झाला नाहीं. काय हा अनर्थ. इं. प्र.

---

### चमत्कारिक श्लोक.

किंतृष्णाकारिकीदृग्रथचरणमरं रौतिकः काब्धिकांची

कोपस्मारी भुजंगे किमुकलहशमश्चार्यसंबोधनं किं॥

का सुंदर्यामपींदुः कथमचलभृतः का च संबुद्धिरग्नेर्

बींजं किं कावनीजारगणमतिहरा हेमसारंगलीला ॥ १ ॥

या श्लोकामध्यें निरनिराळे तेरा प्रश्न असून त्या सर्वांचीं उत्तरें " हेमसारंगलीला " या शेवटच्या अक्षरांमध्यें अनुक्रमानें दिलीं आहेत तीं अशीं—प्रथमतः सरळ रीतीनें १ हेम ( सुवर्ण ), २ सारं ( आरांसहित ), ३ गली ( मयूर ), ४ इला ( पृथ्वी ), असे शब्द घेतले. नंतर उलट रीतीनें, ५ लाली ( लाळेने युक्त ), ६ गरं [ विष ], ७ साम [ सलोट ], हे [ अहो ], असे घेतले. नंतर पहिले एक अक्षर आणि शेवटचें एक अक्षर याप्रमाणे ९ हेला ( शृंगारचेष्टाविशेष), १० मली ( कलंकयुक्त ), ११ साग ( वृक्षयुक्त ), १२ रं ( र हें आक्षर ), आणि शेवटीं १३ हेमसारंगलीला ( सुवर्णमृगाची क्रीडा ) असा सगळा शब्द घेतला. पहा—

१. किं तृष्णाकारि? ( इच्छा उत्पन्न करणारें काय? ) उत्तर हेम.

२. कीदृक् रथचरणं? ( रथचक्र कसें असत? ) उ० आरांसहित.

३. अरं रौति कः ? ( मोठ्यानें कोण ओरडतो? ) उ० मयूर.

४. का अब्धिकांची? ( समुद्राचा पट्टा आहे अशी कोण? ) उ० इला

५. कः अपस्मारी? ( फेंपरेवाला कोण ता? उ० लाली.

६. भूजंगे किमु? ( सर्पांमध्यें काय? ) उ० गरं.

७. कलहशमः च? ( कलहाची शांति काय? ) उ० साम.

८. आर्यसंबोधनं किं? ( श्रेष्ठांचें संबोधन काय? उ० हे.

९. का सुंदर्यां? ( सुंदरीच्या अंगीं काय? ) उ० हेला.

१०. अपि इंदुः कथं? [ चंद्र कसा? ] उ० मली.

११. अचलभृतः का च संबुद्धिः? [ पर्वताचें संबोधन काय? उ० साग.

१२. अग्नेः बीजं किं? [ अग्नीचें अक्षर कोणतें? ] उ० रं.

१३. का अवनीजारगणमतिहरा? [ पृथ्वीकन्या सीता, तिच्या पतीचें बुद्धिहरण करणारें काय? ] उ० हेमसारंगलीला.

वि. वि.

---

## वऱ्हाडचें वर्णन.

### साधारण माहिती.

(मागील अंकावरून पुढें चालू)

**बुलढाणें.** हा जिल्हा पश्चिम वऱ्हाडचा नैर्ऋत्य भाग आहे. याच्या उत्तरेस पूर्णा नदी; पूर्वेस अकोला व वाशीम जिल्हा; दक्षिणेस निजामसरकारचें राज्य; आणि पश्चिमेस त्याच सरकारचा मुलूख व खानदेशचा कांहीं भाग आहे. या जिल्ह्यांत तीन तालुके आहेत त्यांतील दक्षिणभागचे दोन तालुके वऱ्हाड बालाघाट पैकीं आहेत, व एक तालुका खालीं पयोष्णीच्या खोऱ्यांत आहे. जालना व हिंगोली या नावाच्या दोन लष्करी छावण्या आहेत त्या या जिल्ह्याच्या हद्दीपलीकडे १९ मैलांच्या अंतरावर आहेत. यांपैकीं जालना पश्चिमेस व हिंगोली दक्षिणेस आहे. या जिल्ह्यांचें क्षेत्रफळ ६८०८ चौरस मैल आहे व यांत लोकसंख्या ४०००६५ आहे. यां जिल्ह्याच्या पूर्वभागची जमीन चांगली आहे व तींत गहूं उत्तम पिकतो.

**वाशिम.** या जिल्ह्याच्या उत्तरेस अकोला आणि अमरावती जिल्ह्याचा कांहीं भाग आहे; दक्षिणेस पेणगंगानदी व निजामसरकारचा मुलूख; पश्चिमेस बुलढाणें जिल्हा; आणि पूर्वेस वणी जिल्हा आहे. या जिल्ह्याचें क्षेत्रफळ सुमारें २४५१ चौरस मैल आहे. अकोला, अमरावती, आणि इलिचपुर हे जसे वऱ्हाडचे तळभाग आहेत तसे वाशीम, बुलढाणे आणि वणी हे उंचवट्याचे भाग आहेत. या जिल्ह्यांत दोनच तालुके आहेत. वाशीम आणि पुसद. वाशीम तालुक्याची जमाबंदी २०.. ६९७ रुपये आहे, त्यांपैकीं १३७१८ रुपयांची जहागिरी जमीन आहे. पुसद तालुका लहान लहान टेकड्याचा आहे. त्यांत पुरवठ्या जोगें कांहीं पिकत नाहीं, गवत देखील त्यांत विपुल होत नाहीं. या तालुक्याचें जमीनबाब उत्पन्न ११४९०८ रुपये आहे त्यांत ११३१३ रुपयांची जहागिर आहे. टेकड्याच्या खालील तळजमीन पिकाला फार उत्तम आहे, पण तिजपैकीं थोडीच लोकांचे वहिवाटींत आलेली आहे. वाशीम तालुका समुद्राचे पृष्ठभागापासून ११०० फूट उंच आहे व पुसद ११५० फूट उंच आहे.

**वणी.** हा जिल्हा वऱ्हाडचा आग्नेय भाग आहे. याच्या उत्तरेस अमरावती जिल्हा, पूर्वेस वर्धा आणि चंद्रपूर हे जिल्हे, दक्षिणेस निजाम सरकारचा मुलुख, आणि पश्चिमेस वाशिम व अमरावती जिल्ह्याचा भाग आहे. याचें क्षेत्रफळ सुमार३९५७ चौरस मैल आहे व याची पूर्व पश्चिम लांबी ११४ मैल आहे.

---

हे पत्र अकोला एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा. प.

Registered No 4—1872.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ७ अकोला, रविवार ता० २३ नोवेंबर सन १८७३ इ० अंक ४७


## जाहिरात.

### वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | रु. |
|---|---|
| [..]चे अगाऊ | ५ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डांकहाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| अखेर | २ |

### नोटिशीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| " दुसरे खेपेस | ०२ |


## पिंपळनेर येथील बालबोधिनी सभेंत वाचलेला निबंध.

बालबोधिनी सभा नियमाप्रमाणें रविवारीं भरावयाची परंतु कांहीं कारणानें ती काल रोजीं ह्मणजे तारीख ११ नोवेंबर सन १८७३ इसवी रोज मंगळवारीं रात्रीं ८ वाजतां येथील विद्यालयांत भरली होती. या सभेंत एक दोघांनीं निबंध स्वदेशीय नोकरी आणि व्यापार या संबंधानें वाचिले त्यांपैकीं कृष्णाजी तात्या मोंडनी पैठणकर यानीं बालबोधिनीस योग्य असा निबंध वाचिला तो आमच्या प्रिय श्रोत्याकरितां सर्वांस सादर करितों.

### स्वदेशीय नोकरी आणि व्यापार यांची तुलना.

सुजनहो पूर्वी युरोप आणि आफ्रिका या दोन खंडांत गुलामाचा व्यापार करण्याची चाल बहुत दिवसपर्यंत होती परंतु अलीकडे इंग्लिशांस हिंदुस्थानचें राज्य मिळाल्यापासून ही गुलामांच्या विक्रयाची चाल इंग्लिशानीं बंद केली. आपल्यास आले त्यांत कमी मोलानें दास मिळूं लागल्यावर ते गुलामाचा व्यापार कां बंद करणार नाहींत? अहो, विचार करा, विचार करा कीं, आपल्या देशांतील व्यापार बुडाला, जो तो नोकरी पहातो, दर वर्षांस मोठ मोठ्या डिगऱ्या मिळविणारे लोक शेंकडों परीक्षेंत पसार होतात, तेव्हा तितक्यांस सरकार तरी कोठें नोकऱ्या देईल बरें? यामुळें दिवसें दिवस नोकऱ्या मिळतनाशा होऊन केलेल्या श्रमाचे फळ त्यांस मिळत नाहीं. मिळून त्यांचाही वेळ सरकारीकामांत व साहेब लोकांची हानी हांजी करण्यांतच जातो. आतां नोकरी खासगी संबंधाची असो किंवा सरकारी संबंधाची असो. नोकरांस एकच मासला. "शेवकाशी आज्ञा स्वामीची प्रमाण" या तुकारामाच्या वाक्याप्रमाणें दास बनून रहावे लागते. असें असतां आतांशीं आमच्या देशबांधवांस नोकऱ्यांचा फार आवड दिसते. सरकार जे जे ठराव करितें ते ते कबूल करून गोऱ्या कातड्यांचे आर्जव करण्याचे त्यांस कसें आवडतें न कळे. अहो लक्ष्य द्या कीं, नोकरी करून धन्याच्या कामास जरा का यत्किंचित् बाध आला कीं, जी याणें पूर्वी इमानानें नोकरी केली असते तीही मातींत मिळून जाते. यावमाणें नोकरीचें मान असून दिवसें दिवस लोकांचा भर नोकरी करण्याकडे असतो; हें आश्चर्य नव्हे काय? रात्रंदिवस मेहनत करून आणि पूर्वजांनीं जो आपल्याकरितां द्रव्याचा संचय करून ठेविला असेल त्याचा व्यय सरकारी शाळांत फी भरून पुढें त्याचें दास्यत्व करण्याकडे काय? नाहीं, तर जेणेंकरून आपणांस सुख होईल अशा कृत्यांत त्याचा व्यय करावा. नोकरीच्या उद्योगांत पैसा खर्च करून सुख होईल हें आमच्यानें कधींही ह्मणवणार नाहीं. तर जो काय थोडा बहुत पैसा आहे तो व्यापाराच्या भांडवलांत घातला असतां घातलेला पैसा कायम राहून उद्योगांगतीं घातलेल्या भांडवलापेक्षां दुप्पट तिप्पट होण्याचा संभव आहे. असें असतां लोकांचा कल नोकरी करण्याकडे असतो याचें मूळबीज काय असेल तें असो.

आतां इतकें खरें आहे कीं, ज्याप्रमाणें हल्लींच्या मानानें सरकारी नोकरांस मान आहे तसा इतर मोठमोठ्या व्यापाऱ्यांस नाहीं. कारण जिकडे तिकडे सरकारी नोकर झाल्याने आणि त्यांस मोठमोठ्या जागा मिळाल्यानें त्यांची हल्लींच्या मानानें मानमान्यता होत आहे. परंतु खऱ्या पक्षानें आणि पूर्ण विवेक केल्यानें इतकें मात्र सिद्ध होत कीं, नोकरी करण्याच्या धंद्यापेक्षां व्यापार करणें हें चांगलें. देशबांधवहो, विच्यार करा कीं, आपण सरकारची नोकरी कितीही इमानानें केली तरी ह्या राजाच्या कारकीर्दींत खऱ्याचें खोटें आणि खोट्याचें खरें होण्यास कांहींच वेळ लागत नाहीं. याबद्दलचें विनायक दिवाकराचें उदाहरण प्रत्यक्ष तुमच्या दृष्टीस पडलें असतां तुमचें मन कसें डळमळत नाहीं हें न कळे. आतां विनायकरावास रखमा मोठ मोठ्या हुद्याच्या नोकराची ही दशा; तर मग त्यांहून कमी योग्यतेच्या नोकरांची काय कथा? विनायरावांचा अपराध आम्हांस खरा खोटा कळला नाहीं तरी इतकाच अपराध एखाद्या आमच्या इंग्लंदवासी गोऱ्यानें केला असता तर त्यास फार तर एका ठिकाणाहून दुसरे ठिकाणीं बढतीवर नेमिलें असतें. यावरून धडधडीत नोकरीचें वजन व त्यांचा पक्षपातीपणा नजरेस येतो. असें असतां आपले देशबांधव अजून गुलामगिरी करण्याचें पत्करितात तेव्हां हें नवल नव्हे काय? फार तर काय? परंतु बंधू वगैरे आप्तवर्गांच्या भेटीची इच्छा झाल्यास ती इच्छा हल्लींच्या मानाप्रमाणें सरकारावर अवलंबून रहाते. तीच युरोपियन कामगारांस नाहीं. दरसाल दरशेकडा २० रुपयेप्रमाणें कापून त्यांस एकेक दोन दोन वर्षांची खुशालपणें स्वदेशीं जाण्यास रजा मिळते. हा ठराव त्यांच्याच करितां आहे. कारण युरोपियन कामगार बहुतकरून ४००।५०० च्या खालीं आढळत नाहींत. आणि गरीब बिचाऱ्या १०—१२ रुपयांच्या नोकरांस अशा प्रकारची रजा घेण्यास आपल्या मरपगारावर बदली ठेऊन जावें लागतें. तेव्हां ही गुलामगिरी नव्हे काय?

वर सांगितलेली नोकरांची स्थिती उघड जरी लोकांच्या दृष्टीस पडते तरी मूळ व्यापार करणारेही आपला रोजगार सोडून इंग्लिशांचें दास्यत्व करण्यास पाहीं सरत नाहींत यामुळें आपल्या देशांतील व्यापार बुडून जाऊन आपल्या देशांतील लोक परतंत्र होऊन देशही निर्धन झाला ह्मणून कित्येक देशहितेच्छु लोक नोकऱ्यांची आशा सोडून स्वदेशीय मालाचा व्यापार करूं लागले व त्याप्रमाणें २१४ ठिकाणीं स्वदेशाच्या मालाचीं दुकानें स्थापित झालीं हें हिंदुस्थानचें नशीब उघडण्याचें चिन्ह दिसलें. असें झाल्यानें आपल्या देशांतील जे जुने कारागीर रोजगार नसल्यामुळें आज अन्नावाचून उपाशी मरतात त्यांस रोजगार मिळून आपलें व आपल्या देशाचें हित होईल. यावरून आपल्या लोकांस देशीय व्यापार बराच आवडतो असें वाटल्यास हरकत नाहीं परंतु कित्येक असंख्य लोक नोकरीचीच आशा करितात. तारीख ६ नोवेंबर सन १८७३ च्या ज्ञानप्रकाशांत ठाणें येथील अरुणोदय पत्रावरून उतारा घेतला आहे त्यांत असें लिहिलें आहे कीं, ठाणें येथील इंग्लिश शाळेवरील एक शिपायी पगार रुपये ७ चा एक महिन्याच्या रजेवर जाणार तेव्हां ती तूर्त असलेली ७ रुपयांची जागा मिळावी ह्मणून येथें २०।२५ लोक खटपट करीत असून त्यांत कांहीं पांढरपेशे ह्मणजे लिहितां येणारे ब्राह्मण परभुही आहेत व ती ७ रुपयांची जागा आपणास मिळावी ह्मणून वशिले जगवीत आहेत.

देशहितेच्छु जनहो, पहा लोकांचा भर नोकरी करण्याकडे कसा आहे तो? वशिल्याच्या कामांत जो थोडाबहुत पैसा खर्च होणार तोच आरंभीं लहानसा व्यापार करण्याकडे खर्चल्यातर चालणार नाहीं काय? आतां व्यापार सर्वांनीच करावा असें आमचें ह्मणणें नाहीं. व्यापार करण्यास मूळ म्हटलें ह्मणजे भांडवल पाहिजे तें सर्वांनीं कोठून आणावें? परंतु त्यांस इतकेंच कीं, व्यापार करणाऱ्या मंडळीनां ही नोकरांची जरूर पडणार आहे मग १०।१२ रुपये घेऊन परदेशस्थांचे जे दास होऊन रहावें त्या पेक्षां स्वदेशांतच स्वदेशीय लोकांची चाकरी करणें हें चांगलें. युरोपियन लोक जसें त्यांचेच राज्य आहे म्हणून मजा मारतात त्याप्रमाणें आपण आपल्या स्वदेशीय लोकाजवळ नोकर राहिल्यास देशाचें हित होऊन आपल्यास कांहीं मजा मारावयास सांपणार नाहीं काय.

असो आतां विस्तार बराच झाला करितां पुन्हा आपणास नोकरी करण्या पेक्षां व्यापार चांगला. इतकें सांगून विषय संपवितों. तारीख २० माहे नोवेंबर सन १८७३ इ.

कृष्णाजी तात्या मोंडनी.
पैठणकर.

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस—

वि. वि. हल्लीं वऱ्हाडामध्यें विद्वज्जन आणि अविद्वज्जन लोक बरेच ग्रंथ करूं लागले आहेत. यांचें कारण एक तर असें असावें कीं मेहेरबान रेसिडेंट साहेब बहादूर यांणीं जो कोणी मनुष्य ग्रंथ करील त्यास त्याच्या योग्यतेप्रमाणें बक्षिस देण्याचा क्रम सुरू केला आहे. जे चांगले विद्वानलोक आहेत त्याच्या ग्रंथामध्यें कोणत्याही गोष्टीची उणीव नसावयाचीच. अविद्वज्जनांच्या ग्रंथामध्यें चूक अगर कमीपणा एखाद्या विषयामध्यें असल्यास मोठें नवल नाहीं. त्यापैकीं एक उदाहरण खालीं लिहितो.—

रावसाहेब चिमणजी राजाराम फाटक डेपुटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर उमरावती यांनीं वऱ्हाडचा एक भूगोल केला आहे. ते पुस्तकाच्या प्रस्तावनेंत सांगतात कीं, ग्रंथ तयार करतेवेळीं वऱ्हाड ग्याझिटिअर बुकाची मदत घेतली आहे. आतां त्या बुकाची आणि हल्लीं नवीन तयार केलेल्या भूगोलाची तुलना करूं लागलों तर त्यांमध्यें इतकें अंतर आहे कीं, जितकें पृथ्वी आणि आकाश यांच्या मध्यें आहे तितकें म्हटलें तरी चालेल.

हा ग्रंथ कांहीं अशीं मोठा पाहिजे होता, कारण वऱ्हाडाविषयीं थोडी माहिती मराठी तिसऱ्या बुकांत दिलीच आहे.

व्याख्या.

या व्याख्या पैकीं १, २ ह्या त्यांनींच स्वतः रचल्या आहेत, किंवा दुसऱ्या भूगोलांतून घेतल्या आहेत? दुसऱ्या भूगोलांतून घेतल्या असल्यास त्या भूगोलाचीं नांवें का दर्शविलीं नाहींत? २१ व्या व्याख्येमध्यें ४ दिशांचीं नावें दिलीं आहेत, तीं बरोबर रीतीनें लिहिलीं नाहींत. कारण उत्तर दिशेपुढें, दक्षिण, व पूर्वेपुढें पश्चिम पाहिजेत त्या तशा न लिहितां फक्त नांवें दिलीं आहेत. याजवरून ग्रंथामध्यें नीट व्यवस्था दिसत नाहीं.

उत्पन्न.

या सदरा खालील वणी जिल्ह्यांत कोळशाच्या खाणी आहेत असें मोघम लिहिलें आहे. स्पष्ट गावाचें नांव नाहीं लिहिलें. व कोळसे कोठपर्यंत सांपडण्याचा संभव आहे हेंही लिहिलें नाहीं. वणी एथें जहाजमें उत्तम प्रकारचीं होतात हेंही लिहिण्यास योग्य आहे राळेगाव पर्यंत कोळसे सांपडण्याचा संभव आहे.

धर्म—याजमध्यें दोन धर्म एक हिंदू आणि मुसलमानी असे लिहिले आहेत. इलिचपुर जिल्ह्यांत कुर्मी वगैरे लोक आहेत त्यांनविषयीं आणि कोलामलोक याजविषयीं बिलकूल लेख दिला नाहीं. ते आपणास हिंदू ह्मणवितात परंतु त्यांचें आचरण अगादि वेगळें आहे. याजविषयीं माहिती या ठिकाणीं जरूर पाहिजे होती. पान १७ मध्यें वडनेर आणि उमरावती याजमध्यें अंतर पाच मैल लिहिलें असून पान २९ मध्यें ६ मैल अंतर असें लिहिलें आहे. चांदूरतालुक्यांतील नांदगाव काजी येथें हेमाडपंती देवालय खंडेश्वराचें आहे. तें येथें लिहिलें नाहीं. नेर परसोपंत येथें रंग चांगला होतो असें मोघम लिहिलें यावरून वाचकांच्या सहज लक्षांत येईल कीं, रंग कोणत्या प्रकारचा व त्याचा उपयोग पागोटीं रंगविण्याचे कामास पडतो किंवा इतर कपडे रंगविण्याच्या कामास पडतो. नुसता रंग होतो ह्मटलें ह्मणजे काय समजावें? कित्येक ठिकाणीं मुख्य शहरें मागाहून घातलीं व कित्येक ठिकाणीं आरंभीं घातलीं. तशाच नद्या प्रथम घातल्या, कित्येक ठिकाणीं नंतर घातल्या; सबब नूतन शिकणारांस किंचित् गैरसोयीकर दिसतें. या प्रतमध्यें ज्या गोष्टीची कमताई आहे त्या सर्व दुसऱ्या वेळीं दुरुस्त होतील तर फार उत्तम होईल. चिमणाजीपंत यांणीं आपल्या नावानें एक चांगलें पुस्तक तरी तयार करावयाचें होतें. अशा पुस्तकापासून मेटेसें त्यांस भूषण मिळेल असें वाटत नाहीं. जर कदाचित् वऱ्हाडचा इतिहास लिहितील तर चांगलें बक्षिसही मिळेल आणि विद्वान लोकांमध्यें प्रशंसाही चांगली होईल यांत संशय नाहीं. या पत्रास आश्रय दिल्यास वेळोवेळीं आपणाकडेस पत्रें पाठविलीं जातील कळावे तारिख २३ माहे आक्टोबर सन १८७३ इसवी.

एक "क्ष"

## निनावी अर्ज.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि. वि. महाराज आपल्या इंग्लिश सरकारचे राज्यांत कामदार लोकांविरुद्ध निनावी ह्मणजे बिन सहीचे अर्ज करण्याविषयींची लोकांची प्रवृत्ती पहाण्यांत येते ती वाईट आहे असें माझें मत आहे. सरकारी कामदार वाईट रीतीनें कामें करितात, पक्षपात करितात, लाच खातात, किंवा इतर प्रकारचीं गैर कामें करितात तर त्यांविषयीं साकसुरत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सहीनिशी अर्ज करावे, वर्तमान पत्रांतून नावानें राजरोस मजकूर प्रसिद्ध करावे. साक्षिदार व इतर प्रत्यक्ष पुरावे यांसहीत त्या कामदारांच्या वरिष्ठाकडे जाऊन हजर व्हावे या रीतीच्या व कायदेशीर गोष्टी आहेत. तसें न करितां दुष्टबुद्धीनें निनावी अर्जांच्या आडून गोळ्या माराव्या, एक गोष्ट असली तर खोट्या नाट्या दहा लिहाव्या, गोष्टीचें स्वरूप फुगवून लिहावें इत्यादि प्रकार पाहिले ह्मणजे निनावी अर्जांचा विचार करू नये व त्याबद्दल कांहीं चवकशी करू नये असा जो सरकाचार ठराव आहे तो फार योग्य आहे व तेणेंकरून कुत्सित लोकांची लोट माडावयास व अधिकाऱ्याचा बचाव होण्यास चांगलें साधन आहे असें मला वाटतें. यावर आपला अभिप्राय मिळावा अशी इच्छा आहे. कळावे हे विनंति तारिख २१ नोवेंबर १८७३.

एक पत्रवाचणारा.

## नोटिस.

नोटिस—सभू वल्लद गोटीराम दुकान खामगाव यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुह्मी खातेबाकीचे रुपयांबद्दल आह्मास नोटिस दिली तर तुमचे दुकानीं आमचे देणें व घेणें मुळींच नसून त्याची माहितीही आह्मास बिलकुल नाहीं. आमचे तर्थिरूपास मरून पांच वर्षें झालीं तेव्हांपासून आह्मी तुमचे दुकानावर आलो नसून मुळींच देणें व घेणें झालें नाहीं व आमच्याशीं आजपर्यंत खातेबाकी रुजू झाली नसून पाहिलीही नाहीं. तुह्मी जी नोटिस आह्मावर दिली तिचा जबाबदारी आह्मावर नसून खर्चही देवाल नाहीं. आह्मी दिलेल्या नोटिशीचा खर्च भरून घेऊ. कळावे तारिख २१ माहे नोवेंबर सन १८७३ इसवी.

(सही) गिरधारीलाल कन्हयालाल दस्तुर खुद.

नोटिस—रावजी वल्लद इंद्राजी पाटील राहणार लोणी तालुके मेहेकर जिल्हा बुलढाणें यांस परशराम वल्लद जानजी पाटील राहणार मुंदीफळ तालुके मेहकर याजकडून नोटिस देण्यांत येते कीं आमची मुलगी नामे येली उमर वर्षें २॥ ची तुह्मी आमच्या कुटुंबाबरोबर घेऊन गेला आहा त्याला तीन महिने झाले अजुन परत पाठवित नाहीं. आह्मी मौजे उटी तालुके मेहेकर येथील परशराम पाटील धोटे याचे मुलाला आपली मुलगी दिली आहे. ह्मणजे मुलीला व मुलाला कुंकूं लाविलें व मुलाचा टिळा केला त्यास उभयताकडून पुष्कळ खर्च झाला आहे. व या महिन्यांत आह्मी लग्नाची सर्व तयारी करून मुलीला आणावयास तुमचे गावीं पाठविलें असतां तुह्मी मुलीची रवानगी करीत नाहीं, त्यावरून मोठी गैरसोय झाली आहे. व त्याकरितां ही नोटिस तुह्मांस देण्यांत येत आहे कीं नोटिस पोहचल्यापासून ८ दिवसांत आमची मुलगी आमचे घरीं आणून पोचती करावी. तसे न कराल व आमचे लग्नाचा बिघाड होईल तर सोयरे माणसांत आमची अब्रु जाईल तिचा जबाब तुह्मापासून घेतला जाईल. तुह्मी मुलीला दुसरें कोठें स्थळ पाहून देऊ असें कळविलें पण तें आह्मांस कबूल नाहीं. आमचे मुलीवर तुमची सत्ता नाहीं. आमचे मनास आली त्याप्रमाणें आह्मी तिचे लग्नाची तजवीज केली आहे ती बिघडण्यास तुह्माला दरकार नाहीं हे खूप समजावें. इतक्याउपर तुह्मी न ऐकाल व आमचे ठरलेले लग्नाचा बिघाड कराल तर तुह्मावर आमची मुलगी अटकावून ठेवण्याबद्दल फौजदारीत व झालेला खर्च भरून घेण्याबद्दल दिवाणींत फिर्याद केली जाईल कळावे तारीख २२ माहे नोवेंबर सन १८७३ इसवी.

ताजाकलम—आमचे बायकोचे बतानें तुह्मी दुसरे कोठें आमचे मुलीस द्याल तर तिला हक्क नाहीं. व आह्मी तिला देऊ देणार नाहीं. व दुसरे सर्व लोकांना कळावें कीं कोणी आमची मुलगी आमचे कबुलाती शिवाय बायकोच्या किंवा सासऱ्याच्या संमतानें करितील तर ते पेचांत येतील. आणि ती सोयरीक मोडून टाकली जाईल व त्यावर कायदेशीर तजवीज करू. कळावें तारिख मजकूर

(सही) परशराम वल्लद जानजी राहणार मुंदीफळ.

## वऱ्हाडसमाचार

मिति मार्गशीर्ष शुद्ध ४ शके १७९५

## आग्रा एथील व्यर्थ खटाटोप.

बंगाल इलाख्यांत सालमजकुरीं दुष्काळ पडण्याचीं चिन्हें दिसल्यावरून सरकारचे त्याकडे अगाऊ लक्ष्य पोचलें. व उडिसा प्रांतासारखा भयंकर प्रसंग न येण्याकरितां सरकारानें योग्य तजविजी चालविल्या हे पाहून आह्मांस संतोष वाटला. त्याचप्रमाणें आग्रा येथें या आठवड्यात गवरनर जनरल साहेब मोठा दरबार भरविणार होते तो भरविल्यानें तेथें मनुष्य अतिशय जमेल व त्यास खाण्यापिण्याचें सामान पुरविण्यास फार खटाटोप पडून देशांत धामधूम होईल व तेणेंकरून महागाई होऊन दुष्काळास मदत झाल्यासारखें होईल सबब दरबार भरवूं नये अशी लेफटेनंट गवरनर साहेब यांनीं गवरनर जनरल साहेबास सूचना केली होती व तीविषयीं विचार होऊन दरबार भरूं नये व राजे लोकांच्या खाजगी दाखल भेटी घ्याव्या असें ठरलें. व त्याप्रमाणें या आठवड्यांत तजवीज झाली. आग्र्यास गवरनर जनरल साहेबास भेटण्याकरितां जे राजे जमले आहेत त्यांतील कांहींकांचीं नावें आह्मास समजलीं आहेत तीं येणेंप्रमाणें—किसनगडचे राजे, रेवाचे राजे, दतियाचे राजे, काशीचे राजे, भरतपुरचे राजे, धोलपूरचे राजे, चिकारीचे राजे, संपथरचे राजे, आणि कोठीचे राजे, इत्यादि आग्र्यास गेले आहेत. मुंबईचे गवरनर साहेब गेले आहेत, सरजमशेटजी जीजीभाई बारोनेटवाले गेले आहेत, हिंदुस्थान सरकारच्या कायदे कौंसलाचे सर्व मेंबर गेले आहेत, व इतरही साहेब लोक पुष्कळ गेले असतील.

सदरीं लिहिल्याप्रमाणें ९—१० राजे व वडे बडे साहिब लोक एक जागीं जमले तेव्हां त्यांच्या लवाजम्याची संख्या किती झाली असेल त्याचें आमचे वाचणारांनीं अनुमान करावें. हैदराबादेहून रेसिडेंट साहेब वऱ्हाडांत आले होते तर त्यांच्या सामानाला सुमार ६० गाड्या लागत होत्या; ही साहेब लोकांची व्यवस्था! मग आमचे नेटिव राजे लोकां विषयीं तर पुसावयासच नको. ते मोठ्या नजुक कामाला केवळ सडे गेले तर पाच पन्नास लोकां शिवाय जात नाहींत, मग हें तर गवरनर जनरल साहेबांचे भेटीस जावयाचें, तेव्हां ते भरपूर इतमामानें गेले असतीलच याविषयीं संशय नको. आणि खरेंच तसें झालें असेल तर आग्रा शहराला आणि त्याच्या सभोवारच्या टापूला मोठा त्रास झाला असेल व फक्त यां आठ ध्यार दिवसांकरितांच शेकडो खंडी अन्न सामग्रीचा सफा उडाला असेल व मोठाल्यां मेजवान्या आणि चिराकदान वगैरेस पाण्या सारखा पैसा उडाला असेल ही गोष्ट मोठी वाईट व दुष्काळास मदत होण्याजोगी झाली याबद्दल आह्माला दुःख वाटतें.

नामदार गवरनर जनरल साहेबांनीं प्रसिद्ध दरबार भरविण्याचा बेत दुष्काळाचे कारणामुळें जर रहित केला होता तर राजेलोक एके जागीं जमण्याला तरी अनुमोदन कां दिलें? व सर्व राजेलोक इतमामानिशीं जमले व आठ च्यार दिवस राहिले आणि मग प्रसिद्ध दरबार न करितां खाजगी रीतीनें त्यांच्या भेटी घेतल्या यांत अर्थ काय! फक्त दरबार शब्द उच्चारावयाचा नाहीं एवढेंच झालें असें आम्हाला वाटतें व ही मुत्सदगिरी किंवा चुकी कोणाची आहे व कशाकरितां मुद्दाम अगर असमंजसपणानें झाली आहे तें कळें पर्यंत आम्हास कांहीं बोलतां येत नाहीं, पण मोठ्या गादीच्या ठिकाणीं हन असें व्हावयाचें नव्हतें असें आह्मांस वाटतें.

## रेलवेकडिल नोकरांचें उतारूशी वर्तन.

थोडे दिवसांपूर्वीं गवरनर जनरल साहेब बहादूर यांणीं रेलवेवरून तिसरे क्लासांतून जाणारे लोकांच्या सोयीविषयीं एक ठराव प्रसिद्ध केला. पण त्या ठरावाप्रमाणें अमलबजावणी कितपत झाली हें अद्याप समजण्यांत आलें नाहीं. ठरावांत सर्व प्रकारच्या अडचणी दूर कराव्या अशा विषयीं सक्त हुकूम होता असें नाहीं परंतु रेलवे कंपनीच्या नोकर लोकांनीं उतारू लोकांशीं सभ्यपणानें वागावें, विनाकारण दुरुत्तर व दांडगाई करूं नये, व प्रत्येक स्टेशनावर सवडीप्रमाणें त्यांस उतरूं द्यावें या विषयीं स्पष्ट खुलासा होता. एकंदरींत पाहिलें असतां स्टेशनावरील लोक फार दांडगट व बेअदबी असतात या विषयीं सर्वत्र डंका आहे. आतां सर्वत्र असेच असतात असें आमचें ह्मणणें नाहीं पण चांगल्या पेक्षां वाईट फार आढळतात. उतारूलोकास मुख्यत्वें करून स्टेशनावर तीन लोकांशीं गाठ असते, एक टिकीट देणारा, दुसरा दरवाज्यावरील पोलिसचा शिपाई, तिसरा गाडीवरील गार्ड. या लोकांस गवरनर जनरल साहेबांच्या ठरावाची चांगली माहिती असल्यास उतारू लोकांस खरोखर सुख होणार आहे. आमचे पहाण्यांत स्टेशनावरील लोकांचे चमत्कारिक वर्तन आलें आहे. टिकिटें मास्तर बहुधा आपली चलाखी द

त्याविण्याकरितां टिकिटें देण्या[illegible] आरंभ करितात, मग त्या गर्दीत खुर्दी व्हावयाचा नाहीं. बंधे रुपये पाहिजेत बंधे घेऊन गेल्यास बाकीचे पैसे जवळ नाहींत खुर्दा घेऊन या, वगैरे नाना प्रकारचीं त्रासदायक रुपडीं चालतात. कांहीं तक्रार केल्यास शिव्यांची सुरवात होते. आणि जवळ उगा असलेला पोलिसचा शिपायी लागलीच चमकावितो. स्टेशनावरील पोलिसाचे शिपायांप्रमाणें निर्भीड, उर्मठ आणि दांडगे लोक कोठेंही आढळणार नाहींत. ते तिसऱ्या क्लासाचे उतारू लोकांस गुरांप्रमाणें समजून तदनुरूप वर्तणूक ठेवितात. त्यांस बसावयाच्या खोलीचीं दारें बंद करून कैद्यांप्रमाणें वागवितात. कोणी भेटावयास किंवा गाडीपर्यंत पोहचविण्यास आला तर [illegible] सार [illegible] त्यां [illegible] गोष्ट लिहिणें आहे—येथील रेलवे प्लाटफार्मावर आपल्या आपल्या स्नेह्यास किंवा सोयऱ्यास भेटण्याकरितां मोठा पगारदार व अब्रूदार हिंदू किंवा मुसलमान गेला तर त्यास तेथून स्टेशनमास्तराच्या हुकुमानें काढून देतात. पण एखादा पोर्टुगीझ बटलरही असून गेला तर त्याची साहेबांत गणना होऊन कोणत्याही प्रकारची हरकत होत नाहीं. या पक्षपाताचें काय कारण असेल तें रेलवेकडील योग्य अधिकारी लोकांस कळवितील तर बरें होईल. सर्व लोकांस सारखी मोकळीक मिळावी ह्मणून प्लाटफार्मे टिकिटें शुरू करावीं. व तीं घेतल्यावाचून उतारू लोकांशिवाय कोणी प्लाटफार्मावर जाऊं नये अशाबद्दल रेलवेचे अधिकाऱ्यांनीं हुकूम फर्मावावा अशी आम्ही त्यांस शिफारस करितो. व असल्या प्रकारची अव्यवस्था वऱ्हाडांतील रेलवे स्टेशनावर खरोखर किती आहे याची चौकशी वऱ्हाडचे मुख्य अधिकारी रेसिडेंट साहेब बहादूर यांणीं करून बंदोबस्त करावा असें आम्ही त्यांस सुचवितों.

हें उतारूंच्या संबंधानें झालें, दुसरें मालाच्या संबंधानें गुड्स क्लार्क वगैरे लोकांकडून जे घोटाळे होत असल्याचे कानावर येतात ते लिहावयाचें राहिलेंच आहे. त्याबद्दल पुढें लिहूं.

## वऱ्हाड

मेजर बेल साहिब कमिशनर यांची स्वारी शुक्रवारचे कचेरीला येथें आली. क[illegible] बुथबी साहिब डिपुटी कमिशनर बा[illegible] गेले होते तेही त्याच दिवशीं आले—[illegible]० बुलक साहिब व मि० डनलाप सा[illegible] असिस्टंट कमिशनर तालुक्यांत फिरा[illegible]स गेले आहेत.

मि० नौलिस साहिब यांनीं आणखी रजा वाढविली याकरितां त्यांचे स्मालकाज कोर्टाचें काम पहाण्यास मि० दस्तुर बहिमनजी साहिब यांस नेमिलें व त्यांनीं त्या नव्या कोर्टाचें काम सुरू केलें.

—०००—

मेहेकरचे तहशिलदार मि० अब्दुल बारी यांनीं तीन महिन्यांची रजा घेतली. त्यांचे जागेवर अकोल्याचे डिपुटि कमिशनर आफिसांतील डिपुटी क्लार्क आफ धि कोर्ट रा. रा. हणमंतराव रामचंद्र पाल ने मिलें व ते कालरोजीं तिकडे जाण्याकरितां निघून गेले. ही जागा बुलढाण्याचे डिपुटी कमिशनरचे डिपुटी क्लार्क आफ धि कोर्ट रा. रा. कृष्णाजी हरी कोलटकर यांस मिळावी व त्यांची जागा रा. रा. एकनाथ मोरेश्वर कान्हेरे माजी तहशिलदार यांस मिळावी अशी शिफारस झाली होती परंतु तसें घडून आलें नाहीं. एकनाथराव यांचें फार नुकसान झालें आहे सबब त्यांस आतां असली जागा मिळावी असें आम्ही इच्छीतो.

—०००—

क्या. ए. फ्यारर यांस त्यांचा असिस्टंट कमिशनरचा अधिकार आहे तो कायम ठेऊन त्या शिवाय इलिचपुरचा क्यांटनमेंट माजिस्त्रेटचा अधिकार त्यांस दिला.

—०००—

स्यानिटरी कमिशनर डा. अबट साहिब यांचे आफिसांत रा. गोपाळ श्रीकृष्ण यांस ३० रुपयांवर क्लार्क नेमिलें असें समजतें.

—०००—

वाशिमच्या एकस्ट्रा असिस्टंट कमिशनरचे ३५ रुपयाचे शिरस्तेदार रा माधवराव मिकोना यांस तीस रुपयावर इंग्रजी दप्तरांत घातलें व तिकडील तीस रुपयांचे कारकून रा. मैराळ लक्ष्मण यांस ३५ रुपयांचें जागेवर शिरस्तेदार नेमिलें असें कळतें.

—०००—

अकोल्यास २६ वे तारखेस मद्रासचे लार्ड बिशप खिस्तीपंथाचे सरकारी धर्माध्यक्ष हे येणार आहेत व भजनालयासंबंधी कांहीं संस्कार होणार आहे. नंतर ते नागपुरास जाणार व तेथें मुंबईचे आणि कलकत्त्याचे लार्ड बिशप जमणार आहेत.

—०००—

देऊळगाव राजाचे पोलिस इन्स्पेक्टर मि. करीमखान यांनीं गोंधणखेड्याचा डाका पकडल्याबद्दल त्यांची मोठी शिफारस होऊन त्यांस १०० रुपयांची तरवार व ५० रुपये रोख देण्याचा ठराव झाला होता; त्याप्रमाणें तरवार विलायतेहून तयार होऊन आली व ती पोलिसचे इन्स्पेक्टर जनरल यांनीं ५ वे तारखेस खुद आपले हातानें सरफाराज केली. तरवार फार चांगली आहे व तिजवर करीमखान यांचें नाव व शिफारशीचा प्रकार लिहिलेला आहे हे पाहून आम्हांस संतोष वाटतो. पोलिसांतील इतर लोकांनीं या गोष्टीकडे लक्ष द्यावें.

—०००—

अकोल्याच्या म्युनिसिप्यालिटीकडील पुढील सालचे जमाखर्चाचें बजेट झालें आहे तें येणेंप्रमाणें—

| जमा | रुपये. |
|---|---|
| म्युनिसिपल कर(पोलिसपट्टी) | ५००० |
| जागा विकल्या जातील त्याबद्दल | ४०० |
| बाजारपट्टी | ४०० |
| कोंडवाड्याबद्दल | ३०० |
| नाल्याचे भाडें | १०० |
| कसायीखान्याबद्दल | ४०० |
| दंडाबद्दल | ३०० |
| झाडांच्या विक्रीबद्दल | २५ |
| किरकोळ | १०० |
| गुदस्त शिल्लक | ८०८३ |
| एकुन | १५१०८ |

| खर्च | |
|---|---|
| शहरांत नवे रस्ते करण्याकरितां | ७०० |
| पाण्याच्या पुरवठ्याकरितां | ५००० |
| पाटलाकरितां चावडी | १००० |
| सडकांच्या बाजूचीं गटारें | १५५० |
| रात्रीचे दिव्याकरितां | १००० |
| कांपिनसेशनाकरितां | १०० |
| जरूरीच्या कामाकरितां | ३०० |
| रस्ते वगैरे दुरुस्तीकरितां | ७०० |
| भाड्याकरितां | ५० |
| किरकोळ | २०० |
| शहर सफाईकडे | १८०० |
| धर्मार्थ दवाखाना | ७५० |
| पोलिसांकरितां | १८३४ |
| जनन मरणसंबंधीं | २४ |
| कांटिंजंट | १०० |
| एकूण | १५१०८ |

—०००—

रिविन्युसरव्हेकडील हेड अकौंटंट रा. रा. त्रिंबक अमृत वैजापुरकर यांस वऱ्हाडांतील फारेस्ट खात्याकडे हेड क्लार्क नेमिलें. हे गृहस्थ हुशार आहेत व यांस ही जागा मिळाली याबद्दल आह्मास संतोष वाटतो.

## वर्तमानसार

बडोद्याचें कमिशन सुरू झालें. भास्कर विठ्ठल जुने दिवाण वगैरेच्या साक्षी झाल्या कंटींनेंट संबंधाची ही चौकशी चालली आहे असें ह्मणतात.

भाऊ शिंदे यांच्या बायका तिकडे जाण्याकरितां निघाल्या आहेत. भाऊची जिनगी अन्यायानें गायकवाडांनीं घेतली याबद्दल त्या कमिशनापुढें दाद मागत आहेत— कमिशनचे लोक श्री० मल्हारराव महाराज यांस भेटण्यास गेले होते— रा. रा. नाना भाई हरिदास वकील जे हायकोर्टाच्या जडज्याच्या जागेवर नुकतेच बदली होते ते कमिशनापुढें गायकवाड सरकारचे वतीनें काम चालविण्यास गेले होते पण मुंबईस परत आले ह्मणतात. रा. रा. भाऊ खेडकर बडोद्यास जाऊन रेठशनावर राहिले आहेत. त्यांस व रा. व्यंकटराव मास्तर यांस त्यांचे सर्व अपराध गायकवाड यांनीं माफ केले असें ह्मणतात.

आनरेटी साहेबाच्या कायद्याच्या पुस्तकाच्या लायब्ररीची विक्री झाली. गिऱ्हाईकांची फार दाटी झाली होती व किंमत चांगली आली असें ह्मणतात.

हिंदुस्थानचे इंग्लिश सरकारचे राज्याचे चालू सालांतील एप्रिल, मे, व जून या तिमाहीचें उत्पन्न १४ कोट ८३ लक्ष झालें गुदस्त सालीं याच तिमाहीचें १५ कोटि १४ लक्ष झालें होतें. खर्च चालू सालच्या सदर तिमाहीचा १२ कोटि ६१ लक्ष रुपये झाला व मागिल सालच्या या तिमाहीचा ११ कोटि ९७ लक्ष रुपये झाला होता. सन्या वर्षाचा या सालचा अजमास जमेचा ५५ कोटि व खर्च ५९ कोटींचा इंग्लंडांतील खर्चासुद्धां आहे.

हिंदुस्थानांतील रेलवे कंपन्यांनां अक्टोबर महिन्याचे पहिले आठवड्यांत खालीं लिहिल्या प्रमाणें उत्पन्न झालें.

| | रु. |
|---|---|
| १. ईस्ट इंडिया रेलवे | ३,८६,१०५ |
| २. जबलपुर शाखा | २७,६७७ |
| ३. इस्टर्न बंगाला | ५३,९५८ |
| ४. अयोध्या आणि रोहिलखंड | २२८०० |
| ५. सिंद्ध, पंजाब आणि दिल्ली | १,०७,००० |
| ६. मद्रास रेलवे | १,०१,८३८ |
| ७. ग्रेट सदर्न आफ इंडिया | २४,५४६ |
| ८ कर्नाटक | ६१६ |
| ९. ग्रेट इंडियन पेनिनसुला | २,५६,९३६ |
| १० बडोदा रेलवे | ९६,४१७ |
| सरकारी. | |
| ११. कलकत्ता आणि सौथ इस्टर्न | १९६२ |
| १२. नल्हटी | १०६३ |
| १३. रजपुताना | ३७७३ |

श्रीनगर येथें डाक्टर एल्मेली यांचे नावानें एक दवाखाना स्थापन करण्याविषयीं कलकत्त्याचे बिशपांनीं तजवीज करविली आहे. त्याकरितां १०००० रुपयांची इमारत बांधावी व १०००० रुपयांची देणगी द्यावी असा विचार आहे.

रशिया देशांत सेंटपिटर्स बुर्ग येथें नदीला पूर येऊन मोठें नुकसान झालें. कोणा मनुष्याच्या जिवाला इजा झाली नाहीं पण पूर कांहीं अधिकवेळ राहता तर या शहराची फार कठीण अवस्था झाली असती.

ग्वाल्हेरचे शिंदे सरकार आपलें लग्न करणार आहेत त्या करितां सावतवाडीहून बायको नेली ती तेथें जाऊन दाखल झाली. आतां लग्न एका लेख्यावर होईल.

दिल्ली शहराला रेलवेचीं स्टेशनें तीन झालीं आहेत. एक ईस्टइंडिया रेलवेचें, एक सिंध, पंजाब, आणि दिल्ली रेलवेचें, आणि तिसरें रेवारीचें.

फ्रान्स देशात मार्शल म्याक मोहन यास प्रजासत्ताक राज्याचे ५ वर्षे प्रेसिडेंट नेमणार असें वर्तमान आहे.

सुरत जिल्ह्यांतील ८४ तालुक्याचा फौजदार शंकरसिंग यास कित्येक अपराध पावरून ९ वर्षें सक्त मजुरी कैदेची शिक्षा झाली.

बंगाल्याकडील दुष्काळाचे शमनार्थ ख्रिस्तीधर्मी लोकांनीं १२वे तारखेस टौनहालांत ईश्वराची प्रार्थना केली.

कलकत्त्यास एका साडेदहा वर्षांच्या बाईस मूल झालें व तीं मायलेंकरें सुखरूप आहेत असें डा. सी. मार्कनाटन हे इं. मे. ग्याजेटांत प्रत्यक्ष पाहिल्याविषयीं लिहितात.

मिस्त एमिली फेथफुल या बाईने एक छापखाना घातला त्यांत नायकांसच मात्र चाकरीस ठेवण्याचा क्रम सुरू केल्यापासून पुष्कळ वर्तमानपत्रांच्या कारखान्यांत बायका चाकरीस ठेवूं लागले. अमेरिका नेहमी प्रमाणें या कामांतही इंग्लंडच्या पुढें आहे. त्यांतील रीडस्बर्ग फ्रीप्रेस याजमध्यें सर्व नायकाच कामावर लावलेल्या आहेत.

कैलासवासी रा. ब. विष्णु परशराम रानडे— या गृहस्थाच्या नावानें कांहीं स्मारककृत्य करावें याजकरितां फंड, जमा करण्यासाठीं नेमलेल्या कमिटीची म्यानेजिंग कमेटी तारिख ८ शनवार रोजीं पुण्यांत वे. शा. सं. रा. रा. कृष्णशास्त्री चिपळूणकर यांच्या येथें भरून ठराव झाले, त्याजवरून असें कळतें कीं या कृत्याकारितां फंडाचा उद्योग झाला त्यांत ५५४ रुपये वसूल झाले व ३९६ रुपये येणें राहिले आहेत. रा. ब. रानडे यांच्या नावानें सन १८७४ पासून पुण्याच्या वक्तृत्वोत्तेजक मंडळीच्या मार्फत प्रतिवर्षीं २५ रुपयांचें एक बक्षीस द्यावें. फंडाची सर्व रकम रा.रा. कृष्णशास्त्री चिपळूणकर व सखाराम रामचंद्र फडके यांच्या नावानें मुंबई ब्यांकेत ठेव ठेवावी असें ठरलें.

## वऱ्हाडप्रांताचें वर्णन.

### प्रसिध्द व मोठालीं शहरें

वऱ्हाडामध्यें प्रसिद्ध व मोठालीं शहरें ह्मणण्यासारखीं इलिचपुर, अकोट, अमरावती, खामगाव, बाळापुर, वाशिम, उमरखेड इत्यादि आहेत. अमरावती हें सांप्रत वऱ्हाडांत संपत्तीनें मोठें शहर आहे. त्यांत व्यापारी लोकांची वस्ती विशेष आहे. कापसाच्या हंगामांत खामगावामध्यें कापसाचा व्यापार वऱ्हाडांतील इतर गावापेक्षां अधिक होतो पण दुसरे सर्व बाबदीत खामगाव उमरावतीचे खालीं आहे. आतां प्रथम इलिचपुराविषयीं माहिती सांगू.

इलिचपूर—वऱ्हाडप्रांताचे व त्यांतील जुन्या राजाचें मोडकळीस आलेलें राजधानी शहर इलिचपुर हें आहे. व त्यांत अजूनही लोकसंख्या वऱ्हाडांतील इतर सर्व शहरांपेक्षां अधिक आहे. परंतु जुन्या काळीं त्या वस्तीला जे कांहीं फायदे होते ते सर्व आतां गैरसोयीचे झाले आहेत. वऱ्हाडांतील जुन्या काळचे राजे आपल्या प्रांताचे ईशान्य कोपऱ्यांत अवघड डोंगराचे पायथ्याशीं माविलगड किल्ल्याचे आश्रयानें रहात असत. दक्षिणेतूनें उत्तर हिंदुस्थानांत व तिकडून दक्षिणेंत देश जिंकणाऱ्या फौजांच्या टोळ्या बऱ्हाणपुर मार्गें जात येत असत. त्यांच्या रस्त्याच्या अडवळणास व दूर हें स्थळ असे. ह्मणून तेव्हां सुखावह असेल; परंतु आतां लढाया व दंगे धोपे संपून सर्वत्र शान्ती झाली आहे. त्यामुळें इलिचपुर शहर उंचवट्यावर, भणभणीत आणि दळणवळणाच्या व व्यापाराच्या सर्व साधनांस वेगळालें असें झालेलें आहे. तरी त्याचें पूर्ववैभव या प्रसंगीं सांगणें अवश्य आहे.

या शहराविषयीं दंतकथा अशी आहे कीं, इल नावाच्या जैनधर्मी राजानें इसवी सन १०५८ ह्मणजे विक्रमाजित संवत १११५ त ज्येष्ट शुध्द ११ रोजीं बाडगावानजिकच्या खानजामा नगराहून येऊन हें शहर वसविलें. त्याणें पुष्कळ वर्षें राज्य केलें व तो आपला सर्व राज्यकारभार स्वतां पहात असे. पुढें अबदुल गाजी या नावाचा एक मुसल्मान फकीर इलिचपुर शहरांत आला. त्याचें व राजाचें धर्मसंबंधीं कांहीं भाषण झालें, तें बरेंच निकरास गेलें व त्या फकिरास लेष येऊन तो राजाचा सूड उगविण्याचे इराद्यानें शहर सोडून गेला. व त्याणें महमदगिझनीचा पुतण्या शहा रहिमान गाजी नावाचा एक प्रसिद्ध शूर सरदार होता त्याची मदत मिळविली. हा रहिमान गाजी आपलें लग्न करणार होता इतक्यांत अबदुलाची गोष्ट ऐकून लग्न रहित करून व फौजा जमा करून इलिचपुरावर आला, इल राजाचे फौजेची व त्याची इलिचपुरापासून वीस कोसांवर कर्डली गाव आहे तेथें गाठ पडली. व लढायी शुरू झाली. ती २७ दिवस चालली. पुढें रहिमान याणें आपले आईचे सांगण्यावरून स्वहस्तानें आपलें शीर कापून घेतलें व जय मिळविला. राजा इल गंजशाहिद येथें मारला गेला. तेथेंच त्याचें प्रेत पुरलें. तें स्थळ व जेथें रहिमानच्या हातांतूनें धनुष्य बाण गळून पडले तें स्थल शहरांत अजून दाखवितात.

अकराव्या शतकापर्यंत मुसलमानलोक फौजासहित इलिचपुरावर गेले नव्हते असें दिसते; परंतु राजा इल जो या प्रांतांत विख्यात होऊन गेला त्याची मिती जी इलिचपुरच्या पंडितांनीं सांगितली आहे ती भरवशाची दिसतें. बाकी त्याचा इतिहास व त्याचे वंशाचा इतिहास यांत बहुशा घोटाळा आहे. रहिमानच्या या चरित्रावरून असें लक्षांत आणिलें पाहिजे कीं, लढायांत जय मिळविणें हें केवळ सुलभ काम नाहीं. शूर सरदारांनां विकट प्रसंगीं आपलीं मस्तकें आपल्या हातांनीं कापावीं लागतात! आह्माला वाटतें कीं सन १४०० च्या सुमारास फतेखेलड्याचा किल्ला ब्राह्मणी बादशहाच्या सरदारानें सर केला. व त्याच वेळेस त्याला शत्रूनीं दग्यानें मारिला या इतिहासांतील खऱ्या गोष्टीच्या आधारावर सदहू दंतकथा रचलेली असावी. अस्तु.

रहिमानानें जें युद्ध केलें तें राज्य मिळविण्याकरितां नव्हते धर्माकारितां होतें. आणि पुढें इल राजा मेल्यावर त्याचे गादीवर कोण बसला हें बरोबर समजत नाहीं परंतु पुढील राज्य पिढी गोंड जातीची असावी असें बहुशा दिसतें; कारण त्या वेळेस नरनाला, माविलगड, आणि खेलडा येथें गोंड राजे होते असें माहित आहे. याप्रमाणें १२० वर्षें इलिचपुरची स्थिती होती; नंतर अल्लाउद्दीन याच्या पठाणांनीं हें शहर घेतलें. व त्या मागून तें ब्राह्मणी वंशाच्या हस्तगत झालें आणि तेव्हांपासूनचें इलिचपूर शहराचें वर्णन वऱ्हाड प्रांताच्या साधारण इतिहासाशीं मिळत आहे. इलिचपुरच्या स्थापनेची मिती कोणतीही असो परंतु हिंदुस्थानांतील जुनी ऐतिहासिक जीं शहरें आहेत त्यांजमध्यें हें कमी प्रतीचें नसून मोठें मऱ्हाटीचे राजधानी शहर होते ही गोष्ट यथार्थ आहे. पुढें पहिले निजाम उल मुलुख यांनें कारकीर्दींत इलिचपुरचें, प्रांताच्या मुख्य गादीच्या संबंधाचे वैभव कमी झालें; कारण दिल्लीचे नादशहा सर्व दक्षिणेंत मुख्याधिपती झाले व निजाम उल मुलुक त्यांस अवलंबून राहिले आणि इलिचपुरची मुख्य गादी मोडून तें एका व्हाइसरायच्या ह्मणजे प्रतिनिधीच्या अधिकारांत दिलें गेलें.

निजाम उल मुलूख यांनीं पहिल्यानें इवाजखान यांस इलिचपुरच्या राज्यकारभारावर नेमिलें. त्यानें सन १७२४ पासून सन १७२९ पर्यंत कारभार चालविला. पुढें तो मरण पावल्यावर सुजायतखान, यास त्याचे जागीं नेमिलें त्यानें ११ वर्षें राज्य चालविलें पुढें सन १७४० त राघोजी भोसले यांचें व त्याचे युद्ध झालें त्यांत सुजायतखान मरण पावला व इलिचपुरचा खजिना भोसले यांनीं लुटला.

नंतर शरिफखान यांस नेमिलें त्यांनें ११ वर्षें ह्मणजे सन १७५२ पर्यंत कारभार चालविला पुढें तो शिरजोर झाला व आपण निजामाचे बरोबरीचे आहो असा हक्क सांगूं लागला ह्मणून त्याला कामावरून काढून टाकला. आणि भाऊ निजाम अलिखान यास त्याचें काम सांगितलें. इस्मायलखान ह्मणून एक ५०० घोडेस्वारांचा सरदार होता त्याच्या उत्तम कामगिरी बद्दल त्याला इलिचपुरास दुय्यम नेमून पाठविलें. पुढें त्यानें अकोट आणि बाळापुर हे तनखा जाहगीर मिळविलें. इलिचपुरास एक महाल बांधिला, शहराला गावसू केलें. इल राजाच्या वेळची जैन धर्मांची देउळें होती त्यांचे दगड काढून दुसरे उपयोगास लाविले. व सरकारी वसूल कित्येक वर्षांचा दाबून ठेविला. पुढें हिशेबी कागदावरून घोटाळा दिसून आल्यावरून खुद्द निजाम अली स्वार चाल करून नेर या गावापर्यंत आले आणि तेथून आपला वजीर निर्मळचा सुभेदार जाफर उदवला जो इस्मायल खानाचा मुळचाच शत्रु होता त्याजबरोर इस्मायल खानास निरोप पाठविला कीं देखत हुकूम पाठविलेल्या सरदाराबरोबर स्वारींत येऊन हजर व्हावें. त्यावर इस्मायल खानानें जबाब पाठविला कीं वजिराबरोबर याबें इतका हलकेपणा आह्मी आपला करून घेऊं इच्छित नाहीं त्यावरून नेर आणि रिथपुर यांच्या दरम्यान काटसर या गावीं निजामाची व इस्मायल खानाची लढायी झाली तींत इस्मायल खानाचा पराभव होऊन तो ठार मारला गेला व त्याचे दोन मुलगे विलोलखान आणि सलाबतखान हे कैद करून नेले.

नंतर निजामाचे चिरंजीव अलीजा बहादर यांस इलिचपुरचे गवरनर नेमिले व ते डिपुटीच्या मार्फत कारभार चालवित होते. याच सुमारास वजीर जाफर उदवला यास इस्मायलखानाचे मृत्युबद्दल त्याच्या दोन मुलांच्या सद्गुणांवरून फार खेद वाटूं लागला व त्यांचे कल्याण करण्याविषयीं त्यास इच्छा उत्पन्न झाली. इतक्या सुमारांत मुधोजी भोसले यांनीं वऱ्हाडांतील राज्यकारभाराच्या गैर व्यवस्थेबद्दल गऱ्हाणें कळविला तेव्हां निजाम सरकारापाशीं वजिरानीं रदबदली करून इस्मायलखानाचा पुत्र सलाबतखान यांस इलिचपुरास गवरनर नेमविले. व इस्मायल खानाची सर्व मालमिळकत त्याच्या पुत्रास देवविली. मग सलाबतखान इलिचपुरास आला पण सारीं दोनच वर्षें तेथें होता तितक्या काळांत त्यानें पुष्कळ अशीं शहराची सुधारणा केली. राजमहाल वाढविला, बिना बाग केला, व पाण्याचे नळ वाढविले, तो मोठा शूर शिपायी होता ह्मणून निजाम व टिपुसुलतान यांची लढाई जुपली तेव्हां त्यास तिकडे जाणाऱ्या फौजेस मिळण्याविषयीं हुकूम झाला होता त्याप्रमाणें तो तिकडे जाऊन विख्यात झाला. व त्यानंतर कर्डला एथील लढाईंत व त्यानंतर सन १८०३ सालीं जनरल वेलस्ली साहेबाच फौजेबरोबरही लढाईंत विख्यात झाला. त्याला दोन लक्षांची जहागीर होती व त्याचा पुत्र नामदारखान यासही आणखी दोन लक्षांची जहागीर इलिचपुराकडेच मिळाली होती. व त्याच्या इस्टेटीचा कारभार तो मरेंपर्यंत ह्मणजे सन १८४३ पर्यंत नबाब या पदवीने चालत होता. त्याला त्याच्या बापानें जनरल वेलस्ली साहेब यां[illegible]सें ह्मणतात व [illegible] पगाराकरितां [illegible] कांहीं वर्षांनीं बाकी थकल्यामुळें त्या[illegible] पल्या जहागिरीचा बराच मोठा भाग सोडून दिला व आपल्या खासगत खर्चाकरितां सारी साडे तीन लक्षांची जहागीर आपणाकडे राखिली.

त्याचे मरणानंतर पुतण्या इब्राहीमखान गादीवर बसला व तो सनं १८४६ त मरण पावला. नंतर त्याचा सासरा गुलाम हसन यास जामयाचे कामाची मुकत्यारी मिळाली व त्याला नबाब ह्मणूं लागले होते. ही व्यवस्था सन १८५३ पर्यंत ह्मणजे वऱ्हाड प्रांत इंग्लिश सरकारचे ताब्यांत येई पर्यंत चालू होती. गुलामहसन यांस जामयाचा वारसा मिळविण्याबद्दल ७ लक्ष रुपये नजराणा द्यावा लागला होता व ती रक्कम त्यानें कर्जाऊ काढिली होती पुढें त्या सावकारानें त्या कर्जाबद्दल फिर्याद केली आणि इलिचपुरच्या नबाबाचा वाडा आणि दुसरी मिळकत जप्त केली.

साबीदखान आणि नशीबखान असे दोन पठाण जमीदार होते. हे जयपुरचे राहणारे हैदराबादेस घोड्याचा व्यापार करीत असत. त्यांवर निजाम नासिरजंग यांचें लक्ष्य गेलें व त्यांनीं त्या दोघांनां १०० घोड्यांची सरदारी दिली. पुढें ते कांहीं लढायांत प्रसिद्धीस आल्यावरून त्याजकडे १०० घोड्यांचें काम दिलें. व वऱ्हाडांत कांहीं जहागिरी नेमणूक करून दिली. नंतर इलिचपूरच्या गवरनरीच कामावर बहुशा त्यांचेच वंशांतील पुरुष नेमित असत. इस्मायलखान, सलाबतखान, विलोलखान, नामदारखान आणि इब्राहीमखान हे त्यांच्याच वंशांतील गवरनर होत. यापैकीं नामदार खान यांजला नबाब अशी पदवी मिळाली होती. यांचीं व यांच्या जातभाईंचीं पुष्कळ नांवें इलिचपुरभोंवतीं जे पुरे वसले त्यांस दिलेली आहेत.

हें पत्र अकोला एथे लंडेराव [illegible]
फडके यांनीं वऱ्हाडसमाचार छा.